
तिची सतार
— प्रभात कुलकर्णी

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# तिची सतार!

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# तिची सतार!

## लेखक : श्याम कुलकर्णी

# तिची सतार!

लेखक : श्री. श्याम कुलकर्णी

**पत्ता : द्वारा श्री. जयवंत कुलकर्णी, ”गन्धार”फ़्लॅट क्र. ५/४**

**आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे ४११०२९**

**संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९७६५४५६५८१**

**Email : sgk6642@gmail. com**

मुखपृष्ठ: डॉ. सुधीर कुलकर्णी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १४ जानेवारी २०२२ (पौष शु. द्वादशी शके १९४३)

मकरसंक्रांती

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## श्री श्याम कुलकर्णी



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E.
1975

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित.



मुखपृष्ठ: डॉ. सुधीर कुलकर्णी

डॉ. सुधीर कुलकर्णी

(D. M. Nephrology)

मराठवाड्यातील प्रख्यात मूत्रपिंड रोग विशारद असून ते औरंगाबाद मधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून प्राध्यापक पदावरून सेवानिवृत्त होउन आता महात्मा गांधी मिशन संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक व् डायलीसिस विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय अवयवदान चळवळीचे एक प्रमुख अधिकारी आहेत. संगीत चित्रकला, मूर्तिकला असे छन्दही फावल्या वेळेत त्यांनी जोपासले आहेत. "तिची सतार " पुस्तकाचे मुखपृष्ठ हे त्याच नावाच्या कथेतील सतारीचेच चित्र त्यानी सहज स्वानंदासाठी काढले आहे, पुस्तकासाठी नाही पण मला ते मुखपृष्ठ म्हणून वापरावे असे वाटल्यावरून त्यानी आनंदाने त्यासाठी ते उपलब्ध करुन दिले. श्री. सुधीर हे माझे (म्हणजे लेखकाचे )धाकटे बंधु आहेत हे नमूद करण्यास मला अतिशय आनंद होतो. "डॉक्टर सुधीर कुलकर्णी यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील कामगिरीबद्दल त्याना "भारतीय चिकित्सक संघ " (Association of physicians India ) कडून ""Master Teacher 2021" हा सर्वोच्च सन्मान प्राप्त झाला आहे. ".

**तिची सतार!**

# दोन शब्द

माझ्या अवती भोवती असणाऱ्या स्त्रियांच्या आयुष्याचा लेखा जोखा मांडण्याचा हा प्रयत्न आहे. माझी आई, मावशी, पत्नी अणि बहीण या आणि तश्याच काही स्त्रियांना केन्द्रस्थानी ठेवून या कथा किंवा अनुभव लिहिण्याचा हा प्रयत्न, यातील काही अनुभवांना कदाचित कथाही म्हणता येईल की नाही शंका आहे'तिची सतार" किंवा "जादू" मधील स्त्री ही आमच्या काळातील (म्हणजे विसाव्या शतकातील) भारतीय स्त्रीची प्रतिमा आहे. त्यामधील भारतीय स्त्री आता खूप बदलत चालली आहे. त्याचेच एक उदाहरण "हे असेच व्हायचे होते " ही कथा आहे. परंतु तिच्या व्यथा फारश्या बदललेल्या नाहीत. त्या व्यथा मांडण्याचा हा प्रयत्न कितपत यशस्वी ठरला आहे हे वाचकांनीच ठरवावे.

श्याम कुलकर्णी

# कथानुक्रम


| | |
|---|---|
| १. जादू | १० |
| २. उगीच! | २५ |
| ३. तिची सतार --! | ३० |
| ४. हसरे लाडू | ३९ |
| ५ हे असेच व्हायचे होते ---! | ५७ |
| ६. ती सध्या काय करते? | ७५ |
| ७. आईची नथ | ८५ |
| ८. उत्तर आणि निर्णय | ९४ |
| ९. सुंदर मी होणार ! | ११४ |
| १०. श्रीमान सर्वज्ञ | १६२ |

# १. जादू

दादा आरामखुर्चीवर पडून वर्तमानपत्र वाचत होते. खरं म्हणजे त्यांच्या डोळ्यावरील चष्म्यावर वर्तमानपत्र पडले होते व त्यामागे ते साफ घोरत होते. आई लोकरीचा गुंडा बाजूस ठेवून सुयांची हालचाल थांबवून विणलेले टाके एकाग्रतेने मोजत होती. एकदा मोजून खात्री न झाल्याने पुन्हा मोजून पहात होती, व प्रथम कमी भरलेले व मागून मोजल्यावर जास्त भरलेले या दोन्ही वेळेच्या टाक्यांच्या संख्येविषयी तिच्या मनातला गोंधळ सुटता सुटत नव्हता. रेडिओवर ’वनिता मंडळ’कार्यक्रम बऱ्याच अंतरावरील चाळीतील महिलांचे भांडण ऐकू यावा तसा ऐकू येत होता. बाहेर व्हरांड्यात सुधीर अणि त्याच्या मित्रमंडळींचा सुधीरच्या नव्या स्कूटरचे निरीक्षण करण्याचा उद्योग चालू होता.

निशा मात्र या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून निश्चयाने टेबलावर लक्ष केंद्रित करून बसली होती. तिच्या समोर कोऱ्या कागदांची चळत रचलेली होती अणि गाडाभर अन्न एका तासात फस्त करणाऱ्या बकासुराच्या आवेशात ती चळत लिहून फस्त करायचा तिचा विचार होता, फक्त लघुकथा लिहायची, कविता करायची की (आपली) कादंबरी(च) लिहायची याविषयी तिच्या मनाचा निश्चय होत नव्हता. त्यामुळे पेनचे मागचे टोक दातात धरून ती विचार करत होती.

विचार करता करता सगळं टाकून आपले आरामात जाऊन लोळावे हा विचारही मधून मधून डोके काढत होता. पण कालचा बक्षीस समारंभाच्या वेळचा प्रसंग आठवला की लिहिण्याचा निश्चय पुन्हा प्रबळ होत होता.

कॉलेजच्या शेवटच्या वर्षात विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या मुलींच्या सत्कार समारंभात बक्षीस स्वीकारताना अध्यक्षा न्यायमूर्ती विशाखा दीक्षित यानी तिची पाठ थोपटून शाबासकी तर दिली होतीच आणि त्यानी त्याचवेळी, तिला उद्देशून काढलेले उद्गार तिला राहून राहून आठवत होते, ''निशा देशमुख, कॉलेजच्या विश्वात चमकलात यावर समाधान मानू नका, आता बाहेरच्या मोठ्या जगातही काहीतरी विशेष कामगिरी तुम्ही करून दाखवायला हवी, निशा देशमुख हे नाव सरोजिनी नायडू, कॅप्टन लक्ष्मी, सुधा मूर्ती या नावांसारखे मानाने, आदराने उच्चारले जायला पाहिजे अशी जिद्द बाळगा. ''

ते वाक्य आठवल्यावर तिने पुन्हा पेन सरसावले. खरंच सरोजिनी नायडूंच्यासारख्या कविता लिहाव्या का? नाहीतरी कविता लिहिणे तसे सोपेच असते, आणि त्या विचारात '' प्रतीक्षेत मन असे कुणाच्या? '' ही ओळ तिनं लिहूनसुद्धा टाकली. पण त्यापुढे काही लिहिण्या ऐवजी कॉलेजातल्या आशुतोष वैद्यची उंच रुबाबदार, एका हाताने कपाळावरची झुलपे ऐटीत सावरून दुसऱ्या हातात टेनिसची रॅकेट सावरणारी मूर्ती उगीचच तिच्या डोळ्यासमोर तरळू लागली. मोठ्या कष्टाने विचारांचा ओघ परत कवितेकडे तिने वळवला. पण कवितेचे अडलेले घोडे पुढे हलायला तयार नव्हते. मग ती आपली कविता कोठल्या मासिकाकडे पाठवायची याचाच विचार करू लागली. कवयित्री निशा देशमुख हे नाव सर्वतोमुखी

झाल्याचा भास तिला झाला. पहिलीच कविता वाचकांना आवडल्याने त्यांच्या पसंतीच्या आलेल्या पत्रांचा गठ्ठा तिला दिसू लागला, ”कंटाळा आला बाई या अभिनंदनपर पत्रांचा! ” आपल्याविषयी असूया वाटणाऱ्या सुषमा प्रधानला ती मुद्दामच म्हणणार होती. आणि पुढे, ”प्रत्येकजण विचारतोय, तुमचा कवितासंग्रह केव्हां प्रकाशित होणार म्हणून. खरंच लोकप्रिय होणं म्हणजे अगदी कहारच असतो, तुझं आपलं बरं आहे बाई सुषमे, ” असं वरवर म्हटले तरी तिचा जीव मात्र सुखाने आकंठ भरून जाणार होता. त्यातही त्या पत्रात आशुतोषचंही पत्र आल्याचं मात्र ती सुषमाला सांगणार नव्हती.

’ठण्ण ’ साडेतीन वाजल्याचा ठोका घड्याळाने दिला अन ती एकदम भानावर आली. त्या घड्याळाचा तिला अस्सा राग आला आणि त्या न जमणाऱ्या कवितेचा त्याहूनही! ”कंटाळले बाई अगदी” आळसलेल्या सुरात साडीचा पदर अधिकच लपेटून घेत ती उद्गारली. ’आता खरं म्हणजे झक्कपैकी चहा घ्यायला हवा, हा विचार तिच्या मनात यायला आणि “काय निशाताई, चहा करताय ना? ” हा प्रश्न दादांनी विचारायला एकच गांठ पडली. चहा पिण्याच्या विचारानेच तिला तरतरी आली आणि उत्साहाने, ”हो, करते ना” म्हणून पेनचे टोपण बसवीत ती उठली. मात्र ’काय कसला उद्योग चाललाय निशाताईंचा? ” या दादांच्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे तिने टाळले, कारण दादा उगीचच थट्टा करतील असं तिला वाटलं. पण दादांनी शेवटी कागदावर डोकावून पाहिलेच अन कौतुकाने, ”अरेवा आमची निशा सरोजिनी नायडू होणार दिसतेय” असे उद्गार काढले. ती मनोमन सुखावली आणि ’पिया तो मानत नाही’ या ठुमरीची ओळ गुणगुणत आत गेली.

चहा घेतल्यावर मात्र जणु तिची काव्यसमाधीच लागली. हाताच्या बोटात सरस्वतीच अवतरली जणू तिच्या. एकामागून एक श्रावणाच्या सरी याव्यात तश्या काव्यपंक्ती मनात बरसत होत्या व बोटातून कागदावर अवतीर्ण होत होत्या. कागदावर हात हलवण्याचे श्रमही तिला करावे लागत नव्हते, जणु कोणीतरी अलगद धरूनच हलवीत होते. तिची ही समाधी उतरली ती आईने रेडिओ लावला तेव्हां! रविशंकरच्या सतारीचे सूर तिच्या कानी पडले तसे सुंदर स्वप्नातून पहाटे जाग यावी तशी तिची समाधी उतरली. सतारीतून निघणारे मारव्याचे सूर तिच्या अंतरंगाला भिडून तिच्या हृदयाच्या तारा छेडू लागले.

रेडिओवरची द्रुत धुन संपली. पाऊस पडून गेल्यावर शांतता व्हावी तसे वाटू लागले, अन् एकदम कागद बाजूला सारून सतार बाहेर काढायची तिने ठरवले. सतार बाहेर काढली आणि चावट सुधीर ओरडलाच, ”ओहो, शरणराणी आता रविशंकरजींची छुट्टी करणार तर! ” “नालायक कुठला, सतार आणि सरोद यातला फरक तरी कळतो का? याला काय माहीत निशा देशमुख हे नाव शरणराणीच काय पण त्याहीपेक्षा तेजाने तळपणार आहे. पण मग सतारीच्या तारा छेडता छेडता स्वरांच्या आघातांनी मनावर गुंगी येत चालली व त्यात सुधीरवरचा राग कुठल्याकुठे विरून गेला. मारव्याच्या करुणगंभीर सुरांनी वातावरण भरून गेल्यावर तर त्या सुरांच्या पिवळसर जांभळट प्रकाशझोताच्या पार्श्वभूनीवर मारव्याची रागिणी गतीच्या दिड दा दिड् दा या बोलाचे नूपुर चढवून नृत्य करत असल्याचे दृष्य तिच्या डोळयापुढे नाचू लागले. त्या तंद्रीत ती किती वेळ वाजवीत रहिली असती कुणास ठाऊक पण त्या तंद्रीचा भंग अचानक सुषमा तेथे येऊन नेहमीच्या धसमुसळेपणाने खुर्चीवर

बसकण मारीत “ए, बस झालं तुझं ते ट्यंव ट्यांव, चल जाऊ या फिरायला” म्हणाल्यामुळे झाली.

तिच्या या कृतीने आणि विशेषत: तिच्याकडे पाहून निशाला तिचा चांगलाच राग आला. कारण मोतिया रंगाची नवी साडी अन तश्याच रंगाच्या भारी कापदाचा ब्लाउज तिच्या अंगावर दिसत होता. शिवाय नेहमी न दिसणाऱ्या नव्याच प्रकारची सोनसाखळीही तिच्या गळ्यात दिसत होती.

’ आहे बुवा ऐट एका माणसाची, आज काहीतरी खास बात दिसतेय”

मळक्या अंथरुणावर स्वच्छ चादर पसरावी तसं मनातल्या मत्सरावर कौतुकाचे आवरण चढवत निशा उद्गारली.

“चल गं आमचं काय खास असणार? आम्ही थोडेच सरोजिनी नायडू व्हायला जन्माला आलोय. ” तिला टोमणा मारत सुषमा उद्गारली, पण तिच्या लाजून लाल झालेल्या गालांनी तिचे गुपित फोडलेच.

“ ए उगाच भाव खाऊ नकोस, कुणीतरी आज आले होते म्हणे सुषमा राणींना पहायला. ” सुषमाचे वडील तिचे लग्न जमवण्याच्या खटपटीत आहेत अशी कुणकुण कानी आलेली असल्यामुळे निशाने एक खडा टाकून पाहिला. पण तिला वाटत मात्र होते, तसे काही नसणार, पण सुषमाने लाजत लाजत शेवटी अगदी नाइलाजाने कबूल करावे तसे ’हो’ म्हटले व बहुतेक त्यांच्याकडूनही होकारच आहे असेही पुढे सांगितले तेव्हां आपल्याला काही फार बरे वाटले नाही असं निशाला उगीचच वाटले, पण दुसऱ्याच क्षणी सुषमाची कींव आली. बिचारी सुषमा, या

संसाराच्या जंजाळात सापडणार आणि सुषमा प्रधान हे नाव पण नाही उरणार, मग गाजायचे ही गोष्ट तर दूरच! अन अत्यंत सहानुभूतीने ती सुषमाकडे पाहू लागली. मोठे होण्याचे नशिबातच नाही बिचारीच्या! ती मनात पुटपुटली आणि साडी बदलण्यासाठी आत गेली.

साडी कुठली नेसावी याविषयी नेहमीप्रमाणे आज तिचा गोंधळ झाला नाही उलट फर्रकन पांढरीशुभ्र साडी तिनं काढली. आपण एक ध्येय निश्चित ठरवल्यावर कुठलीही गोष्ट अधिक ठामपणे करू लागलो आहोत अशी जाणीव तिला झाली. ती साधीच साडी नेसून आरशासमोर उभी राहिल्यावर आपण या साध्या साडीतही किती सुंदर दिसतो याचा कळत न कळत अभिमान तिला वाटलाच पण आता सुंदर दिसून कोणालातरी आवडावे व त्या संसाराच्या रगाड्यात आपल्या ध्येयाचा चक्काचूर व्हावा हे तिला मान्य नव्हते. नव्या कर्णफुलाखेरीज आणखी काही दागिनेही त्यामुळे तिने घातले नाहीत.

फिरायला गेल्यावर सारखे सुषमाचे तिला पहायला आलेल्या 'ह्यां'चे पुराण चालू होतं अन निशाला कंटाळ्याने जांभई येणार असे वाटु लागले. सुषमाच्या क्षुद्रपणाचे तिला आश्चर्य वाटु लागले. काय ही सुषमा? काही उच्च आकांक्षा, नांव कमावण्याचे ध्येय कसे काहीच नाही हिला? छे बाई, मी आपल्या भाषणाच्या शेवटी—हो एवढ्या मोठ्या कवयित्रीला भाषणासाठी बोलावणी येणारच की—स्वाक्षरी घ्यायला आलेल्या मुलींना हेच सांगणार "मुलींनो एकाद्या किड्यासारखे चार दिवस कसे तरी जगत संसाराचा गाडा ओढत जीवितयात्रा संपवू नका, काहीतरी नांव घेण्यासारखी भरीव कामगिरी करा, माझंच बघा बर.... ."

पण सुषमाच्या बडबडीने तिच्या विचारांचाही गोंधळ उडू लागला. बंद खोलीत एकादा पंखा गरगर फिरत रहावा व वारा मात्र मिळू नये तशी गुदमरून गेल्यासारखी तिची अवस्था झाली. तिला वाटलं सुषमाला ओरडून सांगावं "ए बाई बस्स कर तुझं हे 'हे' पुराण. पण आपल्या मैत्रिणीचा असा मानभंग करणे आणि तेही ती बिचारी तिच्या आनंदात गुंग असताना हे तिच्या संस्कारात बसत नव्हतं

फिरून परत येताना एका बंगल्याच्या कुंपणाच्या भिंतीवर जाहिरात नुकतीच चिकटवलेली तिला दिसली"प्रसिद्ध नर्तिका वैजयंतीमाला यांचा चंडालिका नृत्य कार्यक्रम" त्या जागी प्रसिद्ध सतार सम्राज्ञी निशा देशमुख यांच्या सतारवादनाच्या. कार्यक्रमाची जाहिरात तिला दिसू लागली. शेकडो लोकांनी भरलेल्या प्रेक्षागृहात आपण शिरत आहोत, सगळा श्रोतृवृन्द माना वर करून आपल्याकडे पहात आहेत, आपण रंगमंचावर गेल्यावर होणाऱ्या टाळयांचा कडकडाट मान झुकवून आपण स्वीकारत आहोत, असे चित्र तिच्या डोळयासमोर, उभे राहिले. त्यावेळी सुषमा कुठे असेल? असेल आपल्या नवऱ्यासोबत गर्दीत कुठेतरी. बिचारी! कुणाला माहीत असणार आहे ती सुषमा प्रधान कोण ती, तिने पुन्हा एकदा सहानभूतीचा कटाक्षा सुषमाकडे टाकला, पण तिला बिचारीला या गोष्टींची मुळीच कल्पना नव्हती ती आपली आपल्याच नादात आनंदात बदबडत होती.

घरापाशी आल्यावर शिष्टाचार म्हणून तिनं सुषमाला म्हटलं"ए, उद्या येताना तुझ्या होणाऱ्या "ह्यां" चा फोटो दाखवायला आणायला विसरू नकोस बरंका " आणि या वाक्याची अपेक्षाच असल्यासारखं लाजत लाजत सुषमाने ते कबूल केले आणि एकाद्या परीसारखी अवखळपणे नाचत ती घरात शिरलीसुद्धा!

आणि आपल्या उच्च विचारांच्या हिंदोळयावर बसून डोलतच निशा घरात शिरली, आणि आपल्या खोलीत शिरून सहज टेबलावर पडलेली आपण नुक्तीच लिहिलेली कविता वाचू लागली. आपल्याला इतकी छान कविता कशी स्फुरली याचे तिला इतके आश्चर्यच वाटले. साडी बदलून त्या आनंदाच्या धुंदीत ती स्वयंपाकघरात शिरली अन दादांच्या पहिल्याच वाक्याने भूकंप झाल्याचा भास तिला झाला. ''उद्या तुला पहायला येणार आहेत बरंका निशा! '' या दादांच्या वाक्याने तिच्या मनोरथांचे इमले सोसाट्याच्या वाऱ्याने पत्याचे बंगले असावेत इतक्या सहजतेने ढासळून टाकले. छान! म्हणजे माझे सगळे बेत, काहीतरी वेगळे करण्याचा निश्चय असा हवेतच विरून जाणार की काय? तिला एकदम म्हणावेसे वाटले, ''हे हो काय दादा, मला मुळी लग्नच करायचं नाही. मी मोठी कवयित्री होणार आहे. एक उत्कृष्ट सतार वादिका म्हणून चमकायचं आहे. ते सोडून तुम्ही मध्येच हे काय काढले आहे? पण तिच्या तोंडून मात्र इतकेच शब्द बाहेर पडले, :''इतकी काय हो घाई आहे, माझ्या लग्नाची? '' अन फुरंगटून ती तिच्या खोलीत जाऊन बिछान्यावर अस्वस्थ चित्ताने पहुडली. आईने तिला मारलेल्या हाकांकडे तिने मुळीच लक्ष दिले नाही. उलट डोळयातल्या पाण्याने उशी मात्र चिंब भिजवून टाकली, तिनं. शेवटी खोलीत पावलं वाजली. जड गंभीर पावलं! ती दादांचीच हे तिने ओळखलं. आणि घाईघाईने डोळयातले पाणी पुसून टाकले. पण दादांच्या तीक्ष्ण नजरेतून ते सुटले नाही

'ए, वेडाबाई' तिच्या पाठीवर हात ठेवीत समजावणीच्या सुरात ते म्हणाले, ''अगं ए निशू, लगेच कोण तुझं लग्न करायला निघालयं? उद्या ते येतील म्हणजे, तसं त्यांच्याकडूनच विचारणा झाली म्हणूनच केवळ देखावा करायचा. तुझ्यावर सक्ती

थोडीच कोणी करणार आहे? पण त्यानी विचारल्यावर एक्दम नाही कसं म्हणायचं म्हणून बोलावलं झालं “

’खरंच का हे? ” आनंदाने दादांकडे बघून तिने म्हटले.

“अगदी खरं, तुला तर अनुष्का शंकर, अनुपमा भागवत यांच्यासारखं फीमेल सितारिस्ट व्हायचं आहे ना? मग लग्न करून कसं चालेल? ’

खरच आहे दादांचं. नाहीतरी तेवढा तरी शिष्टाचार पाळायलाच हवा, पण दादांनी एवढा समजूतदारपणा दाखवला तरी आई मात्र म्हणाली, ”हे गं काय तुझं? लग्न न करण्याचं काय खूळ घेतले आहेस डोक्यात? पोरीच्या जातीला कसं वेळच्यावेळी लग्न झालं म्हणजे बरं ”

“पण मला मुळी लग्नच करायचं नाही “ दादांचा पाठिंबा असल्यामुळे आता तिला आपले म्हणणे ठामपणे सांगायला काहीच जड गेले नाही. आणि खरेच दादांनी तिला भरभक्कम पाठिंबाच जणु देत आईकडे बघून म्हटले,म्हटले,

“अहो, तो तुमचा जमाना गेला आता, आता तिला मुळीच सक्ती करायची नाही. एक दिवस बडी सतारवादक बनेल तुमची निशा त्यावेळी समजेल, आपण किती योग्य निर्णय घेतला ते! ”

“थॅन्क्यू दादा, तुम्ही तरी माझ मन बरोबर जाणलंत “ हे ती मनातल्या मनात म्हणाली. पण आई मात्र म्हणाली”जे काय सतार वादक फिदक व्हायचंय ते हो म्हणावं लग्नानंतर “

“आणि हो बरं आठवलं अगं तुझे हे पण गिटार वाजवतातच मग बसा की जोडीनं टिंग टोंग करत” सुधीरनं तेवढ्यात फुसकुली सोडली

“अहो महाराज, उगीच आपलं शहाणपण पाजळू नका. सितार आणि गिटार म्हणजे तुला काय बॅट आणि बॉल वाटली की काय? ” त्याला गप्प बसवत ती म्हणाली.

बिचाऱ्या आईला काय कळणार आपल्या डोक्यातली खळबळ, या विचाराने ती गप्प बसली. हो नाहीतरी आईला कसं सांगायचं की मला मोठी कवयित्री, सतार वादिका व्हायचयं, तिच्यासारखं रांधा, वाढा, उष्टी काढा हेच करत बसायचं नाही. पण त्यामुळे तिचं जेवणात मुळीच लक्ष नव्हतं, आईच्या ते लक्षात आलेच आणि तिने विचारलेच, ”काय झालंय काय निशे तुला आज? ” आणि एकदम डोक्यात प्रकाश पडल्यासारखं पुढे ती म्हणाली, ”हं आलं लक्षात, उद्या ते येणार आहेत म्हणून की काय? ”

“ ए आई बस्स हं, एकदा सांगितले ना मी लग्नच करणार नाही म्हणून? ” जरा घुश्श्यातच ती म्हणाली.

“बर बाई, तू म्हणशील तर तसं, पण माझ्यावरचा राग जेवणावर काढू नकोस एवढेच. ”

त्या रात्री स्वप्नातही तिला हीच दृश्ये दिसत होती. कुठे लोक तिच्या कवितासंग्रहासाठी आसुसले होते, तर दुसरीकडे लोक”हम निशादेवीसे मिलना चाहते है, उनकी सितारका कॉन्सर्ट आयोजित करना चाहते है “ म्हणत तिच्या दारात

धरणे धरून बसले होते. कुठे कविसम्मेलनाच्या अध्यक्षपदाचा आग्रह तिला होत होता तर दुसरीकडे तिच्या सतारीचे ऑडिओ, वीडिओ काढायला मिळावे म्हणून म्यूझिक कंपन्यात चढाओढ लागलेली दिसत होती.

त्यामुळे सकाळी उठल्यावर आपल्याला पहाण्याचा फार्स होणार याचे तिला वैषम्य वाटलेच. पण केवळ दादांच्या शब्दासाठी हसतमुख रहायचं हेही तिनं मनाला बजावलं व ती तयारीला लागली. प्रथम तिला वाटलं एकादी मामुली साडी नेसावी. अर्थात त्यावर आईने अपेक्षेप्रमाणे कोलदांडा घातलाच आणि नंतर तिलाही वाटलं, दाखवून घ्यायचच असेल तर त्यात कमीपणा का घ्यायचा? उलट त्या मुलाला अशी चांगली मुलगी न मिळाल्याची हळहळ वाटायला हवी. त्या ईर्षेने वेषभूषा करण्यात आपले दोन तास कसे गेले तिला कळलेही नाही. शेवटी दादाच ’काय निशा आटोपलं की नाही? ” म्हणून विचारत आले तेव्हां तिची तारांबळच उडाली. परीक्षेत शेवटच्या दहा मिनिटांची घंटा वाजल्यावर मुलांची उडते तशी! पण सगळा साजशृंगार आटोपला आणि तिनं आरश्यात पाहिले तेव्हां ती स्वत:च खूष झाली, मग आई आणि दादा तर काय विचारयलाच नको.

” एका माणसाची ऐट काय भलतीच आहे बुवा, बहुतेक जो कोणी भाग्यवान हिला बघायला येणार तो आई दादांच्या परवानगीची वाट न पहाता हिला पळवूनच नेणार “ असं सुधीरनं म्हटल्यावर मात्र तिला त्याचा मुळीच राग आला नाही याचं तिला आश्चर्यच वाटलं. उलट “प्रथम तुज पाहता” या गाण्याची मात्र आठवण झाली. वरवर मात्र तिने त्याच्यावर हात उगारून ’चल चावट कुठला” म्हणून आपला खोटा राग व्यक्त केला.

पण मनातल्या मनात तिनं हेही ठरवलं की जो कुणी पहायला येणार आहे त्याने काही प्रश्न विचारलेच तर त्याला अशी उत्तरं द्यायची की कुठून आलो पहायला असे त्याला झाले पाहिजे, पण त्याच बरोबर आईदादांचा विचार मनात आल्यावर तसे करणे योग्य नाही हेही तिला जाणवले.

बाहेर मंडळी आल्याची वर्दी मिळाली व आईने खाद्यपदार्थांनी भरलेला ट्रे तिला दिला व तो घेऊन ती बाहेर आली. अन समोर बसलेल्या उंचनिंच, गोऱ्यापान, कुरळया केसांच्या युवकाकडे तिनं पाहिल्यावर मात्र आपण अगदी शुद्धीत नसल्यासारखेच वागलो हे मागून तिच्या लक्षात आले. मग त्याच्या प्रश्नास आडवी तिडवी उत्तरे देण्याचे तर दूरच उलट त्याने विचारलेल्या साध्या साध्या प्रश्नांना उत्तर देतानाही आपण कसे बावरून गेलो होतो हे आठवून तिला स्वत:चाच राग आला. आणि आश्चर्यही वाटले. आपल्या लग्न न करण्याच्या निश्चयाला कुठेतरी तडा लागू लागला आहे असेही तिला जाणवू लागले.

पण तो गेल्यावर तिनं बेपर्वाईनं आपल्या मनाशी घोकलं, ''हूं असेल तो गोरा आणि रुबाबदार, असले हजारो तरुण जगात आहेत म्हणून काय मी माझ्या महत्वाकांक्षेवर पाणी सोडावं की काय, ते काही नाही एकदा ठरलं म्हणजे ठरलं मी लग्न करणार नाही म्हणजे नाहीच. पण कितीदाही हाकलल तरी फिरून फिरून गुळावर बसणाऱ्या माशीप्रमाणे तिचं मन त्या तरुणाच्या हसऱ्या चेहऱ्याचा, त्याने हसत हसत विचारलेल्या प्रश्नांचा आणि मध्येच काहीतरी विनोदी बोलून वातावरण मोकळे करण्याच्या केलेल्या प्रयत्नाचा विचार करण सोडत नव्हतं व यावर काय करावं हे काही तिला सुचत नव्हतं.

’ हं मग काय झालं त्या स्थळाचं? ”हा प्रश्न आईने दुसऱ्या दिवशी संध्याकाळी दादांना विचारलाच. त्यावेळी ती शेजारच्याच खोलीत होती. क्षणभर आपला श्वासोच्छवास थांबल्याचा भास तिला झाला, त्याचे आपल्याविषयी मत काय झाले असेल या कल्पनेने. पण दुसऱ्याच क्षणी ती बेपर्वाईने ती मनाशी म्हणालि, ”ऊं ssमला लग्नच करायचं नाही तर काय करायचंय त्याच्या मताशी? ” पण कानांनी आपले काम केलेच.

“अगं होणार काय, मुलाला मुलगी पसंत आहे, आपली निशा कुणाला पसंत पडणार नाही असं वाटतं का तुला? ”

“मग घोड कुठं पेंड खातंय की हुंडा जास्त मागत आहेत? ”

“ छे छे हुंडा मागणाऱ्यातली ती माणसं आहेत का? उलट त्याना निशा इतकी आवडलीय की दोन्ही अंगाचा खर्चही करायला तयार आहेत. ”क्षण भर आपलं हृदय आनंदानं नाचत आहे असा भास तिला झाला. पण मग लगेच अवखळ मुलाला चापट देऊन गप्प बसवावे तसे तिने मनाला बजावले “चुप, तुला लग्न करायचं नाही, तुला मोठं व्हायचंय, निशा देशमुख हे नाव गाजवायचंय. हॊ निशा देशमुख—निशा देशमुखच!

’मग इतकं असेल तर करून टाकावं ना तिचे दोनाचे चार हात, इतकं चांगलं स्थळ पुन्हा कुठलं मिळायला? ”आईचा आवाज ऐकू आला.

“असं म्हणतेस? पण निशा काय म्हणतेय ते नको का पहायला? ” दादांच्या या उत्तराने तिला धीर आला. पण आईचे पुढले वाक्य घणाघाती होतं.

“तिला काय कळतंय? पोरीची जात ती लग्न वेळच्या वेळी व्हायलाच हवंय, लग्न झाल्यावर हो म्हणावं काय ते अरिष्ट का काय ते “

“ अगं अरिष्ट नाही लेडी सितारिष्ट “

“हो तेच ते सिरिष्ट की फरिष्ट, त्यातलं मला नाही कळत काही”

“असं म्हणतेस? ” येवढेच बोलून दादा गप्प बसले. यानंतर ते आपल्याला आपल्या खोलीत येऊन विचारतील तेव्हां त्याना नकार कोणत्या शब्दात द्यायचा याचा ती विचार करू लागली होती. दादांवर तिचा पूर्ण भरोसा होता. पण ते तिच्या खोलीकडे फिरकलेसुद्धा नाहीत अन मग मात्र तिचा धीर खचला. ”संपले, माझं ध्येय, महत्वाकांक्षा सगळयांचा चुराडा झाला. शेवटी दादांनीही मला दगा द्यावा, फसवावं ना? पण तावातावाने त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या वचनाची त्याना आठवण करून देणं शक्य असताना तिचं पाऊल जड होऊन हलायला तयार नाही असे तिला जाणवले. या घटनेमुळे आपल्याला भयंकर दु:ख होईल असं तिला वाटत होतं पण कसं काय कोण जाणे दु:ख न होता मनाच्या एका कोपऱ्यात आपल्याला आनंदाच्या उकळयाच फुटताहेत असं तिला जाणवलं

मात्र सर्व लग्नात दु:खी चेहऱ्यानं वावरायचं, मुक्याचं व्रत घेऊन रहायचं तिनं ठरवलं. सप्तपदी करताना आपल्या ध्येयाला आपण पायाखाली तुडवीत चाललो आहोत अश्या कल्पनेत रहायचं अन गृहप्रवेशच्या वेळी उंबरठ्यावरचे माप पायाने ढकलताना आपल्या महत्वाकांक्षेचे मापच आपण लाथाडत आहोत अशी कल्पना करून हे दु:ख सहन करायचे असे तिने ठरवले, पण प्रत्यक्षात घडले वेगळेच. तिच्या

चेहऱ्यानं व मनानंही तिला दगा दिला. सगळ्यांना वाटलं ही अगदी मजेत, आनंदात आहे. जिची थोड्या दिवसापूर्वी तिनं कींव केली त्या सुषमेच्या थट्टेनं तिच्या मनाला नाजुक गुदगुल्या पण झाल्या.

लग्नानंतरच्या पहिल्या रात्री तर त्या उंच्यापुऱ्या, रुबाबदार युवकानं केलेल्या पहिल्या स्पर्शाने तिच्या अंगावर गोड शहारे उमटले. कधी नव्हती इतकी तिची काया पुलकित झाली. आपण अनुष्का शंकर किंवा सरोजिनी नायडू होणार नाही आणि सुषमा प्रधान सारखी सामान्य स्त्रीच रहाणार याचं तिला मुळीसुद्धा वाईट वाटलं नाही अन् असं व्हावं याचच तिला वाईट वाटू लागलं, ही काय जादू आहे याचं कोडं काही केल्या तिला उलगडेना.

तश्यात त्याने जेव्हां "अहो उषाराणी आमच्याकडे पहायचे देखील नाही का?" असे म्हणत तिची हनुवटी नाजुकपणे वर उचलली तेव्हां ज्या निशा देशमुख या नावाचा आपणास इतके दिवस अभिमान वाटत होता तेसुद्धा बदलले गेल्याचे तिच्या लक्षात आले आणि खरोखरच कसली एवढी जादू घडली होती कोण जाणे पण जादूनं भारल्यासारखी आपली अवस्था झालीय एवढेच तिला कळले. तिला वाटले आपलं ध्येय, महत्वाकांक्षा, व्यक्तिमत्व हे सगळं काही एका पेटीत बंद करून ती या माणसांनी एका नदीत फेकून दिलीय. नदीच्या धारेला लागून ती आपल्यापासून दूर दूर चालली आहे अन् जादूनं भारलेल्या माणसासारखं अगतिकतेने, असहाय्यतेने पण निर्विकारपणे आपण ते पहात आहोत.

# २. उगीच!

त्या वेळी मी पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत होतो. शेवटचे वर्ष होते. परीक्षा जवळ आली होती. पहिला वर्ग मिळणे आवश्यक होते. त्यामुळे अभ्यास जोरात चालू होता. वसतीगृहाजवळ एक शंकराचे मंदीर होते. अतिशय रम्य स्थान आणि आजच्यासारखी वर्दळ नसल्याने त्या काळी खूप शांत पण वाटे, दररोज सकाळी स्नान करून या मंदिरात जाऊन शंकराचे दर्शन घेऊन मगच अभ्यासाला सुरुवात करण्याचा माझा रोजचा नियमच जणू बनला होता. मनावरील भाविकतेचे संस्कार अजून नष्ट झालेले नव्हते, त्यामुळे या दिनक्रमात एक प्रकारचा मानसिक आनंद मिळत असे.

सकाळी साडेआठ ते नऊ ही माझी मंदिरात जाण्याची वेळ असायची. पण एक दिवस काही कारणाने नेहमीपेक्षा थोडा उशीर झाला, आणि वसतीगृहातून बाहेर पडायलाच साडेनऊ वाजले. नंतर जेवण करून त्या दिवशी एका प्राध्यापकानी मुद्दाम बोलावलेल्या ज्यादा वर्गालाही जायचे होते त्यामुळे मी घाईघाईने निघालो. रस्ता फक्त पंधरा मिनिटांचाच! भरभर ओलांडून मी मंदिरात पोचलो. आत जाऊन महादेवाच्या पिंडीसमोर उभा राहून डोळे मिटून हात जोडल्यावर एकदम शांत वाटले. दर्शन घेऊन बाहेर पडलो अन् एकदम मला ती दिसली. रस्त्याच्या त्याच बाजूच्या बसथांब्यावर बसची वाट पाहत उभी होती. पांढरीशूभ्र साडी, काळा ब्लाउज आणि

काळी पर्स या तिच्या ठरलेल्या वेषभूषेत! तिची नाजुक मूर्ती मलाच काय पण आख्ख्या होस्टेलच्या मुलांना सुपरिचित होती. मी कोण हे मात्र तिला माहीत असण्याची शक्यता नव्हती. ती तरी बिचारी किती म्हणून पोरांना लक्षात ठेवणार? सांगायचे कारण म्हणजे त्या दिवशीपासून माझी मंदिरात जाण्याची वेळ बदलली अन मार्गही थोडा वाकडा झाला.

आजपर्यंत एकादे दिवशी शंकरास जाणे राहिले तरी मला त्याचे काही विशेष वाईट वाटत नसे पण त्यादिवशीपासून मात्र तसे होऊ नये याची जास्तीत जास्त काळजी मी घेऊ लागलो आणि तसे झालेच तर मात्र काहीतरी चुकल्यासारखे किंवा हरवल्यासारखे वाटे. दररोज तिच्या दृष्टीच्या टप्प्यातून जाताना एक वेगळाच आनंद व्हायचा, एकादे दिवशी ती बसस्टॉपवर दिसली नाही तर माझा देवदर्शनाचा काळ थोडा लांबायचा ज्यायोगे निदान बाहेर पडताना तरी तिचे दर्शन व्हावे.

तिलाही माझी ही (शंकर ) दर्शनोत्सुकता परिचित झाल्यासरखे दिसले, कारण मी येण्यापूर्वी ती बसस्टॉपवर उभी असली तर तिचे डोळे माझ्या येण्याच्या वाटेकडे असत. पण मी दिसताच ती झटकन् मोहरा बदलून बसची वाट पाहत असल्याचा बहाणा करीत असे. कदाचित( किंवा निश्चितच) हा माझा तर्कच असेल पण तो मला आनंददायक होता शिवाय त्याला बाधा आणणारी काही घटना न घडल्यामुळे तो बदलण्याचे कारण वाटले नाही.

तिच्याशी बोलणे काढावे असे वाटे पण परत ती नाही बोलली तर काय घ्या असे वाटायचे आणि नव्वद टक्के शक्यता तीच होती. पण मनातल्या मनात खूप संभाषणे जुळवून ठेवली होती. एकाद्या दिवशी मला जाता आले नाही तर वाटे

दुसऱ्यादिवशी ती विचारेल, "काय हो काल दिसला नाहीत? " त्यावर मी उत्तर द्यावे, “देवसुद्धा भक्ताच्या दर्शनासाठी उत्सुक असतो याची कल्पना नव्हती" यावर मुद्दामच काही न कळण्याचा आविर्भाव आणून ती म्हणेल, "दगडाचाच देव, त्याला काय उत्सुकता असणार? " मग तिचा गैरसमज दूर करण्याच्या उद्देशाने मी म्हणेन, "मी देवळातील नाही देवळाबाहेरील देवीविषयी बोलतोय" पण सगळी संभाषणे मनातच राहिली, बोलून दाखवण्याची वेळ कधी आलीच नाही.

काही झाडाना फक्त फुलेच येतात. आमच्या परिचयाच्या वेलीलाही फक्त स्मिताचे एकुलते एक फूल लागले शब्दांची मधुर फळे तिच्या नशिबी नसावीत.

शेवटच्या वर्षाचा शेवटचा महिना परीक्षेच्या गडबडीत कसा गेला कळलेही नाही. अपेक्षेप्रमाणे पेपर्स उत्तम गेल्याच्या आनंदात आईवडील ,भावंडांच्या प्रेमळ सहवासाचा आनंद लुटण्यासाठी परीक्षेनंतर लगेचच गावाकडे गेलो. पण मनाच्या कुपीत तिच्या स्मितहास्याच्या अत्तराचा सुगंध जपून ठेवीतच !

निकालाच्या दिवसापर्यंत गावाकडेच होतो. स्वच्छंदीपणे वागण्याचे सौख्य उपभोगण्याचा जीवनातील शेवटचाच काळ होता तो! निकाल अपेक्षेप्रमाणे उत्तम लागला, पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन गावची शान वाढवली होती. लगेचच पुढील आयुष्याचा मार्ग निश्चित करण्यासाठी पुण्यास गेलो. मनात आनंद भरला होता. सकाळी शुचिर्भूत होऊन बाहेर पडताना पावले आपोआपच शंकराच्या मंदिराकडे वळली. ती वेळ तिच्या तेथे असण्याची नव्हती त्यामुळे ती दिसावी अशी इच्छा असली तरी ती दिसेल अशी अपेक्षा नव्हती, पण काही क्षण कल्पवृक्षाची सावली लाभण्याचेच असतात, अन खरोखरच समोरच्या बसथांब्यावर ती दिसली, जणू

माझीच वाट पाहत होती. तिच्याकडे पाहून ओळखीचे हास्य केल्यावर तीही प्रत्युत्तरादाखल हसली नि म्हणाली, "काय लागला निकाल? " आणि मी निकाल सांगताच " अभिनंदन" असे हळूच पुटपुटली. तिला थँक्स म्हणायचेही भान राहिले नाही. पण मग भानावर येऊन कसेबसे तिचे आभार मानले. खूप काहीतरी बोलावेसे वाटत होते पण तसाच उभा राहिलो. तिचीही अवस्था तशीच झाली असावी. काही क्षण असेच गेले आणि जाता जाता बसला बोलावून गेले. बसमध्ये चढता चढता तिने ओळख राहू द्या असे म्हटल्याचे पुसटसे जाणवले.

त्यानंतर पाच वर्षे उलटली. नोकरीसाठी मी वणवण करीत अखेर माझ्या गावच्या जवळ असलेल्या महानगरात तात्पुरता स्थायिक झालो होतो, अर्थातच वधुपित्यांच्या नजरेत माझे स्वातंत्र्य सलत होते आणि एका बेसावध क्षणी त्यांच्यापैकी एकाच्या हल्ल्याला मी बळी पडलो.

माझी पत्नी होणारी कन्या पुण्यातील असल्याने लग्न पुण्यात पार पडले हे ओघानेच आले. लग्नानंतर नवपरिणीत पत्नीस घेऊन माझ्या कॉलेजचे होस्टेल दाखवावे म्हणून तिला घेऊन बाहेर पडलो, आणि समोरून ती येताना दिसली. हिरवीगार साडी तिला साडी शोभून दिसत होती, तीही आता एकटी नव्हती. बरोबर तिचा नवराच असावा.

ती दोघे समोरून आमच्या अगदी जवळ आली. क्षणभर काहीतरी बोलावे असे वाटून गेले, तिलाही तसेच वाटत असावे. पण त्या विचारातच आम्ही एकमेकास ओलांडले. आणि मग मला उगीचच चुटपुट लागली, मी न राहवून मागे वळून पाहिले. मजा म्हणजे तीही माझ्याप्रमाणेच मागे वळून पाहत होती. मी

समाधानाने हसलो. आणखी तिच्याही तशाच प्रतिसादामुळे आणखीच सुखावलो आणि मग पुढे बघून चालू लागलो. माझे मागे वळून बघणे आणि हसणे माझ्या पत्नीच्या लक्षात येऊन तिने विचारले " काहो, का हसलात? ""काही नाही उगीच" मी म्हणालो. दुसरे काय उत्तर देणे शक्य होते? मला खात्री आहे, तिच्या नवऱ्यानेही तिला विचारले असणार " का ग, का हसलीस? " आणि तिनेही उत्तर दिले असणार"काही नाही उगीच! "

# ३. तिची सतार --!

वाद्यांच्या संग्रहाच्या बाबतीत माननीय आबासाहेब मुजुमदारांशी तुलना करावी इतकी नाहीत तरी बरीच वाद्ये माझ्याकडे जमली असती. फक्त त्यांचा संग्रह करण्याचा दृष्टीकोन मी ठेवला नाही इतकेच. संग्रहासाठी वाद्ये खरेदी करण्यासारखी घरची आर्थिक परिस्थिती नसतानाही वडिलांना कीर्तन करण्याची आवड असल्याने घरात तबला, पेटी झांज व चिपळ्या एवढी वाद्ये तरी हमखास असत. वडील स्वतः झांज, चिपळ्या आणि गरज पडल्यास तबला ही वाद्ये वाजवू शकत. त्याना भजन करायला तेवढी पुरत. गावात इतर कोणत्याही आर्थिक दृष्ट्या संपन्न घरातही तबला व पेटी ही वाद्ये क्वचितच असत आणि असलीच तरी सुस्थितीत असण्याचा योग नसेच. ती आमच्याकडे मात्र या कीर्तनाच्या व्यासंगामुळे हमखास असत, त्यामुळे बरेच वेळा आमच्याकडली वाद्ये ही मंडळी घेऊन जात आणि हमखास बिघडवून परत करत, त्यामुळे ही वाद्ये दुरुस्त करणारा एकमेव कारागीर --- घडशी, आणि त्याचे नाव होते टोमदेव उर्फ टोम्या--- तो आमच्या वाद्यांच्या दुरुस्तीवरच जगत असेल इतक्या वेळा ती दुरुस्त करावी लागत. घरात वाद्ये असल्यामुळे मीही त्यांच्यावर हात फिरवू लागलो होतो.

एकदा मुंबईला गेल्यावर माझा संगीत छंद माहीत असल्यामुळे एक माउथऑर्गन वडिलांनी माझ्यासाठी आणला. पिशवीत घालून आणायला सोपा

आणि त्यावेळी बराच स्वस्तात मिळाल्यामुळे असेल कदाचित! त्यापूर्वी मी फ्ल्यूटही वाजवण्याचा प्रयत्न करू लागल्यामुळे जत्रेत मिळणारा पितळी फ्लूट घरी आलेला होताच. वाजवता येते ते वाद्य या व्याख्येने वाद्य या सदरात बसणारी शिट्टी व पिपाणी ही वाद्ये संगीताची कोणतीही परंपरा नसणाऱ्या घरातही गावाकडील जत्रेत घ्यावी लागतच त्याशिवाय जत्रेची पूर्तता होतच नसे. त्यामानाने फ्ल्यूट किंवा पावा हा प्रकार घेणारी घरे संगीताचा थोडा बहुत कान असणारी असत त्यामुळे आमच्या बऱ्याच मित्रांकडे तो असायचा आणि बहुधा त्यांची धाकटी भावंडे कर्कश आवाज काढण्यासाठी किंवा मारामारी करण्यास त्याचा वापर करीत आणि त्याच्या आया जर फुंकणी सापडत नसेल तर! . या त्याच्या बहुविध उपयोगामुळे व आवाजाची कर्कशता काही अंशी कमी असण्यामुळे शिवाय त्यातूनच एकादे पोरगे खरोखरच काही बरे सूर त्यातून काढण्याची शक्यता असल्यामुळे बऱ्याच घरात घेतला जाणारा हा प्रकार जत्रेतच मिळणाऱ्या शिट्टी किंवा पिपाणीपेक्षा खूपच कमी त्रासदायक असे.

त्याच काळात शेजारी माझ्या मित्राचा भाऊ बुलबुलतरंग (बॅंजो) वाजवत असे. तसे ते वाद्य हार्मोनियमपेक्षा सोपे होते. शिवाय वजनाने हलके आणि किंमत या सदरात आमच्या आर्थिक मर्यादेत बसणारे, त्यामुळे पुण्यात शिकायला गेल्यावर ते पण मी विकत घेतले. त्यावेळी माझे बरेच मित्र मला वाजवायला सांगत माझ्या खोलीतील सहकाऱ्याला तो संगीताचा शत्रु नसला तरी दोस्त खासच नसल्यामुळे आणि शिवाय माझ्यापेक्षा अभ्यास करण्याची त्याला अधिक आवड असल्यामुळे माझे बुलबुलतरंग व फ्ल्यूट हे दोन्ही त्रास सहन करावे लागत व त्यापायी त्याचे वात्ताडन कधी कधी मला !

मधल्या काळात आमच्या गावाकडून वडिलांच्या स्थावर जंगम इस्टेटीमधून एक चौरंग, काही लाकडी पाट त्याचबरोबर तबल्याची दोन खोडेही आली त्यापैकी एक खोड टोम्याला देऊन त्याबदली वडिलांनी एका खोडावर पूड चढवून घेतले व अश्या प्रकारे घरात आणखी एका वाद्याची भर पडली. फ्ल्यूट हे वाद्य वजनास हलके असल्यामुळे व बऱ्यापैकी स्वस्त असल्याने बऱ्याच वेळी नवीनच फ्ल्यूटची खरेदी केली जायची व त्यामुळे सगळे फ्ल्यूट राहिले असते तर त्यांची एक माळच करून गळ्यात घालून बॅगपाइपर सारखे मला वाजवत फिरता आले असते. अश्या प्रकारे मी नोकरीस लागेपर्यंत दोन तबले पण डग्गा मात्र एक, एक पेटी, चिपळया, झांज, दहा बारा फ्ल्यूट, एक माउथऑर्गन एक बँजो अशी अनेक वाद्ये घरात जमली होती.

नोकरी करू लागल्यावर माझ्या वाद्यप्रेमाने (म्हणजे वाद्ये विकत घेण्याच्या) उचल घेतली. त्यावेळी पंडित रविशंकर यांच्या सतारीची मोहिनी मनावर पडली होती सतारीला फारशी जागा लागत नाही, घराच्या कोठल्याही कोपऱ्यात राहू शकते हा सतारीच्या बाबतीत माझ्या दृष्टेने महत्त्वाचा पैलू होता. त्यामुळे औरंगाबादहून पुण्यास गेलो तेव्हां जवळ पैसे नसताना मित्राकडून पैसे घेऊन मी ती विकत घेतली आणि घरात आणखी एका वाद्याची भर पडली. औरंगाबादला सतार शिकवणारे त्यावेळी कोणी नव्हतेच म्हटले तरी चालेल. त्यामुळे अंदाजाने व सतारीचे पुस्तक घेऊन जमेल तसे वाजवणे चालू होते.

अश्यामध्ये अचानक मातोश्रींनी फतवा काढला की आता तिला घरातला भार उचलणे दिवसेंदिवस अवघड होत आहे, तेव्हां तिच्या मदतीसाठी एक माणूस घरात आणावे । तसे बाहेरील लोकांनाही माझे एकटे रहाण्याचे सौख्य पहावत नव्हतेच.

त्यांच्या विचारण्याला फारसे महत्त्व देत नसलो तरी तिच्या सेवानिवृत्तीच्या या प्रस्तावालाही मी फारसे मनावर घेत नव्हतो पण अचानक आलेल्या एका पत्राने माझ्या निश्चयास सुरुंग लावला. त्यात पत्रलेखकांने आपल्या मुलीसाठी स्थळ म्हणून माझी निवड केल्याची माहिती व नेहमीप्रमाणे कन्येचे गुणवर्णन होते, तिच्या इतर गोष्टींपेक्षा संगीतात पदवी धारण करून ती सतार वाजवते ही गोष्ट माझ्या अधिक मनात ठसली। अगदी पु. लं च्या रावसाहेबांना जसे लेडी सितारिष्टचे कौतुक वाटते तशीच परिस्थिति माझी झाली. लग्नानंतर या लेडी सितारिस्टकडून सतारीचे धड़े घेता येतील अशी आशा वाटली तसेच सतारींची जुगलबंदी करता येईल (मला स्वत;ला सतार वाजवता येत असो वा नसों! ) हा विचार मनात आला की काय कुणास ठाऊक! . लग्नानंतर जुगलबंदी होते पण तो प्रकार करण्यासाठी वाद्याची आवश्यकता नसते याची किंवा सितारिष्ट हे अरिष्टही होऊ शकते याची कल्पना अजून यायची होती. .

परंतु या कलागुणाचा परिणाम झाल्यामुळेच की काय मी या स्थळाला होकार दिला. पण तिला मात्र तिच्या आयुष्यातील एक महत्वाची संधी गमवावी लागली कारण त्या वेळी लग्न की करियर ( जादू मधली निशा} यांच्या संघर्षात मुलींच्या बाबतीत लग्न या संधीलाच प्राधान्य असे. करिअर काय करता येईल लग्नानंतरही. खरे म्हणजे तिला त्यावेळी वानस्थली विद्यापीठात सतार या विषयातच पुढे शिकण्याची संधी प्राप्त झाली होती. पण आता लग्न ही संधी महत्त्वाची ठरली व तिला विद्यापीठा ऐवजी घर सोडून आमच्या घरात प्रवेश करावा लागला.

लग्नानंतर पहिली गोष्ट जर काय लक्षात आली असेल ती आमच्या छोट्या घरात दोन सतारी ठेवणे ही गोष्ट एका म्यानात दोन तलवारी ठेवण्याइतकीच अवघड आहे. तबला, पेटी व इतर वाद्याप्रमाणे ते वाद्य कपाटात ठेवण्याइतके मोठे कपाट घरात नव्हते आणि तसे कपाट घेतले तर ते ठेवण्याइतके घर मोठे नव्हते. अर्थात पहिली संक्रांत माझ्याच सतारीवर आली. कारण माझे वादनकौशल्य असे काही खास नव्हते की आपलेच वाद्य पाहिजे अशी परिस्थिती असावी. शिवाय त्याविषयी मी फारच समजुतदार व दिलदार असल्याने माझी सतार लगेचच कोणाला तरी देऊन टाकण्यास मी तयार झालो, कारण नाही म्हटले तरी लेडी सितारिष्टच्या सतारीची व त्या सतार वादनाची तारीफ अनेकदा ऐकल्यामुळे तिच्या सतारीला बाहेरचा रस्ता दाखवणे शक्यच नव्हते. मी मात्र सतारीतूनच काय पण सतारवादनातूनही मुक्तता घेण्याची लगेचच तयारी दाखवली त्यामुळे आमची सतारीची जुगलबंदी होण्याची शक्यता मी रद्दबातल केली ही गोष्ट मी पारच विसरून गेलो. लेडी सितारिष्टच्या आगमनातील नव्या नवलाईचा परिणामही असावा.

लेडी सितारिष्टला सतार काढायचा उत्साह असला तरी आमच्या मातु:श्रींनी खरोखरच निवृत्ती जाहीर केली व संसाराची धुरा तिच्या खांद्यावर टाकल्यामुळे सतारीसाठी तिचा खांदा मोकळा होणे अवघड होत होते. आईने कामात लक्ष घालून सुनेला सतार वाजवत बस म्हणायचा तो जमाना नव्ह्ता. आणि आपल्या सासूला काम करायला लावून सतार वाजवत बसण्याची मानसिकता येण्याइतकी सून निर्ढावलेली नव्हती, तिचा तो पिंडही नव्हता. अर्थात सतारीवरील गवसणी काढून

तिच्या तारा जरा सुरात मिळवेपर्यंत एकाद्या कामाची आठवण होऊन सतार पुन्हा गवसणीत घातली की त्या दिवसाच्या रियाज संपायचा.

लग्नानंतर थोड्याच दिवसात सुदैवाने पत्नीच्या माहेरची एक मैत्रिण औरंगाबादला बदलून आली आणि योगायोगाने तिलाही सतार वादनात रस होता कधीकाळी ती पं. रविशंकरांच्या क्लासमध्ये गेलेली होती, अर्थात तो एक संस्कार तिच्यावर झाला होता इतकेच आणि त्यामुळे सतार वादनातील काही तथ्ये व पथ्ये तिला माहीत होती. सुदैवाने ती मात्र बड्या घरात असल्यामुळे नोकर चाकर तिच्या दिमतीस होते आणि त्यामुळे सतार गवसणीतून काढून पुढे काही वेळ वाजवण्यासही तिला वेळ मिळत असे. माझ्या पत्नीचा सतारीचा व्यासंग तिला माहीत होता. "एकसे दो भले" हे संगीतात तर नेहमीच खरे असते आणि त्यामुळे तिने माझ्या पत्नीस आपल्या घरी येऊन सतारीचा रियाज करण्याचा आग्रह केला. इतकेच काय पण आपली गाडी पण ती तिच्यासाठी पाठवू लागली.

काही काळ सुनेला घरातून पाठवायला आईलाही फार जड वाटले नाही. त्यामुळे तिच्या सतारीस पुनरुज्जीवन मिळाले. दोघी मैत्रिणी एकत्र बसून खरोखरच सतार याच एकमेव उद्योगात वेळ घालवू लागल्या आणि माझ्या पत्नीचा सतारीचा अभ्यास थोडाफार शक्य होऊ लागला. तरी सतारीवर बोटे फिरवण्यासाठी बोटांची निगा राखणे आवश्यक म्हणजे बोटांना साबण किंवा कपडे किंवा भांड्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरीपासून जपणे आवश्यक असले तरी ते फारच थोड्या अंशी शक्य होते कारण "तुझा संसार आता तूच बघ बाई "म्हणून आईने संसारातून पूर्ण अंग काढून घेतले होते आणि माझा संसार हा फक्त दोघाचा नव्हता तर माझी

धाक्टी भावंडे शिकत असणारी, आई व आम्ही दोघे असा सहासात जणांचा कबिला होता व या सर्वांची धुरा सांभाळण्याचे काम लेडी सितारिष्टकडे होते. त्यामुळे बोटांची काळजी घेणे हा विचारही करणे निषिद्ध नसले तरी अशक्य कोटीतलाच होता. त्यामुळे चरे पडलेल्या बोटांनी सतार वाजवणे ही शिक्षाच होती म्हटले तरी चालेल. त्यावेळी बुद्धदेवदासगुप्ता किंवा अब्दुल हलीम जाफरखॉं हातातून रक्त येईपर्यंत रियाज करीत असत याचा दाखला देणे शक्य असले तरी अगोदरच बोटांची राख करून टाकणाऱ्या पावडरी वापरून त्याच बोटांनी सतार वाजवणे बुद्धदेव अगर अब्दुल हलीम खान साहेबांना तरी जमले असते का हा प्रश्नच होता. अर्थात इतक्या अनुकूल परिस्थितीत लेडी सितारिष्टला सितार गवसणीत गुंडाळून ठेवणेच शक्य होते.

पाठॉपाठ तिला एक ओझे काही दिवस पोटात व त्यानंतर कडेवर वागवण्यास मी उद्युक्त केल्यामुळे सतारीवरील गवसणी फक्त कोणी संगीतात रस घेणारी व्यक्ती घरी आली आणि कोपऱ्यात ठेवलेली सतार पाहून ही कोण वाजवते असे विचारल्यावर "माझी पत्नी " असे सांगावे लागे आणि त्यांचा फारच आग्रह झाल्यावर गवसणीतून सतार बाहेर निघे. तिच्या बोटाला शक्य असेल तितका वेळ वाजविताना बोटातून रक्त व त्यामुळे डोळयातून पाणी निघेपर्यंत वाजवल्यावर सतारीची गवसणीत रवानगी व्हायची.

मुले मोठी होत गेल्यावर घरातल्या जबाबदाऱ्या वाढतच चालल्या. मोठे घर बांधल्यावर सतार ठेवायला जागा सापडल्यामुळे ती इतकी व्यवस्थित ठेवली जाऊ लागली की ती दृष्टीसमोर असल्यामुळे ती काढून वाजवण्याचा मोह होण्याची

शक्यताही दुरावली. तोपर्यंत तिच्या माहेराहून आणखी एक सतार आमच्या सासऱ्यांनी मुलीला वाजवायला बरी पडेल म्हणून की काय पाठवून दिली पण या दोन सतारींची जुगलबंदी कपाटातच काय ती होऊ लागली. मुले मोठी झाल्यामुळे जबाबदाऱ्यांचे ओझे थोडे कमी झाल्यावर औरंगाबादमधीलच एका प्रसिद्ध गायकाची कन्या सतार वाजवत असे तिच्याकडे रियाजासाठी जाण्यासाठी पत्नी वेळ काढू लागली पण त्यातही नशीब कसे आडवे येते ते पहायला मिळाले. कारण त्या मुलीलाच काही वैद्यकीय कारणामुळे सतार वाजवणे अशक्य होऊ लागले. आणि आधीच उल्हास तशात फाल्गुनमास असाच प्रकार होऊन सतार गवसणीतच राहू लागली.

माझ्या एका मित्राच्या मुलीला सतार वाजवावी अशी उर्मी एकदा आली आणि तिने "काकू पण सतार वाजवतात ना, मग तुमच्याकडे सतार असेल ना? " अशी चौकशी केली त्यावर काकूने अतिशय आनंदाने एक सतार घेऊनच जा असे तिला सांगितले व आपली सतार तिला देऊन टाकली आता घरात तिच्या माहेरची सतारच राहिली. आणि ती वाजवण्यासाठी नाही तरी माहेरची आठवण म्हणून तिने ती ठेवली. पण पुण्यास स्थलांतर करताना छोट्या घरात अडगळ होईल म्हणून औरंगाबादलाच भावाच्या घरात ती सतार ठेऊन आम्ही पुण्यास आलो. आता ती सतार डोळ्यासमोरही राहिली नाही त्यामुळे वाजवण्याचा मोह होण्याचा प्रश्नच उरला नाही.

भावाकडेही जुनी तांब्या पितळेची भांडी किंवा जुना ग्रामोफोन या जुनेपणामुळे मौल्यवान झालेल्या वस्तूंप्रमाणे ती सतार आता दिवाणखान्याची शोभा वाढवू

लागली आहे. मध्ये भावाकडे गेल्यावर सतारीचा विषय निघाल्यावर "आता देऊन टाका कोणालातरी" असे अगदी निरिच्छपणे पत्नीने सांगितल्यावर कोणीतरी म्हणाले, "तशीच कशाला? जर चांगला रंग वगैरे देऊन विकायला ठेवली तर ऍन्टिक पीस म्हणून चांगली किंमत येईल. " तीच ती सतार पुस्तकाच्या मुखष्ठाची शोभा वाढवीत आहे.

# ४. हसरे लाडू

कधीही बुंदीचे लाडू पाहिले की मला मावशीची हमखास आठवण होते. माझ्या मुंजीच्यावेळी मावशी बरेच दिवस आमच्याच घरात होती आणि त्यावेळी तिन मुंजीच्या धामधुमीत हौसेने भाग घेतला होता. त्यावेळी परवडत नसले तरी चांगले कोठीभर बुंदीचे लाडू आमच्या घरी झाले त्या लाडू वळण्याच्या कामात मावशीचा हातभार लागला होता, पण तिच्या अंगात इतके त्राण कमी की तेसुद्धा वळताना जोर पुरेसा न लावल्याने तिने वळलेले लाडू फुटून पुन्हा बुंदीच्या दाण्यात त्यांचे परिवर्तन व्हायचे त्याला मावशी, " अरे माझे लाडू हसतात " म्हणायची.

वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षापर्यंत आपल्याला आई वडील भावंडांव्यतिरिक्त कोणी नातेवाईक आहेत याचा मला पत्ताही नव्हता. वडिलांना भाऊ नव्हता पण तीन बहिणी मात्र होत्या. त्यातील एक बालविधवा होती आणि आमच्याच घरात रहात होती, दुसरीही गावातच रहात होती पण तीही माझ्या जन्मापूर्वीच मरण पावली होती तिचा एक मुलगा म्हणजे माझा आतेभाऊ मधून मधून आमच्या घरी डोकवायचा. मात्र आईचे कोणी नातेवाईक आमच्याकडे कधीच फिरकत नव्हते त्यामुळे आपल्याला मामा अथवा मावशी आहे याची मला तरी कल्पना नव्हती. पण त्यावेळी आमच्या घरातील शेंडेफळ असणाऱ्या भावाचे जावळ काढायचे होते आणि ते मामाच्या मांडीवर काढायचे म्हणून आमचे मामाकडे आजोळी जायचे ठरले तेव्हां आपल्याला मामा आहे याचा पत्ता लागला. कदाचित माझे जावळही मामाच्याच मांडीवर काढलेही असेल पण ते मला समजले नसणार. त्यावेळी हा

प्रवास करायलाही बसची सोय नव्हती त्यामुळे आम्ही बैलगाडीतून जायचे ठरवले. तसे आम्ही आमच्या गावी बैलगाडीनेच जात असू. आमचे गाव म्हणण्याचे कारण वडिलांचा जन्म तेथे झाला एवढेच. नाहीतर माझ्या जन्मापासून तेथील घर आणि शेती या गोष्टी केवळ नावापुरत्याच उरल्या होत्या. एकोणीसशेअठ्ठेचाळीस साली आम्ही न पाहिलेले ते घरही जळाले त्यामुळे आम्हाला म्हणजे मला आमचे घर पहायला मिळालेच नाही.

त्यावेळी गाव सोडून कोठेही जायचे ही कल्पना आनंददायकच असायची इतके गाव सोडणे दुर्मिळ असायचे त्यामुळे कधीच न पाहिलेल्या मामाकडे जायचे या कल्पनेने आम्ही सगळेच आनंदित झालो. त्यावेळी आम्ही या सदरात मी, माझ्या दोन मोठ्या आणि एक लहान अशा तीन बहिणी, आणि सर्वात लहान भाऊ ज्याचे जावळ काढायचे होते अशी पाच मंडळी मोडत होतो. आम्ही सर्वजण एका बैलगाडीत बसू शकत होतो. मधून मधून वडील गाडीतून उतरून चालत येत त्या बैलगाडीला तट्ट्या लावलेला असल्यामुळे उन्हाचा त्रास व्हायचा नाही. आमच्या घरी दूध घालणाऱ्या कुंभाराची ती बैलगाडी होती आणि त्याचे नाव चिनकू कुंभार होते पण आम्ही काही बोलायला गेलो की तो अंगावर खेकसल्यासारखा बोलायचा त्यामुळे आम्ही त्याला चिडकू कुंभार म्हणायचे.

या चिडकू कुंभाराच्या गाडीतून आम्ही एक दिवशी पहाटे घरातून निघालो आणि दुपारपर्यंत मामाच्या गावाला पोचलो आमची गाडी मामाच्या घरासमोर थांबली. आम्ही गाडीतून बाहेर पडून आत शिरणार तोच एका ठेंगण्या ठुसक्या, बळकट बांध्याच्या काळ्या बाईने एकदम दरडावल्यासारखे आम्हाला घराबाहेरच

थांबवले आणि हातात भाकरतुकडा आणि पाण्याचा तांब्या घेऊन भाकरतुकडा आमच्यावरून ओवाळून टाकला आणि आमच्या पायावर तांब्यातले पाणी टाकून शुद्ध करून तिने आम्हाला घरात घेतले. ही आमची मामी होती आणि तिच्या पाठीमागून दबकत डोकावणारा पुरुष तो आमचा मामा होता. हे मामा मामीचे पहिले दर्शन. ही मामाची दुसरी बायको होती. हिचा वाण पहिल्या मामीच्या तुलनेत ठार काळाच असल्याने हिला काळी मामी अशीच संज्ञा होती.

मामाचे घर अगदी मामाचा वाडा चिरेबंदी म्हणण्यासारखे मोठे होते. समोर झाडे मागेही बाग, गोठा, गोठ्यात गुरे असा सगळा सरंजाम होता. आम्ही घरात शिरलो. आत शिरल्यावर अंगणात मोठा आड होता. पण घराच्या खिडक्या बारीक असल्याने अगदी अंधारच वाटत होता. घराला किती खोल्या होत्या आता आठवतही नाही. मामाला मूलबाळ नसल्यामुळे एवढ्या मोठ्या वाड्यात शुकशुकाटच होता आणि आम्ही गेल्यामुळे एकदम त्याला जाग आली आणि आमच्या कलकलाटाने तो अगदी दुमदुमून गेला. एकदम एवढी माणस बघून तोही भांबावून गेला असावा.

आम्ही पोरांनी वाड्याचा आतला, मागचा आणि पुढचा सगळा भाग पहायला सुरवात केली. माझ्या शोधक नजरेला लगेच मधल्या खोलीत एक भुइमुगाच्या शेंगांचे पोते भरून ठेवलेले दिसले आणि घरच्या संवयीला अनुसरून लगेच त्यातून मूठभर शेंगा काढून मी माझ्या चड्डीच्या खिशात कोंबायचा प्रयत्न केला. पण काळ्या मामीचे एवढ्या सगळ्या गोंधळातही घरावर चांगलेच लक्ष होते कारण माझा खिशात जाणारा हात तिन खस्सकन बाहेर ओढत "टोणग्या, चोरून खायला

हवे का? " असा माझ्या काळजात धडकी भरवणाऱ्या कर्कश्श आवाजात प्रश्न विचारला. आणि माझ्या हातातल्या शेंगा काढून परत पोत्यात टाकत तिने चार शेंगा माझ्या हातात ठेवत, " हं ह्या घे आणि खा उगीच जास्त खाशील तर होशील हगवणीने बेजार" असा वर दमही भरला.

सकाळपासून आम्ही बरोबर घेतलेल्या भाकरी गाडीत खाल्ल्या असल्या तरी आता चांगलीच भूक लागली होती. मामीच्या घरात प्रवेश केल्यावर कपभर चहाचे पाणीच काय ते पोटात गेले होते त्यामुळे तेवढ्या चार शेंगानी माझी भूक आणखीच चाळवली होती, पण आमच्या आईला आपल्या वहिनीच्या काटकसरी स्वभावाची आणि तितकीच आपल्या पोरांच्या कडकड्या स्वभावाची कल्पना असल्यामुळे तेवढ्यातल्या तेवढ्यात घाई करून निदान पिठले आणि भाकरी करण्याची तातडी तिने दाखवली होती. आणि आम्हा सगळ्यांना जेवायचे बोलावणे आले. अर्थातच जेवणात भाकरी आणि पातळ पिठले एवढाच मेनू होता.

खरे तर घरात धान्याच्या पोत्यांची शीग लागलेली होती आणि खायला माणसेही दोनच होती तरी कधी नव्हे ते आलेल्या नणदेच्या मुलांसाठी काही गोडधोड करावे असे काही मामीला वाटले नव्हते आणि तसे तिला सांगण्याचीही मामाची काही बिशाद नव्हती. त्यात आम्ही जावळ काढायला आलो म्हटल्यावर त्यादिवशी तरी काही गोड करावेच लागले असते याचाही तिन विचार केलेला असणार.

मामाच्या घरात देवघर वेगळे नव्हते. स्वयंपाकघरच चांगले ऐसपैस होते आणि त्यातच मागील बाजूस एका मोठ्या जमिनीलगतच्या कोनाड्यात मोठा देव्हारा

ठेवलेला होता. मी घरी पूजा करतो असे कधीतरी आईने कौतुकाने सांगितलेले या मामीने बरोबर लक्षात ठेवून मी दुसऱ्या दिवशी उठून अंघोळ करताच लगेच पूजेच्या कामावर माझी नेमणूक केली. खरे तर मला बाहेर गोठ्यात जाऊन गाईची धार कशी काढतात हे पहावयाचे होते, जमले तर तिला आंबोण खायला घालायचे होते, पण माझ्या या मनसुब्यावर तिने पाणी फिरवले. बर तिच्याकडे देवही काही कमी नव्हते. सगळे मोठे मोठे देव होते आणि टाकसुद्धा चांदीच्याच बैठकीत उभे रहातील असे केलेले होते नाहीतर आमच्या घरचे टाक आडवे ठेवावे लागत. इतक्या सगळ्या देवांना अंघोळ घालून ते देव्हाऱ्यात ठेवण्याच्या कल्पनेनेच माझे हात आणखी खांदे दुखू लागले. पण मामीला माझी मुळीच दया आली नाही, उलट, "अरे मेल्या अशीच पूजा करतोस का घरी? काही खर नाही बाई, त्या तुझ्या देवांच ” अस म्हणून माझ्या हातातली एक मूर्ती घेऊन त्यावर रांगोळीने खसाखसा घासत "हे बघ अस घासाव लागत म्हणजे देव असे चमकतात " असे प्रात्यक्षिक मला करून दाखवले. मला आमच्या मामीच्या तावडीत सापडलेल्या देवांचीच खरोखर दया आली.

पण पूजेनंतर मला गोठ्यात जायला मिळाले आणि शेणामुताचा मनसोक्त वास घेत गाई वासरांचे दर्शन घेता आले. धार काढणारा मुलगा माझ्यापेक्षा दोन एक वर्षाने मोठा आणि माझ्यापेक्षा उंचही होता पण बऱ्याच दिवसात पोटभर खायला मिळाले नसल्यासारखा त्याचा चेहरा सुकलेला दिसला. त्याने धार काढून चरवी मामीच्या ताब्यात दिली आणि तो बाहेर पडायच्या बेतात होता तेवढ्यात त्याला मध्येच अडवून मी त्याला विचार्ले, "कोण रे तू? " बहुधा अशी कामे करायला मामाने हा गडी ठेवला असावा असे मला वाटले पण त्याने उत्तर दिले, "मी सुधाकर, तू प्रकाश

ना? ’"हो तुला काय माहीत? " मी उलट प्रश्न केला. "अरे मी तुझा मावसभाऊ" म्हणून तो आणखी काही न बोलता घराबाहेर पडला.

" अरे गेला की काय सुध्या? " मामीने बाहेर येत मला विचारले.

" हो आत्ताच गेला का काय झाल? " मी मामीला म्हणालो. "बोलावू का त्याला परत? "

" नको पळतपळत जाऊन त्याला हे नेऊन दे " म्हणून मामीन माझ्या हातात वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळलेला काहीतरी पदार्थ कोंबला. मी सुधाकरच्या पाठीमागे धावत धावत गेलो आणि त्याच्या हातात तो पदार्थ ठेवला. पण त्यात काय आहे याची उत्सुकता मला चैन पडू देत नव्हती त्यामुळे मी त्याला विचारलेच, "काय रे दिलेय तुला मामीने? " यावर उत्तर न देता त्याने ते पुडके उघडून दाखवले आणि ते पाहिल्यावर काय बोलावे याचा मला पेचच पडला कारण त्या कागदात वाळून अगदी कडकडीत झालेल्या तीन चार दिवसाच्या शिळ्या भाकरीचे तुकडे होते.

"पण मघाशी मामीन काल उरलेल्या भाकरी गुरांना घातल्या ना? " मी आश्चर्याने विचारले, "हो पण इतक्या कडकडीत भाकरी गुरं खात नाहीत"तो म्हणाला, "मग हे कोण खाणार? " "मी" हे त्याचे उत्तर ऐकून काय बोलावे मला काही सुचेना. अगोदर आपल्याला सुधाकर नावाचा मावसभाऊ आहे ही गोष्टच मला नवीन होती त्यात आणखी एका आश्चर्याची भर पडली. कुणाकडून तरी या गोष्टीचा उलगडा करून घ्यायला हवा असे मला वाटले

आता दुसऱ्या दिवशीही आपल्याला पिठले भाकरी या मेनूलाच तोंड द्यावे लागतेय की काय या विवंचनेत मी आणि आम्ही सगळीच भावंडे होतो. तेवढ्यात

एका नव्या पाहुण्यानं घरात प्रवेश केला. तो घरात शिरताच मामीची लगबग पाहून ही कोणीतरी अतिमहत्वाची व्यक्ती असावी हे माझ्या लक्षात आले. आणि थोड्याच वेळात ती व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून मामीचा लाडका भाऊच होता हे समजले.

" अग ताई कोण पाहुणे आलेत? " असे त्याने विचारताच, " काही विचारू नकोस आहेत आमच्या लाडक्या वन्सबाई लाडक्या भाच्याच जावळ काढायचेय ना मामाच्या मांडीवर" असा उद्गार मामीन काढला. " बर ते जाऊदे काय काम काढलस? "असे विचारून त्याला झोपाळ्यावर बसवत मामीन गप्पा मारायला सुरवात केली. मला खर तर झोपाळ्यावर बसायला आवडले असते पण मामीन त्याच्यावर बऱ्याच वस्तू रचून ते अवघड करून टाकले होते. आता या बंधुराजांच्या आगमनाने का होईना झोपाळा रिकामा झाल्यामुळे तेवढ्या बाबतीत तरी मी मनातल्या मनात त्याचे आभार मानले. पण त्याहूनही एक आनंदाची गोष्ट घडली ती म्हणजे जेवायला चक्क शिक्रण पोळी करून, "मामाची बायको सुगरण रोज रोज पोळी शिकरण" या पद्यपंक्तीची आठवण करून दिली.

मामी आज भलतीच खूष होती आणि त्यामुळे तिनं नेहमीची वागण्याची पद्धत बदलून एकदम आमचे कौतुक करायला सुरवात केली. माझी मोठी बहीण तिच्या वयाच्या मानाने नाच बऱ्यापैकी करत असे. "अग छबे, आज तुझा तो नाच करून दाखव आम्हाला " असा मामीने आग्रह जेवणानंतर सुरू केला इतकेच नाही तर तिच्या "ये रे ये यदुराया रे" या नाचातील यदुरायासाठी मला पीतांबर नेसवून माझ्या हातात एक आडवी बासरी म्हणून फुंकणी ठेवून तिन बहिणीला नाच करायला भागच पाडले. या आनंदपर्यवासी नाटकाचा शेवट मात्र भलताच अनपेक्षित झाला.

या कार्यक्रमानंतर जरा विश्रांती घेऊन मोठ्या मंडळींचे दुपारचे चहापान झाल्यावर मामा आणि वडील गावात जरा फिरायला बाहेर पडले, आणि मामीने लाडक्या वन्सबाईंना रात्रीच्या जेवणात चपात्या करण्यासाठी गहू जात्यावर दळायचा हुकूम सोडला. माझी आई फारच गरीब त्यामुळे नेहमीप्रमाणे माहेरी आलेल्या लेकीचा तोरा तर तिला मिरवता येणे शक्यच नव्हते उलट या काळ्या मामीची दहशतच तिला वाटत असावी. पण स्वभावाला औषध नसते. मुकाट्याने माझ्या मोठ्या बहिणीला सोबत घेऊन मधल्या खोलीत जात्यावर बसून गहू दळायला तिने सुरवात केली. तशी माझी मोठी बहीणही काय चालले आहे हे समजण्याच्या वयात असल्यामुळे वहिनीच्या समोर काही बोलायची हिम्मत नसलेल्या आईला त्या दोघी जणीच जात्यावर बसल्यावर मात्र रहावले नाही. आणि " बघा आता भाऊ आल्यावर कशी शिक्रण पोळी करायचे सुचले नाहीतर आम्ही आल्यावर पिठल भात तरी पोरांना पोटभर मिळतो की नाही याचीच चिंता पडली होती. 'असे हळू आवाजात बहिणीच्या कानात ती बडबडली आणि आजकालच्या दूरदर्शन मालिकात असे बोल ऐकायला नको ती व्यक्ती बरोबर तेथे हजर असावी अगदी तस्से घडले आणि मामीच्या त्या पाहुण्या आलेल्या भावानेच हे शब्द बरोबर ऐकले आणि स्वत:ची भर घालून आपल्या बहिणीच्या कानावर त्याने घातले. मग काय विचारता काळ्या मामीच्या रागाचा पारा इतका काही चढला की मामाने घरात प्रवेश करताच तिने गळा काढून रडायलाच सुरवात केली.

"माझ्या माहेरच्या माणसांचा अपमान झाला. आता एक क्षणभरसुद्धा तो इथे रहाणार नाही. नाहीतर यांना जायला सांगा" असा अगदी कैकेयीप्रमाणे तिने मामाकडे

त्रागा करायला सुरवात केली. मामा म्हणजे दुसरा दशरथच! त्यामुळे मामीच्या या थयथयाटापुढे तो अगदी तोंडात तोबरा दिल्यासारखा गप्प होता. माझे वडील म्हणजे जमदग्नीचा अवतार, असा अपमान खपवून घेण त्याना शक्यच नव्हत पण त्यानी फारसा तमाशा न करता बाहेर पडणे पसंत केले आणि मोठ्या हौसेने पहिल्यांदाच आजोळी आलेले आम्ही अक्षरश: रस्त्यावर आलो. लगेच परत निघणे शक्य नव्हते कारण आमची बैलगाडी परत गेली होती आता दुसरी बैलगाडी ठरवणे ही काही या परक्या गावात तडातापडीने होण्यासारखी गोष्ट नव्हती त्यामुळे वडिलांनी आईच्या सल्ल्यानुसार मावशीच्या घरी जायचे ठरवले तिचे घर तसे जवळच होते. आम्ही जे काय आमचे थोडेफार सामान होते ते गोळा करून मावशीच्या घराची वाट धरली.

मावशीच्या घरी पोचल्यावर आईला कंठ फुटला. आणि तिच्या माहेरचा सगळा इतिहास तिच्याच तोंडून ऐकायला मिळाला. त्याच्यापूर्वी आम्हाला या गोष्टी कळल्या नव्हत्या त्या या निमित्ताने बाहेर आल्या. ती अगदी लहान असतानाच तिचे आईवडील मरण पावले होते आणि तिच्या आज्जीने या तीन नातवंडांचा सांभाळ केला होता. आजी मोठी जहांबाज बाई होती. एकटी घोड्यावर बसून खंड वसूल करायची. तिचे घराणे म्हणजे गावातले अगदी तालेवार घर. मोठी शेती. वर्षाला दहावीस खंडी धान्य सहजच घरात यायचे. आंबा, पेरूची झाडेही होती.

आजीने मोठ्या बहादुरीने सगळा कारभार संभाळून मोठ्या नातीला म्हणजे मावशीला गावातलेच तसेच मोठे देशपांड्यांच घर बघून दिले होते. त्यावेळी ते घर माणसांनी गजबजलेले आणि खाऊन पिऊन सुखी होते. आईला माणसांची फार हौस आणि मावशीच्या लग्नानंतर घरात आता ती स्वत:, म्हातारी आजी आणि मामा

अशी तीनच माणसे उरली. त्यामुळे आपल्या बहिणीकडे त्या भरलेल्या घरात रहायला तिला खूप बरे वाटायचे आणि तेथून आपल्या भयाण इनमिन तीनच माणस असलेल्या घरात परत यायच तिच्या अगदी जिवावर यायच. पुढं आई नेहमी म्हणायची "मला माणसाची हौस फार, देवान ती अगदी पुरेपूर भागवली. " कारण तिला एक नव्हे दोन नव्हे तर चांगली दहा मुले देवान दिली आणि त्यातली आठ जगली सुद्धा!

आजीन आपल्या नातवाचं म्हणजे मामाचंही लग्न अगदी थाटात लावून दिल. पण जी मुलगी माहितीतली म्हणून तिन पसंत केली तिला लग्न होताच जणु दृष्टच लागली. आणि ती खंगू लागली. खरतर तिला लग्नापूर्वीच क्षयाची बाधा होती पण ही गोष्ट येरगट्टीकरांनी (तिचे माहेरच आडनाव) आजी पासून लपवून ठेवली होती. थोड्याच दिवसात ती पालीसारखी पांढरीफट्ट पडली आणि लग्नानंतर थोड्याच दिवसात तिनं राम म्हटला. आईचे घराणे वारकऱ्याचं. घरातील पुरुषांची आषाढी कार्तिकी कधी चुकली नाही. तसा मामाही प्रत्येक वारी करायचा, त्याची ही बायको वारल्यानंतर तो वारीला गेला. मामा म्हणजे अगदी भोळा सांब आणि तिथच काळ्या मामीच्या आई वडिलांनी त्याला " ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा बरा दिसतोय" असे हेरले आणि त्याच्या तावडीत सापडलेला मामा चतुर्भुज होऊनच घरी आला बरोबर काळी मामी होतीच. तिला पाहून आजीनं हायच खाल्ली. शेवटपर्यंत ती म्हणायची "येरगट्ट्यान येरगटल आणि दंडवत्यान (काळ्या मामीच माहेर) गंडवल. "

तरी तशाही परिस्थितीत तिने माझ्या आईचे लग्न करून देण्याचे आपले शेवटचे कर्तव्य यथाशक्ती पार पाडले, पण तोवेळपर्यंत मामासाहेब पूर्णपणे

बायकोच्या कह्यात गेलेले असल्यामुळे लग्नात आईच्या अंगावर चढवलेले सगळे दागिने सोनाराकडून जरा दुरुस्त करून देतो असे वडलांना सांगून दुसऱ्याच दिवशी त्याने काढून घेतले. आईच्या आजीनं खूप हातपाय आपटले पण त्यानंतर ते परत कधीच कोणाच्याच दृष्टीला पडले नाहीत. दादांना म्हणजे माझ्या वडिलांना त्यांचा मोह नव्हताच पण त्यानंतर आजीने जे अंथरूण धरले ते परत कधी न उठण्यासाठीच.

मावशीचं घर भरलेल होत पण आता त्याची अवस्था बडा घर पोकळ वासा अशी झाली होती. तरी अगदीच खाण्यापिण्याची ददात होती अशातला भाग नव्हता. मावशीचे यजमान, लोक त्याना भाऊराव म्हणत शेतीच करून रहात होते त्यामुळे शिक्षण बेताचेच. पण माणूस मोठा दणदणीत शरीरयष्टीचा. अगदी उंचापुरा. मावशीला दोन मुलगे एक मला भेटलेला सुधाकर आणि दुसरा त्याचा मोठा भाऊ बाळ.

एकदा भाऊराव काहीतरी कामासाठी आमच्या गावी आले आणि दुपारी अकरा बाराच्या सुमारास आमच्या घरात शिरले. जेवण करायचा आग्रह वडिलांनी केल्यावर "आत्ता येतो तळयावरून अंघोळ करून" म्हणून पंचा घेऊन एकटेच तळयावर अंघोळीला म्हणून गेले. आमच्या गावचे तळे बरेच मोठे आहे. तळयाच्या मध्यभागी एक खांब रोवलेला आहे. पट्टीचे पोहणारे या खांबाला हात न लावता दुसऱ्या काठाला जायचे. आमच्यासारखे नवशिके धापा टाकत खांबापर्यंत पोचून तिथे जरा विश्रांती घेऊन परत फिरायचे. त्यादिवशी भाऊरावांनी पोहण्यासाठी तळयात उडी मारली आणि सपासप आडवे हात मारत ते खांबापर्यंत पोचले आणि तेथूनच ते ओरडू लागले, " वाचवा वाचवा कुणीतरी ओढतेय मला " आपल्या

गावातच नव्हे तर अगदी आमच्या गावी पण भाऊराव पट्टीचे पोहणारे म्हणून प्रसिद्ध! त्यामुळे ते उगीचच ओरडत आहेत, थट्टाच करत आहेत असा सगळयांचा समज झाला आणि बघताबघता सगळयांच्यासमोर ते तळयात बुडाले आणि मग पहाणारे लोक भानावर आले आणि सगळयानी बुड्या मारून शोध घेतला पण तोपर्यंत फार उशीर झाला होता. एका क्षणात होत्याचे नव्हते झाले. बाहेर काढून चाकावर घालून फिरवून पाहिले पण काही उपयोग झाला नाही.

आमच्या घरी कुणीतरी सांगत आले, "भाऊराव बुडाले" आईचा विश्वासच बसेना. वडील तळयावर जाऊन पहातात तो काय खरेच एवढ्या तगड्या पुरुषाचे निर्जीव शरीरच लोकांनी तळयाबाहेर काढून ठेवलेले त्यांना पहायला मिळाले. वडील जेवण करून जा असा आग्रह करत असताना जणु मरण बोलावत असल्यासारखे ते तळयावर गेले होते.

नवऱ्याच्या अशा अकाली जाण्यामुळे मावशी पार खचून गेली आणि ते घरही पारच खचले. भाऊरावांना एक भाऊ होता पण तो गावी रहायला उत्सुक नव्हता. त्याने लग्नही केले नव्हते. तो नेहमी पुण्यातच रहात असे. कुणीतरी मावशीला त्याच्याशी लग्न करून घेण्याचे सुचवले पण तिच्या कोष्टकात ती गोष्ट बसत नव्हती आणि तिच्या दिरालाही लग्नात फारसे स्वारस्य नव्हते. त्यामुळे एकेकाळी भरलेला तो वाडा आम्ही गेलो तेव्हां अगदी ओसाड पडलेला होता. मावशी आणि तिचे दोन मुलगे एवढीच माणसे त्या भल्यामोठ्या वाड्यात रहात होती.

भाऊराव हा एकमेव कर्ता पुरुषच गेल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांची अगदी अन्नान्न दशा झाली होती. गावातच मावशीचा सख्खा भाऊ असताना त्याच्या घरात

शिळे अन्न गुरांना खायला मिळत होते पण आपल्या भाच्यांना दोन वेळची भाकरी देण्याची दानत मात्र त्या गृहस्थात नव्हती. त्यामुळे मावशीकडे गेल्यावर पहिल्यादा सगळ्यांसाठीच गहू, तांदूळ, दाळ अशा सगळ्या वस्तू विकत आणूनच आम्हाला स्वयंपाकाला सुरवात करावी लागली.

एक दोन दिवसातच बैलगाडीची व्यवस्था झाली आणि आम्ही निघणार होतो. मधल्या काळात मामाला मात्र आपली बहीण मुद्दाम आपल्याला भेटायला आली होती, बायकोच्या धाकाने आपण तिला जवळ जवळ घराबाहेरच काढले तरी तिला एकदा भेटावे अस मात्र मुळीच वाटले नाही, मग नेहमीच गावात असणाऱ्या बहिणीची तर विचारपूस करण्याचे दूरच राहिले. त्यामुळे मावशीला गावात राहून सगळ्यांनाच टाचा घासत मरावे लागेल अशी परिस्थिती दिसत असल्याने आईने " मग तू इथे राहून काय करणार आहेस चल आमच्याबरोबर" असे म्हटले. आणि तीही लगेच तयार झाली.

मावशीची दयनीय स्थिती पाहून कोणाही सहृदय माणसाला तिच्यासाठी काहीतरी करावे असेच वाटले असते पण आमचीही परिस्थिती फार उत्तम होती अशातला भाग नव्हता. आणि माझे वडीलही काही बायकोच्या हो ला हो करणारे नव्हते मात्र आतापर्यंत आपल्या घासातला घास काढून त्यांनी आपल्या बहिणींना आणि भाच्यांना जमेल ती मदत केलेली आईने पाहिले होते आणि त्यावेळी तिनेही त्याना यथाशक्ती हातभार लावला होता म्हणूनच वडिलांनाही एवढी मोठी जबाबदारी घेण्यास भाग पाडण्याचे धाडस तिने केले.

आमच्याबरोबर गावी आणून मावशी आणि तिच्या दोन मुलांचे काय करायचे याविषयी आई आणि दादा यांनी काय ठरवले होते कुणास ठाउक, कारण आमच्याही घरात आणखी तीन माणस खपणार होती अशातला भाग नव्हता. आम्ही त्यावेळी गावाच्या एका टोकास असणाऱ्या देशमुख वाड्यात रहात होतो त्याच्या जवळच एक खोलीत आईने आपल्या बहिणीचा संसार थाटून दिला. गावातील एक श्रीमंत जमीनदार कुटुंबात आमच्याही कुटुंबाचे जरा वजन होते त्यांच्या घरी मावशीला आणि तिच्या मुलांना वरकड कामासाठी ठेवून घ्यायचे त्यांनी कबूल केले आणि ते तीन जणांचे कुटुंब गावात सामावून गेले.

सुधाकर शाळेत जाऊ लागला. बाळने सातवीची परीक्षा द्यावी त्यावेळी तिला व्ह. फा. म्हणत आणि ती पास झाल्यावर गावातीलच प्राथमिक शिक्षक शिक्षण महाविद्यालयात जाऊन दोन वर्षाचे प्रशिक्षण पार पाडून शिक्षक व्हावे असे ठरले. त्याच वेळी बाळला इंग्रजी शिकवण्याची काय दुर्बुद्धी दादांना सुचली कोण जाणे. शाळेत उत्तम शिक्षक म्हणून प्रसिद्ध असले तरी असे एका विद्यार्थ्याला घेऊन शिकवण्याचा त्यांचा पिंड नव्हता पण त्यावेळी त्यांच्याकडे मिलिटरीतील एक गृहस्थ इंग्रजी आणि गणित शिकायला येत होते. या गृहस्थांचे कौतुक म्हणजे मिलिटरी पेशात असून वर्षातून एकदा मिळणाऱ्या सुट्टीचा सदुपयोग करावा म्हणून ते आमच्या गावापासून पाच सहा मैल अंतर रोज पायी तुडवत सकाळी आमच्या घरी नऊ वाजता येत. या शिक्षणाचा त्यांना काय उपयोग होणार होता कुणास ठाउक पण त्याचा वक्तशीरपणा आणि शिकण्याचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. त्यांना शिकवतानाच बाळलाही थोडेबहुत शिकता आले तर पहावे असा दादांचा दृष्टिकोण.

पण बाळची परिस्थिती वेगळी होती. मामाकडे गुरे चारणे, त्यांची धार काढणे आणि इतर पडेल ती कामे करणे यातच त्या दोघाही भावांचा वेळ जात असे, त्यामुळे यापूर्वी शांतपणे शिकणे हे त्याना माहीतच नव्हते. याशिवाय मामाकडे उरलेला शिळा भाकरतुकडाच काय तो खायला मिळे आणि त्यांची पोटाचीही आबाळच झाली होती अर्थातच या सर्व गोष्टींचा दुष्परिणाम अगोदरच कमी असलेल्या बौद्धिक कुवतीवर होणे स्वाभाविकच होते. आणि अचानक मिळालेली ही संधी बाळला पेलवली नाही. त्याने ए, बी, सी, डी गिरवायला सुरवात केली आणि घाण्याला बांधलेल्या बैलासारखी त्याची बुद्धी त्याच वर्तुळात फिरू लागली ती बाहेरच पडेनाशी झाली. पहिले काही दिवस बाळला इंग्रजीचा चांगलाच नाद लागलाय असे सर्वांना वाटू लागल. पण खरी परिस्थिती वेगळीच होती तो जागचा उठेचना, सारखा ए, बी सी. डी गिरवत किंवा पुटपुटत राहू लागला. एकीकडे आपल्याला हे जमलेच पाहिजे ही तीव्र इच्छा आणि त्याच वेळी आपल्याला हे जमणार नाही याचा त्याने धसका घेतला की काय कुणास ठाऊक. मावशीला आत्ता कोठे जरा माणसात आल्यासारखे वाटत होते, दोन वेळा पोटभर अन्न मिळू लागले होते तेवढ्यात तिच्या कम नशीबाने पुन्हा उचल घेतली आणि थोड्याच दिवसात बाळ ठार वेडा झाला.

त्यातल्या त्यात सुधाकर तरी व्यवस्थित शाळेत जाऊ लागला होता एवढीच काय ती समाधानाची बाब. ज्या जमीनदार कुटुंबात मावशी कामाला म्हणून जाई ती माणसे खरच स्वभावाने चांगली. त्यानी तिन्ही माणसांना ती फारशी कामाची नसली तरी कुरकुर न करता संभाळले होते. कारण बाळला वेड लागल्याने मावशीचा जास्त वेळ त्याची काळजी घेण्यातच जाऊ लागला. सुधाकरचा बराच वेळ शाळेतच जात

असे. मात्र ही तिन्ही माणसे प्रामाणिकपणाचा कळस होती. म्हणजे अगदी भुकेने जीव कंठाशी आला आणि समोर अन्न दिसत असले तरी कोणी घ्यायला सांगितल्याशिवाय हात लावणार नाहीत. या त्यांच्या एकाच गुणामुळे ती बहुतेक तेथे टिकली असावीत.

मावशी आणि आई यांनी बरेच उपाय केले, गावातले डॉक्टर, वैद्य, मांत्रिक असे जे जे काही उपाय करणे शक्य होते ते ते त्या दोघींनी केले आणि हळूहळू बाळ शहाण्यासारखा बोलू लागला वागू लागला. पण नंतर त्याला शिकवण्याच्या फंदात दादा पडले नाहीत. कामाची त्याला चांगलीच आवड होती आणि संवयही त्यामुळे शेतीच्या कामालाही तो उपयोगी होता. हे जमीनदारांच्या पथ्यावर पडले. त्यांच्या शेतीच्या कामाला तो चांगली मदत करायचा.

. सुधाकरने कण्हत कुथत नववीपर्यंत मजल मारली. तो माझ्यापेक्षा वयान मोठा होता पण गावी असताना शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शाळेत मात्र तो एक इयत्ता माझ्यामागे होता. त्याचा एक फायदा असा झाला की त्याला माझी पुस्तके उपयोगी पडू लागली. आपले गाव सोडून मावशी आमच्या गावात बरीच रुळली. जवळ जवळ दहा वर्षे अशी काढल्यावर मावशीला परत गावाकडे जावेसे वाटू लागले. मी शिक्षणासाठी पुण्यास गेलो असतानाच त्यांनी पुन्हा मायणीस जाण्याचा निर्णय घेतला, पुन्हा आम्ही आपल्या व्यापात दंग झालो आणि भावाकडे परत जाण्याची आईलाच इच्छा उरलेली नसल्यामुळे आमचा तेथे जाण्याचा काहीच संबंध उरला नाही.

मावशी मायणीत परत गेल्यावर पुन्हा जणु ती आमच्यासाठी नसल्यासारखीच झाली. त्यामुळे नंतर मलाही कधी असोशीने आजोळी जाऊन मावशी बाळ आणि सुधाकर यांची गाठ घ्यावी असे वाटले नाही.

मामाकडे जावे असे आईलाच वाटत नव्हते तर आम्हाला वाटण्याचा संबंधच नव्हता, पण तरीही मोठ्या बहिणीच्या लग्नात आठवण ठेवून आईने भावाला पत्रिका पाठवली आणि आश्चर्य म्हणजे सगळे विसरून ती दोघेही लग्नासाठी आली. तोपर्यंत त्या दोघानाही मूलबाळ नव्हतेच आणि आता होण्याची शक्यताही नव्हती. पण मजा म्हणजे त्यानंतर दोनच वर्षानी मी पुण्यात शिकत असताना मामा, मामी बहिणीकडे म्हणजे आमच्याकडे आले होते, पण आईकडून जे कळले ते आश्चर्यकारक होते म्हणजे यावेळी त्यांच्याबरोबर काळया मामीची मुलगी शोभावी अशी आणखी एक बाई होती आणि ती मामाची तिसरी बायको होती. आणि ती काळयामामीशी अगदी सुनेने वागावे अशा आदबीने वागत होती. या तिसऱ्या मामीलाही काही मूल झालेच नाही. एकूण बहिणीची मुले आणि बहीण उपाशी रहात असताना मामाने मात्र तीनदा संसार थाटला

मधल्या काळात बाळचे लग्नही झाले पण त्यालाही आमच्यापैकी कोणीही गेले नाही. आता तो थोडीफार शेती आणि शिंपीकाम करत होता असे ऐकिवात होते. सुधाकर काय करतो याविषयी काही पत्ता नव्हता. पण मी मुंबईत बहिणीच्या घरी राहून नोकरीच्या खटपटीत असताना अचानक एक दिवस तो तिला भेटायला आला. चांगला दिसत होता कुठल्यातरी कंपनीत त्याला बऱ्यापैकी नोकरी मिळाली होती.

मावशीही गावी बरी आहे हे कळल्यावर बरे वाटले. काही का असेना मावशीचे गाडे रुळाला लागले असे वाटून आईलाही बरे वाटले.

पण एकाद्याचे नशीब कसे असते पहा. सुधाकर मुंबईत नोकरी करून बऱ्यापैकी कमावत होता. पण एकदिवस लोकलमध्ये प्रवास करताना आपल्याला काय झाले हे त्याचे त्यालाच काही कळले नाही आणि त्याच्या अंगावरचे कपडे आणि खिशातले सर्व पैसे, हातातले घड्याळ अशा सर्व वस्तू कोणीतरी काढून घेतल्या आणि तो प्लॅटफॉर्मवर पडलेला कोणालातरी आढळला. पुन्हा एकदा मावशीला दुर्दैवाने तडाखा दिला होता. सुधाकर त्यातून पुन्हा काही सावरलाच नाही गावाकडेच परत गेला. आणि तेथेच राहिला. तेथे भावाबरोबरच काहीतरी रुटुखुटू करत राहिला.

पुढे काही दिवसानी सुधाकरच्याही लग्नाची पत्रिका आली, आणि जायचा माझा विचार आईनेच खोडून काढला आणि त्यानंतर कोणाचीच गाठ पडली नाही. कधी कुणाचे पत्र नाही की लग्नाकार्यात भेटी नाहीत. खरे तर आमया गावापासून मामाचे गाव खूपच जवळ होते, आणि आता तर बसने अगदी तासदीड तासात जाणे शक्य झाले होते. पण त्यांचा ऋणानुबंधच जणू तेवढाच होता.

एक दिवस मावशी निधन पावल्याचे पत्र औरंगाबादला आले आणि त्यानंतर एक दिवस मामानीही राम म्हटल्याचे असेच उडत उडत कळले आणि डोळे ओले करीत आईने " संपला माझा माहेरचा ऋणानुबंध! " असे उद्गार काढले आणि पुन्हा ती नित्यकर्मात गढून गेली. आईच्या माहेराला आतापर्यंतही फार काही अर्थ नव्हताच पण आता ते नावालाही उरले नव्हते. माझ्या मावशीचे लाडू हसले पण नशीब मात्र कधीच हसले नाही.

# ५ हे असेच व्हायचे होते ---!

सुधाच्या पाठीवर पाय देऊन आल्यामुळे माझा आणि तिचा छत्तिसाचा आकडा असावा हे उघडच होत. अर्थात इतर भावंडांशी आमची भांडणे होत नव्हती अशातला भाग नव्हता पण या बाबतीत आमच्या दोघांचे विशेष सख्य होत. वय वाढल्यावर त्या भांडणांचे स्वरूप बदलून एकमेकाच्या वस्तु घेण्यासाठी होणारी भांडणे एकमेकांना आपल्या जवळ जे असेल ते कसे देता येईल या विचाराने होऊ लागली. सुधाने माझ्या शिक्षणासाठी आपल्या कडून जे काही करणे शक्य होते ते सर्व केले, किंवा ती होती म्हणूनच खेडॅगावातून शिक्षणासाठी शहरात राहणे मला शक्य झाले त्यामुळे आमचे संबंध नेहमीच अतिशय सौहार्दपूर्ण राहिले. शिवाय तिच्या घरी बडोद्यास अनेकवेळा मुक्काम टाकल्याने मीता आणि विजू ही भाचरेही मामावर फार जीव टाकायची

मग मीता येते आहे असे सुधाचे पत्र आल्यावर मी तिला आणायला स्टेशनवर जावे हे ओघाने आलेच पण त्याला मोडता घातला मीतानेच. तिची गाडी स्टेशनवर येण्यापूर्वी तिच्या मोबाइलवर मी तिच्याशी संपर्क साधल्यावर तिने मला जणू काही दरडावूनच सांगितले ;

" हे बघ मामा माझी गाडी केव्हाही येऊदे तू स्टेशनवर मला न्यायला यायच नाही. आता मी लहान नाही आणि पुणं काही एवढ मोठ शहर नाही की मला तुझ घर सापडणार नाही. "

" अग पण तुला इथले रिक्षावाले माहीत नाहीत सगळे पुणं तुला दाखवून आणतील" मी तिला चुचकारण्याचा प्रयत्न करीत म्हणालो

' त्याना तरी मीता ही काय चीज आहे हे कुठे माहीत आहे " मला गप्प करत ती म्हणाली. आता मी हट्टाने तिला आणायला गेलो तर माझ्या कारमध्ये न बसता रिक्षाने यायचा आपला आग्रह ती सोडणार नाही याची मला खात्री होती. तिनं सांगितल्याप्रमाणे पुणेरी रिक्षावाल्याला इंगा दाखवलाच. पुण्यात पूर्वी फिरलेली असल्यामुळे आणि तिच्या मोबाइलमधील जी. पी. एस. वरून त्यान जरा वाकडी वाट पकडल्याच लक्षात येताच तिन आपल्या तोंडाचा पट्टा असा चालू केला की त्याला 'बाई चुकलो माफ कर " म्हणायची पाळी आली, पण त्याचबरोबर आमच्या घरापाशी बरोबर सोडल्यावर तिने मीटरप्रमाणे झालेल्या रकमेपेक्षा पाच रुपये जास्तच दिल्यामुळे तो रिक्षावालाही तिचे कौतुक करत निघाला, तिन घरात शिरताशिरता तिच्या प्रवासातही तिने बडोद्याच्या स्टेशनमास्तरला कसा सरळ केला हे तिने मला ऐकवलेच.

खरे तर मीता तिच्या कंपनीच्या कामाकरता आली होती पण सुधानं आणि प्रकाशने म्हणजे माझ्या मेव्हण्याने आमच्यावर आणखी एक कामगिरी सोपवली होती, आणि ती मीतापासून लपवून ठेवली होती, ती म्हणजे पुण्यातल्याच एका लग्नाळू तरुणाची आणि मीताची जोडी जमवण्याची! हे काम माझ्याच्यानं होईलसे मला वाटत नव्हते पण विद्याचा म्हणजे माझ्या सहचारिणीचा या कामातला अनुभव दांडगा असल्याने मी तिच्यावर भार टाकून निश्चित होतो. मी अमेयला म्हणजे त्या

तरुणाला पाहिले होते आणि तो मीताला योग्य असल्याची माझी खात्री पटली होती प्रश्न होता तो फक्त मीताला तसे वाटण्याचा आणि घोडे तिथेच पेंड खाणार होते.

अनायासे मध्ये रविवार आल्याने मीताला एक दिवस मोकळा होता त्यावेळी अमेयला जेवायला बोलावून त्याची आणि मीताची ओळख करून द्यायचा आमचा विचार होता. पण अशा बनावाला बळी पडेल तर ती मीता कसली! शनिवारीच तिन आम्हा दोघाना आणि आमच्या दोन चिल्यापिल्याना घेऊन रविवारी कुठतरी भटकंती करायला जाण्याचा विषय काढल्यावर माझी आणि विद्याची धाब्यावर धारण बसली कारण अमेयला आम्ही सांगून बसलो होतो, अर्थात त्याला मीताविषयी काही सांगितले नव्हते हे आमचे भाग्य! काहीतरी करून तिला दुसऱ्या दिवशीच्या घरातच जेवण्यास राजी करणे हे अवघड काम होते पण ते विद्याने तिला काय सांगून पार पाडले काही समजले नाही पण दुसऱ्या दिवशीचा घरीच जेवण्याचा कार्यक्रम सहज पार पडला. पण त्यामुळे सुटकेचा सुस्कारा सोडायला मात्र मला उसंत मिळाली नाही कारण अमेयची पाठ फिरताच मीताच्या पट्ट्याला मला तोंड द्यावे लागले.

" मामा काय विचार काय आहे तुझा? " अमेयचे पाऊल घराबाहेर पडताच तिने मला वेठीला धरत म्हटले.

" कसला विचार? "मी वेड पांघरत म्हणालो.

' उगीच नाटक करू नकोस, तुझ्या लक्षात आले आहे मला काय म्हणायचे आहे ते, आणि मामी तुझीही साथ असेलच याला " इतका वेळ गम्मत पहाणाऱ्या

विद्याला आता हल्ला आपल्यावरही होणार याची जाणीव झाली. त्यावर तिनं मात्र "मौनं सर्वार्थ साधनं" असा पवित्रा घेतला. अर्थात. मीतानंच आपला पट्टा पुढे चालवला,

" हे बघ मामी आणि मामा तू सुद्धा, नीट ऐकून घ्या, माझ्या लग्नाच्या वगैरे फंदात तुम्ही पडू नका. माझं मी पहायला समर्थ आहे. "

" अग पण एकाद्या तरुण मुलाशी तुझी गाठ घालून दिली आणि त्याला तू आणि तुला तो आवडला ---- "

" बस बस मला अगोदर लग्न सध्या करायचंच नाही आणि या पद्धतीनं तर मुळी्च नाही " मीतान मला अगदी चारी मुंड्या चीत करत म्हटले.

मग त्यापुढील तिच्या पुण्याच्या मुक्कामात या विषयावर बोलण्याची आमची दोघांचीही काय बिशाद होती. अर्थात माझी शरणागती मी फोनवरूनच सुधाच्या कानावर घातली.

"अरे जाऊदे, तू मनाला नको लावून घेऊस. प्रकाशसारख्या जमदग्नीलाही तिन गप्प बसवलेय मग तुझा काय पाड? " असे मग तिनेच मला समजावले. आणि पुढं असही म्हणाली,

" अरे तिन आम्हाला दोघानाही असंच सांगितलेय. त्यामुळे आम्ही तिचा नाद सोडूनच दिलाय. "

" शाबास, एवढ माहीत होतं तर मग मला कशाला त्या तोफेच्या तोंडी दिलस? " मी वैतागून विचारले.

" अरे मला वाटल तुझं आणि तिचं विशेषत: वहिनीच चांगल जमतं तेव्हां म्हटलं बघावं काही जमते का तुन्हाला "

मीताचा लहानपणापासून स्वभाव असाच होता. प्रत्येक बाबतीत ती तिचाच हेका चालवल्याशिवाय रहात नसे, अर्थात त्यावेळी तिच्या म्हणण्यात तथ्य असायचे हे मात्र खरे. कॉलेजातही त्यामुळे अनेक प्राध्यापकांनाही तिन नाक मुठीत धरून आपल म्हणणं मान्य करायला लावलं होतं. अगदी कॉलेजच्या प्रवेशापासून तिचा पी. एच. डी चा प्रबंध विद्यापीठात सादर करेपर्यंत कधीच प्रकाश अथवा सुधाला तिन कॉलेजची पायरी चढू दिली नव्हती. तिच्या पदवीदानसमारंभाच्या वेळीच काय ते त्यांना विद्यापीठात हजर रहावे लागले होते.

फार्मसीत मास्टर्स पदवी घेतल्यावर तिला कॅडिलामध्ये नोकरी मिळाली आणि बडोद्याहून तिला अहमदाबादला जावे लागले. तेथे तिच्यासाठी घर वगैरे घेऊन देण्यासाठी तिच्याबरोबर जाण्याची तयारी सुधाने दाखवली पण त्यावेळीही तिनं दोघांनाही बरोबर येण्यास विरोध केला आणि एकटीनंच तिथे जाऊन बरोबर बस्तान बसवले. तिच्या मैत्रिणीची एक दूरची नातेवाईक अहमदाबादमध्ये रहात होती तिच्यावर तिने अशी छाप टाकली की तिच्या मोठ्या बंगल्यातच रहाण्याचा प्रेमळ आग्रह तिने केल्यावर बडोद्याच्या फ्लॅटपेक्षाही आरामात ती तेथे राहिली.

कॅडिलात दोन वर्षे पूर्ण होता होताच एक दिवस तिन सगळ्या सामानासह बडोद्यात प्रवेश केला आणि आपण पी. एच. डी. करणार असल्याचे जाहीर केले. एम. एस. युनिव्हर्सिटीत तिने प्रवेश घेऊनही टाकला होता.

मीताचे पी एच. डी. चालू असतानाच सुधाच्या छातीवर गाठ आली आणि दुर्दैवाने ती कर्करोगाचीच निघाली आणि त्यावर शस्त्रक्रिया हाच पर्याय होता. त्यावेळी खंबीरपणे या संकटाचा सामना करायला प्रकाशला मीताचाच मोठा आधार होता. शस्त्रक्रियेच्या वेळी मीही विद्याला घेऊन बडोद्यास गेलो. सुदैवाने शस्त्रक्रिया उत्तम झाली आणि त्यानिमित्ताने आणखी एक चांगली घटना घडली. सुधाच्या समाचारास मीतानरोबर मधून मधून एक उंचापुरा युवक येत होता आणि तशाही अवस्थेत सुधाच्या तीक्ष्ण नजरेने ही गोष्ट टिपली आणि थोड्याच दिवसांनी तिने मीताजवळ विषय काढला आणि तिने सहजपणे कबूलही केले. विशाल अगदी मीताला योग्यच मुलगा होता, उंचापुरा निमगोरा आणि तरतरीत. पण होता बिहारी बाबू. त्याचे आईवडील बिहारमध्ये मुझफ्फरपूरला होते.

सुधाची प्रकृती शस्त्रक्रियेनंतर हळूहळू सुधारत होती, पण अजूनही ती हॉस्पिटलमध्येच होती. एक दिवस मीताबरोबर कारमधून घरी परत येताना प्रकाशने विषय काढला,

"मीता आता विशालच्या आईवडिलांना भेटून लग्नाची बोलणी करायला हरकत नाही तेव्हां चार पाच दिवसात मी निघेन म्हणतो, आता सुधाची काळजी घ्यायला तुम्ही दोघे आहात आणि विद्यावहिनी पण राहिली आहे तेवढ्याच साठी---"

" पण अप्पा, तुम्हाला जायचे कारण नाही. " असे मीताने म्हटल्यावर प्रकाश तिच्याकडे पहातच राहिला.

" म्हणजे लग्नाची बोलणी करायला हवीत ना? खरतर रीतीप्रमाणे आम्ही दोघांनीही जायला हवे पण सुधाला एवढ्यात जाता येणार नाही त्यामुळे मी एकटाच प्रथम जाऊन विशालच्या आई वडिलांची भेट घेतो आणि पुढे काय करायचे ते ठरवतो, तुझा काय विचार आहे? "

" अप्पा, अगोदर आईची तब्येत नीट ठीक होऊदे. विशाल काही कुठे पळून जात नाही. आणखी एक गोष्ट सांगते, तुम्ही दोघानीही इतक्या दूर जाऊन विशालच्या घरच्यांची भेट घेण्याचे कारण नाही, ते सगळे माझ्यावर सोपवा. "

" म्हणजे? तू जाणार आहेस की काय लग्नाची बोलणी करायला? " प्रकाशने जवळ जवळ दरडावून विचारले.

पण मीता त्याला अगदी धुडकावून लावतच उत्तरली,

" अप्पा लग्नाची बोलणी लग्नाची बोलणी काय लावलय सारखं ? ही काय भारत पाकिस्तानमधील बोलणी आहेत का अटी ठरवायला? मी विशालला सांगितले आहे की अप्पा फक्त बडोद्यात लग्न लावून देतील. तुमच्या ज्या नातेवाईकांना यावयाचे असेल त्यांची यादी तयार कर आईची प्रकृती योग्य तेवढी सुधारली की मीच मुझफ्फरपूरला जाऊन त्याच्या मा पप्पाजींची भेट घेणार आहे, तेव्हां तुम्ही त्याविषयी मुळीच विचार करू नका. तुम्ही मुख्य आईकडे आणि तुमच्याकडे लक्ष द्या"

मीताच्या या बोलण्यात तथ्य होते यात शंकाच नव्हती कारण अचानक आलेल्या या आपत्तीमुळे प्रकाशवर मोठाच आघात झाला होता आणि जरी त्याने

नेहमीच्या धीरगंभीर वृत्तीने त्याला तोंड दिले असले तरी त्याच्याही प्रकृतीवर त्याचा परिणाम झालाच होता. पण तरीही मुलीच्या लग्नाची बोलणी करणे हे आपले कर्तव्य आहे ही जाणीव त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. पण मीताने आपलाच हट्ट चालवला आणि प्रकाशला तो मानावाच लागला.

सुधाची तब्येत हळू हळू सुधारत होती. मोठ्या शस्त्रक्रियेला तिला तोंड द्यावे लागले होते पण ती बऱ्यापैकी सावरली इतकी की तिनेसुद्धा मुझफ्फरपूरला जायची तयारी दाखवली पण तिचे काहीही न ऐकता मीताने एक दिवस विशालला बरोबर घेऊन मुझफ्फरपूरला प्रयाण केले आणि तेथे एकच दिवस राहून दोघे परत आलीदेखील. तेथेही तिने विशालच्या मा पप्पाजींवर काय जादू केली कोणास ठाऊक पण फोनवर प्रकाशशी बोलताना पप्पाजींना मीताची किती आणि कशी प्रशंसा करू असे झाले होते हे त्यांच्या बोलण्यातून व्यक्त होत होते.

" प्रकाशजी आप बिलकुल फिकर न करना " आपल्या खास लालूप्रसाद बोलीत त्यांनी प्रकाशला सांगितले. "मीता बिटियाने हमरा दिल जीत लिया है. अब आप जैसा कहोगे वैसाही ब्याह होगा. आप जो करेंगे वही हमे मंजूर है "

प्रकाशची आणि सुधाची मोठीच काळजी दूर झाली होती.

मीताचे लग्न मोठ्या धूमधडाक्यात बडोद्यासच पार पडले. प्रकाशही मोठ्या कंपनीत मॅनेजिंग डायरेक्टर होता त्यामुळे पैशाची काही काळजी नव्हतीच, पण हुंडा म्हणून एक पैसाही द्यायचा नाही ही मीताचीच नव्हे तर त्याची स्वत:चीही अट होती आणि कोणत्याही प्रकारच्या अटी वरपक्षाने लादायच्या नाहीत असेही त्याचे मत

होते विशालच्या मा पप्पाजींनीही कोठलाच आग्रह धरला नाही आणि कोठलाच रुसवा फुगवा न होता लग्न मोठ्या आनंदात पार पडले.

मीता आणि विशालचे लग्न होऊन दोन वर्षे झाली. पपाजींच्या निवृत्तीमुळे मा पपाजी दोघेही विशालकडेच रहात होते आणि स्वाभाविकच आता नातवंडाचे तोंड पहाण्याचे वेध दोघांनाही लागले होते. मीताची त्याला तयारी नव्हती कारण तिच्यामते विशाल आणि तिला नोकऱ्या व्यवस्थित संभाळून जर मा पपाजींकडे लक्ष द्यायचे असेल तर आणखी कोणतीही जबाबदारी वाढवायला नको आणि विशाललाही तिचा दृष्टीकोण चुकीचा वाटत नव्हता. दोन वर्षे त्या दोघांनीही अशीच ढकलली, पण विशालच्या माजीना काही हे पटत नव्हते. मी किंवा विद्या कधीही त्यांच्याकडे गेलो की त्यांचा हाच आग्रह असायचा, "जरा मीताको समझाइये"

शेवटी त्यांच्या या भुणभुणीस वैतागूनच मीताने एक मूल होऊ देण्याचा निर्णय घेतला आणि तिला दिवस गेल्यावर तिचे किती कौतुक करू असे माजींना झाले. नातवंड मग ते मुलगा असो नाहीतर मुलगी माजी खूष होत्या पण पपाजींचे मात्र तसे नव्हते मूल होणार म्हटल्यावर त्यानी विशालकडे आणखी एक आग्रह धरला आणि तो मात्र मान्य करणे मीताला मुळीच मान्य नव्हते. त्यांच्या मते एकच मूल व्हायचे असेल तर मग तो मुलगाच हवा आणि त्यासाठीच सोनोग्राफी करून मूल मुलगा होणार की मुलगी हे पहाण्याचा त्यांचा आग्रह होता. विशालने ही गोष्ट मीताच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करताच ती एकदम उसळून म्हणाली

" नाही नाही नाही ते शक्य नाही "

" लेकिन क्यो? " मीताचा ठाम नकार ऐकूनही विशालने आपला आग्रह न सोडण्याचा प्रयत्न करीत म्ह्टले.

" वही सवाल मैभी पूछूंगी की की ये टेस्ट किसलिये. नातवंड हव ना त्याना मग मुलगाच हवा हा आग्रह अशाला? "

" केवळ पप्पाजीना बरे वाटावे म्हणून! "

"विशाल, तुला हे ऐकून वाईट वाटेल पण खर सांगायच म्हणजे केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी आता आहे त्या परिस्थितीत आहे नाहीतर माझी या बाबतीत काय मते आहेत हे तुला माहीत आहे. तेव्हां आता आणखी त्यांचे काहीही ऐकायची माझी इच्छा नाही "

" पण तपासणी करून गर्भाचे लिंग समजून घेण्यात काय चूक आहे? "

" विशाल, हे तू मला विचारतोस? एक म्हणजे ही गोष्ट बेकायदेशीर आहे आणि ती माझ्या तत्त्वात बसत नाही आणि दुसरे म्हणजे समजा गर्भ स्त्रीलिंगी असेल तर पपाजींचा काय आग्रह असेल हे मी काही तुला सांगायला नको आणि त्याला तर माझा ठाम विरोध असेल "

"यू आर राइट मीता, मी पण या बाबतीत पूर्णपणे तुझ्याच बाजूने आहे. "

" हे पहा विशाल, मी तुला चांगली ओळखते. आता त्यांच्या आग्रहासाठी गर्भजलचिकित्सा करू म्हणतोस तसाच तो गर्भ जर मुलीचा असेल तर त्यांच्याच आग्रहासाठी नष्ट करू असेही म्हणायला तू कमी करणार नाहीस. त्यामुळे याच पायरीवर आपण त्यांना थोपवायला हवे. "

या बाबतीत तरी कोणालाच भीक घालायची नाही याबद्दल ती अगदी ठाम होती. तिचे प्रसूतितज्ञ डॉ. विश्वास यानीही तिला खूप पटवण्याचा प्रयत्न केला. त्यानी तिला असही सांगितले सांगितले की गर्भाचे लिंग कोणतेही असले तरी मा पपाजींना तो मुलगाच आहे असे ते सांगतील पण ही गोष्ट तर मीताला मुळीच पसंत नव्हती. तिने त्यांना निक्षून बजावले की असे खोटे सांगायला तिचा ठाम विरोधच राहील. मुलगी असली तरी गर्भपात करावा लागणार नाही या त्यांच्या शब्दावर तिचा विश्वास होता पण मग गर्भाचे लिंग पहाण्याचे कारणच काय असा तिचा सवाल होता. पण मा, पपाजीनी डॉ. विश्वासच्या समोरच आमच्याकडून असा कोणताही आग्रह रहाणार नाही असे सांगितले. त्याचबरोबर हेही सांगितले की मुलगा अगर मुलगी हे कळल्यास आमच्या घराण्यात काही विधी करावे लागतात. पूर्वी या चिकित्सेची सोय नव्हती तेव्हां दोन्ही प्रकारचे विधी करावे लागत पण आता ही सुविधा आहे तर दोन्ही विधी करण्याची यातायात कशाला असा विचार तिच्यापुढे मांडल्यावर नाइलाजाने ती गर्भजलचिकित्सेला तयार झाली.

चिकित्सेनंतर ती घरी येताच मापपाजी जणु तिची वाटच पहात होते. त्याना हवा असलेला निकाल तिच्या तोंडून ऐकायला ते उत्सुक होते पण मीताने त्यांची निराशा केली, " माजी लडकीही होनेवाली है "

"अच्छा अच्छा हमे उसमेभी खुसी है "मापपाजींच्या तोंडून हे शब्द ऐकून मीताला आश्चर्याचा धक्काच बसला.

"लडकीही सही हम पोतीकोही पोता मानेंगे. "पण मग मुलगा होणार असेल तर काही उपचार तर मुलगी होणार असेल तर दुसरे काही उपचार करण्याविषयी आधीच

त्यांनी सांगितल्यामुळे डॉ. विश्वास करीत असलेले उपचार इमानेइतबारे करून घ्यायला केलेला त्यांचा आग्रह तिला मान्य करावा लागला.

दिवस राहिल्यावरही रजा काढून घरात बसण्याची मीताला आवश्यकता वाटत नव्हती आणि तिचा तो पिंडही नव्हता. शिवाय आपली तब्येत अगदी ठणठणीत आहे याची तिला खात्री होती, अगोदर सांगितल्याप्रमाणे काही विधी तिचा असल्या गोष्टींवर विश्वास नसूनही केवळ त्याना बरे वाटावे म्हणून तिने करून घेतलेही. पण तरीही डॉ. विश्वास यानी दिलेली औषधे तिने घ्यावीत असा आग्रह मापपाजी का करत होते ही गोष्ट तिला समजत नव्हती. शिवाय ती स्वत: फार्मसीतील डॉक्टरेट असल्यामुळे त्यांची औषधे ही गर्भारपणात घेण्याची नाहीत एवढे तिला निश्चितपणे कळले त्यामुळे एक दिवस तिने डॉ. विश्वासनाच विचारले,

"डॉक्टरकाका, तुम्हाला राग येणार नसेल तर एक गोष्ट विचारू? "

"बोल बाळ अवश्य विचार "

" मग ही जी औषधे मला घ्यायला आपण सांगत आहात ती कसली आहेत हे मला कळू शकेल का? "

" हे काय विचारतेस मीता तुझी प्रसूति सुरळीत व्हावी म्हणूनच सगळे चालले आहे ना, मग ही औषधे हाही त्याचाच एक भाग आहे. "

" अस्सं? पण डॉक्टरकाका मी जरी मेडिकलची डिग्री घेतली नाही तरी फार्मसीच्या माझ्या अभ्यासानुसार ही औषधे प्रेग्नन्सीत घेण्याची नाहीत एवढे मला

नक्की माहीत आहे. त्यामुळे ही औषधे मी कशासाठी घ्यायची हे कळल्याशिवाय मी ती नाही घेणार "

आता मात्र नाइलाज होऊन डॉक्टरांना खरे काय ते सांगावेच लागले.

"मीता, कदाचित तुझा विश्वास बसणार नाही पण मी स्वत: काही संशोधन करून गर्भाचे लिंग बदलण्यासाठी काही औषधे सिद्ध केली आहेत. अर्थातच ती अगदी वेगळ्या प्रकारची आणि नेहमीच्या पठडीत न बसणारी आहेत. मी त्यांचा प्रयोग तुझ्यावर करावा असा विशालच्या पपांचा आग्रह आहे. "

"आणि ही गोष्ट मला सांगणे तुम्हाला आवश्यक वाटले नाही? थोडक्यात अशी सिद्ध न झालेली औषधे वापरून पहायला गिनीपिगसारखा तुम्ही माझा उपयोग करणार आणि तेसुद्धा मला पत्ता लागू न देता मला हे मुळीच मान्य नाही. "

"मीता माझ्यावर विश्वास ठेव. यातील एकही औषधी द्रव्य तुझ्या किंवा बाळाच्या तब्येतीवर प्रतिकूल परिणाम करणार नाही याची खात्री मी देतो. "

मीताने त्यावेळपुरती माघार घेतली तरी विशालसमोर तिच्या संतापाचा उद्रेक झालाच. आणि तिची समजूत घालताघालता त्याला नाकीनऊ आले शेवटी विशालने तिला विचारले,

" तुला यात काय अयोग्य वाटले? तुला मूल नको असे तू म्हणालीस ते मीही मान्य केले पण आता मा पपांच्या आग्रहाखातर जर मूल होऊ द्यायला तू तयार झालीस तर त्याना हवे असल्याप्रमाणे तो मुलगा होण्यासाठी त्यांच्या प्रयत्नात तुला साथ द्यायला काय हरकत आहे? एरवीही मुलगा किंवा मुलगी यापैकी काहीही झाले

तरी तुला मान्यच होते आता डॉक्टरचाचांच्या प्रयोगामुळे जर मुलगाच होण्याची हमी असेल तर त्यात बिघडले काय? तुला मुलगीच हवी असे तर तू म्हटले नव्हतेस. "

" हे बघ विशाल, अगोदर मला मूलच नको होते पण आता केवळ तुमच्या घरात मुलगाच हवा म्हणून मुलगी होणार असे कळूनही तसे होऊ न देण्याच्या या प्रवृत्तीला माझा विरोध आहे. "

" मीता I fully agree with your point पण एक गोष्ट लक्षात घे मा पपाजी मुलगा हवा म्हणून तुला अबॉर्शन कर अस तर म्हणत नाहीत एक निरुपद्रवी औषधी उपचार करायला तुझी संमती घेण्याची त्याना आवश्यकता वाटली नाही असे नाही पण त्याना तुझा स्वभाव चांगला माहीत आहे आणि त्यामुळे तू याला तयार होणार नाहीस असे त्याना वाटत होते त्यामुळेच डॉक्टरचाचांना त्यानी तसे सांगितले इतके होऊनही तुला ते उपचार करून घ्यायचे नसतील तर मी त्यांची समजूत काढतो आणि ते आपण बंद करूया पण त्यांची एवढी एक इच्छा तुला त्रास न होता पुरी करता येत असल्यामुळे त्याला विरोध तू करू नयेस असे मला वाटते. "

विशालचा युक्तिवाद पटला म्हणून म्हणा किंवा प्रत्येक बाबतीत आपल्या मुलीपेक्षाही अधिक मायेने आपल्याला जपणाऱ्या मा पपाजींचा अपेक्षाभंग करणे अयोग्य वाटल्यामुळे म्हणा पण मीताने शेवटी डॉक्टरकाकांची औषधे घेण्याच्या मा पपाजींच्या आग्रहाला मान्यता दिली.

आणि शेवटी ज्या दिवसाची डोळयात प्राण आणून मापपाजी वाट पहात होते तो दिवस उगवला आणि आणि खरोखरच त्यांच स्वप्न खर झाल आणि मीतान एका

सुंदर गुटगुटीत मुलाला जन्म दिला आणि पपांना अक्षरश: आकाश ठेंगणे झाले नातवाचे नाव काय ठेवायचे याविषयी अगोदरपासूनच खल चालूच होता. पपांना इतरांनी सुचवलेली कोणतीच नावे पसंत पडत नव्हती. कोणतेही नाव सुचवले की त्यात काहीतरी खोडी त्याना आढळायची. शेवटी संदेश, गगन, प्रद्योत, सुमेध अशी अनेक नावे ठेवण्यात आली त्यातले सुमेध जरी आवडले तरी शेवटी पपांचा तो पिट्टूच झाला.

********** **********

आज पपांचा पिट्टू अमेरिकेतून येणार होता. आता तो काही पिट्टू राहिला नव्हता. आता तो तरणाबांड, उंचापुरा ऐटबाज युवक सुमेध झाला होता त्याचा दोन वर्षापूर्वीचा फोटो पपांना आठवत होता. तरुणपणी आपण असेच दिसत होतो हे पपांना आठवले. या दोन वर्षात मात्र तो फिरकला नव्हता. मधूनमधून त्याचे फोन येत आणि पपांशीही त्याचे बोलणे होई. पण का कोण जाणे त्याच्या बोलण्यात पहिला उत्साह जाणवत नसे. त्याचा आवाजही पूर्वीसारखा वाटत नसे. काय फरक झाला आहे हे काही पपांना समजत नव्हते, मीताला विचारले तर "पपा तुम्ही उगीचच काळजी करता सगळ ठीक चालल आहे" अस ती सांगायची.

सहा वर्षापूर्वीच सुमेध अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी गेला आणि आपल्या हुशारीमुळे जॉर्जिया विद्यापीठातील त्याच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील सर्व पारितोषिकांचा मानकरी झाला. पदवीदानसमारंभाचे फोटो त्याने पाठवले होते. खर म्हणजे त्या समारंभास जातीने हजर रहाण्याची पपांची फार इच्छा होती, पण त्याना व्हिसा काही वेळेत मिळाला नाही आणि मग जाण्यात त्याना काही उत्साह उरला

नाही. पदवी घेतानाचा आणि पदवी हातात घेऊन त्याचे काढलेले फोटो बघून पपांना आनंद तर झालाच पण त्या फोटोत सुमेधने मिशांना चाट दिलेली पाहून त्याना बरे वाटले नाही. आपल्या घराण्यात बाप मेल्याशिवाय कोणी मिशी उतरवत नाही असे त्यांनी विशालला बोलूनही दाखवले, पण त्यानेही "ही हल्लीची मुल त्यांचा या गोष्टींवर विश्वास नसतो पपा " अस म्हटल्यावर किमान विशालची तरी मिशी अजून शाबूत आहे हेच आपल भाग्य अशी त्यानी स्वत:ची समजूत घातली.

सुमेध आला की त्याच लग्न करून टाकायचा हा बेत त्यानी पक्का केला होता. विशालसारखेच त्याने अमेरिकेत काही जमवले नाहीना याची त्यानी मीता आणि विशालकडून पुन्हापुन्हा विचारून खात्री करून घेतली होती. आणि त्यासाठी आपल्या अगदी जवळच्या मित्राची नात त्यानी मनात पक्की ठरवून ठेवली होती.

मात्र विशाल, मीता आणि ममासुद्धा त्याना वारंवार सबुरीचा सल्ला का देत होते हे त्यांना लक्षात येत नव्हते, पण त्याना काहीतरी एक अशी गोष्ट माहीत आहे की जी ते आपल्यापासून लपवून ठेवत आहेत असा ठाम संशय मात्र त्याना आला होता.

विमानतळावर जाण्यासाठी पपांची केव्हापासून तयारी चालू होती. मात्र त्यांना इतक्या दूरवा पल्ला कारने जाणे त्यांच्या प्रकृतीला मानवणार नाही असे विशालने म्हटल्यावर मात्र त्यांचा पारा चढला

"आप क्या समझते है मै बूढा हो गया हूं? " असे म्हणत सगळयांची त्यांनी इतक्या कडक शब्दात हजेरी घेतली की त्यावर काहीही न बोलणेच श्रेयस्कर असा निर्णय घेऊन सगळेजणच विमानतळावर निघाले.

नेहमीप्रमाणेच विमानतळावर तुडुंब गर्दी होतीच. सुमेधची फ्लाइट आल्याची घोषणा झाली आणि पपांना केव्हा एकदा नातवाला पहातोय आणि मिठीत घेतोय असे होऊन गेले. इतक्या गर्दीत तो आपल्याला कसा सापडेल याचीच चिंता त्याना लागून राहिली, पण अर्ध्या तासातच विशालचा मोबाइल वाजला आणि मीताला, "अग सुमेधा येतेय "अस म्हणताना त्यानी ऐकले आणि हा अस का म्हणाला याचा त्यानी विचारही केला नाही म्हटला असेल घाईत अशी स्वत:ची समजूत त्यांनी घातली. आणि पंधरा मिनिटातच ड्रायव्हर मारुतीने "आल्या बरका ताई. "अस म्हटल्यावर त्याने दाखवलेल्या दिशेने त्यानी आपले डोळे बारीक करत दृष्टी टाकली आणि त्यांच्या दिशेने हसत हसत येणाऱ्या एका गुलाबी गालाच्या कुरळया केसांच्या तरुणीने मीता आणि विशालकडे पाहून हात उंचावून हलवला तेव्हां त्याना हा काय प्रकार आहे काहीच कळेना, "अरे विशाल सुमेध कोठे आहे? "पण विशालने काही उत्तर देण्यापूर्वीच ती तरुणीच पुढे येवून पपांच्या पायाला हात लावत म्हणाली, "पपाजी मीच तुमचा सुमेध पण आता सुमेधा "

विशालने त्यांच्या खांद्याला स्पर्श करीत म्हटले, "पापाजी अब घर चलिये, मै सबकुछ समझाता हूं आपको. "

पपांना आता काही सांगायची आवश्यकता उरली नाही. पण विशालच्या कानात कुजबुजावे तसे ते म्हणाले, "विशाल बेटा, मला समजले सगळे. सुमेधमध्ये

बदल घडावा ही ईश्वराचीच इच्छा. आम्ही एकदा प्रयत्न केला विधिलिखित बदलण्याचा पण यही उसके भाग्यमे लिखा था। आणखी एक सांगतो जो होता है वही अच्छाही होता है।"

विशाल आश्चर्याने पपांकडे पहात राहिला. तो स्वत:, मीता आणि ममासुद्धा मानसिक दृष्ट्या या गोष्टीला पहिल्यापासूनच तयार होते. त्यामुळे आपल्यात होत असलेल्या मानसिक आणि शारीरिक बदलाविषयी आणि शेवटी पूर्णपणे आपण सुमेधा झाल्याची गोष्ट सुमेधने त्यांच्यापासून लपवून ठेवली नव्हती मात्र पपांना ती कितपत मानवेल याविषयी साशंक असल्यामुळेच ती त्यांच्यापासून लपवण्यात आली होती पण आता त्यांची प्रतिक्रिया पाहून त्याना आश्चर्य वाटले.

"क्षमा कीजिये पपाजी आपसे ये बात हमने इसलिये छुपायी थी की ---- "

"बस बस समजलो मी आणि त्या बाबतीत मी तुम्हाला दोष नाही देणार -- "त्याला मध्येच थांबवत पपा म्हणाले.

" झाले त्यात वाईट काय आहे? जो हुवा वो अच्छाही हुवा है। इसलिये गम किस बातका? सबको खुषही होना चाहिये।अब जमाना लडकियोंकाही है, देखो कल वोही राज करनेवाली है ।कल उन्हीका है। " आणि पपांच्या उत्साहात सगळे वातावरण आनंदमय झाले

# ६. ती सध्या काय करते?

आपण किती पुढचा विचार करतो यापेक्षा किती पुढचा विचार करावा हा प्रश्न अधिक मौलिक आहे. आमच्या घराण्यात घर बांधणारा मी पहिलाच पुरुष त्यामुळे औरंगाबादला घर बांधताना माझी आणि माझ्या पत्नीची आणि माझीही कल्पना होती की आम्ही आणि आमची मुले आम्ही नेहमीच एकत्र रहाणार. म्हणून अगदी सगळ्यांना व्यवस्थित पुरेल असे घर आम्ही बांधले शिवाय वाटण्या करायच्या झाल्याच तर प्रत्येकास समान वाटा यावा अशीही काळजी बांधकाम करताना घेतली होती पण या सगळ्या दक्षतेचा काही उपयोग झाला नाही. "आकाशी झेप घे रे पाखरा " हे गीत आमच्या मुलांनी अगदी पाळण्यातच ऐकल्यामुळे शक्य झाले तेव्हां त्यांनी घराबाहेर झेप घेतली. धाकटा तर प्रथम मुंबईस आणि दोन वर्षात अमेरिकेसच जाऊन बसला. तर मोठा थोडे दिवस आमच्याजवळ राहिला हेच फार झाले असा विचार करून पुण्यास जाऊन बसला तो परत औरंगाबादला येण्याची शक्यता दिसेना त्यामुळे मी सेवानिवृत्त झाल्यावर औरंगाबादला आम्ही दोघेच राहिलो. शेवटी असे दोघानीच रहाण्या ऐवजी सगळ्यानी रहाण्यासाठी बांधलेल्या घरात आम्हीही न रहाण्याचा निर्णय घेतला.

हा निर्णय पत्नीच्या दृष्टीने अवघड होता कारण मी कोठेही गेलो तरी तेथीलच बनून रहातो तसे तिचे नाही, शिवाय घर बांधताना तिनेच फार कष्ट उपसलेले,

त्याभोवती हौसेने बाग फुलवलेली, शेजार पाजार या सगळया गोष्टी सोडणे तिला कसे काय जमेल असे वाटत होते पण नातवाच्या आगमनामुळे या सगळया गोष्टी गौण ठरल्या आणि तिलाही घर. बाग. शेजार यापैकी कोणत्याच गोष्टीचा मोह अडवू शकला नाही आणि अशा रीतीने आम्ही पुण्यास स्थलांतरित झालो अगदी चक्क औरंगाबादचे घर विकून टाकून.

आश्चर्य म्हणजे पुण्यात आमच्या रहाण्याच्या जागेजवळच माझे बरेच बालमित्र रहात होते. त्यांचा शोध हळूहळू लागत गेला, म्हणजे मी फिरायला सकाळी बाहेर पडल्यावर कोणीतरी ओळखीचा चेहरा दिसायचा आणि मग तो शाळेत माझ्या वर्गात असलेला मित्र अथवा मैत्रिण निघायची. अशा मित्रांचा आमचा चांगलाच मोठा जथा झाला आणि मला वाटले या भागात जर इतके गाववाले जमू शकतात तर समस्त पुण्यात खूपच असतील. आमच्या वर्तुळात यावर चर्चा झाली तेव्हां प्रत्येकाला माहीत असलेले किमान दहाजण तरी निघाले मग सर्व एकत्र जमले तर सर्वांना इतक्या वषांनी भेटायला किती आनंद होईल अशी चर्चा चाले.

नुसती चर्चा करण्यापेक्षा काहीतरी कराव अस वाटून मी सहज एका वृत्तपत्रात एक निवेदन दिले आणि त्यात आमच्या ग्रामवासी बंधुभगिनींचा मेळावा घेण्याचा विचार मांडला व माझ्या दूरध्वनी कमांकावर वा पत्त्यावर संपर्क साधायला सांगितले. आश्चर्य म्हणजे अशा आवाहनाला काय प्रतिसाद मिळेल अशी शंका उपस्थित करणाऱ्या सर्वांनाच अगदी आचंब्यात पाडणारा असा भरभरून प्रतिसाद मिळाला. केवळ पुण्यातीलच नव्हे तर पुण्याबाहेरीलही लोकांनी यायची तयारी दाखवली.

एक दिवस असाच माझा फोन खणखणला आणि पलीकडून एक जाडाभरडा आवाज आला, "अण्णा, मी वाल्या बोलतोय "पण माझ्या डोक्यात प्रकाश न पडल्यामुळे, "वाल्मिक इंगळे मी सुहासचा क्लासमेट. तुम्ही फार चांगला उपक्रम सुरू केलाय मी पण येणार आहे. " येवढा संवाद होऊन फोन बंद झाला आणि मी हा वाल्या कोण याचा विचार करत बसलो. आणि एक दिवस चक्क वाल्याच माझ्यासमोर उभा राहिला आवाजासारखाच खडबडीत व्यक्तिमत्वाचा. आणि मग त्याला कधीतरी माझ्या धाकट्या भावाबरोबर पाहिलेले आठवले. माझा भाऊ माझ्यापेक्षा वयाने चांगला सात वर्षांनी लहान असल्याने त्याच्याकडे आणि त्याच्या वर्गमित्रांकडे आम्ही चिल्लेपिल्ले म्हणूनच पहात होतो शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्वाला काही आकार येण्यापूर्वीच मी पुण्यास महाविद्यालयीन शिक्षणासाठी गेल्यामुळे तर मी त्याना पारच विसरून गेलो होतो.

वाल्याचे नाव वाल्मिक होते पण लहानपणापासून त्याची वाल्या ही ओळखच आम्ही गाववाल्यानी लक्षात ठेवली. वाल्याचा वाल्मिकी झाल्याचे कुणी फारसे मनावर घेतले नव्हते त्यामुळे मित्रमंडळीत अजून तो वाल्या म्हणूनच ओळखला जाई. वाल्यालाही वाल्मिकीप्रमाणेच काव्याचे चांगले अंग होते आणि आमच्या गाववाल्यांच्या स्नेहसंमेलनातही त्याने आपल्या काव्यगायनाने सगळयाना अगदी खूष केले.

वाल्या असा माझ्या ध्यानात राहिला आणि मधून मधून भेटतच राहिला. मधून मधून त्याचा फोनही येई आणि हटकून सुहास कसा आहे अशी चौकशी होई. तरीही तो कधी घरी आला नव्हता. अर्थात मी जरी सेवानिवृत्त झालो असलो तरी बाकी

मंडळी अजून आपले व्यवसाय, धंदे संभाळत असल्यामुळे त्यानी भेटायला यावं अशी इच्छा असली तरी त्यांना ते शक्य न झाल्याचे मला दु:ख नव्हते. त्यामुळे त्यादिवशी त्याचा फोन घरी येतो असा ऐकून आश्चर्यच वाटले व आनंदही झाला.

"अण्णा, " मला सुहास अण्णा म्हणत असल्याने त्याचे दोस्तही त्याच नावाने बोलवायचे. "मुलाच लग्न काढलय आल पाहिजे"असा त्याचा आग्रहाचा फोन आला आणि पाठोपाठ तोही आला बरोबर आपल्या चिरंजीवास घेऊन. इतक्या आग्रहाने बोलावल्यावर त्या लग्नास न जाणे शक्यच नव्हते.

लग्न होते बऱ्याच दूर असलेल्या हॉलमध्ये अर्थात माझ्या दृष्टीने गैरसोयीचा असला तरी त्याच्या दृष्टीने सोयिस्कर होता. हॉल गैरसोयीचा आहे या कारणासाठी न जाणे योग्य दिसले नसते. माझ्या बायकोने मात्र इतक्या दूर येणार नाही अशी पहिल्यापासूनच माघार घेतली आणि त्यासाठी तिला आग्रह करणे योग्य नव्हते. शिवाय बऱ्याच बालमित्रांची गाठ पडण्याचे आमिष मला खुणावत होते. जवळचे आणखी दोन मित्र येणार होतेच. मुलाची कार असली तरी चालवायला कोणाला येत होती? त्यामुळे अर्थातच रिक्षानेच आम्ही गेलो.

बऱ्याच दूरच्या त्या हॉलमध्ये आम्ही अगदी वेळेवर पोचलो. मात्र तेथे पोचल्यावर मुहूर्त हा फक्त कार्य आजच होणार आहे हे सिद्ध करण्यापुरताच केवळ देण्यात आला आहे हे मला समजले. अशा कार्याची मला संवय नव्हती अशातला भाग नव्हता. अगदी माझ्या मुलाच्या अमेरिकेत गेलेल्या मित्राच्या बहिणीच्या लग्नाला आम्ही गेलो तेव्हां मुहूर्ताची वेळ टळून गेली तरी मंडपात मुलाचा पत्ता नव्हता आणि कारण विचारले असता जो बॅंड मुलीच्या वडिलांनी बोलावला होता

तो नवऱ्या मुलाला पसंत नव्हता त्यामुळे तो लग्नमंडपात यायला तयार नव्हता असे कळले. बराच वेळ वाट पाहून शेवटी कंटाळून आम्ही घरी परतलो. शेवटी ते लग्न संध्याकाळी केव्हांतरी लागले असे कळले. त्यामानाने वाल्याचा मुलगा व त्याची वाग्दत्त वधू तसेच सगळे नातेवाईक हजर होते, मात्र बौद्ध भिक्षूंच्या मंगल आशीर्वादात लग्न लागायचे असल्याने व ते आशीर्वाद बरेच दीर्घ असल्याने लग्नास उशीर होत होता.

आम्ही सगळे गाववाले एकत्र बसून गप्पा मारत होतो शिवाय सगळेच एकएकटे असल्यामुळे गप्पांवर सेन्सार करायलाही कोणी नव्हते. तेवढ्यात सतिश तेथे आला आणि गप्पांना रंग चढला. , "अरे गोट्या, मंदी मला भेटली होती आणि तुझी आठवण काढत होती. " मी एकदम चमकलो मला गोट्या म्हटले म्हणून नाही तर मंदीच नाव जवळ जवळ चाळीस पन्नास वर्षानी प्रथमच कानावर पडत होत म्हणून. आमच गाव जरी लहान असल तरी भानगडफेमही होत. बरीच छोटीमोठी प्रकरण गावात चालत पण प्रकरणात गुंतलेल्यांना मात्र आपण अगदी गुपचुप भेटत आहोत अस वाटायच आणि प्रत्यक्षात ती बातमी गावात केव्हांच पसरलेली असायची. तरी ते दिवस आजच्या सारखे शाळेतीलही मुलांमुलींनी एकमेकाशी मोकळेपणी बोलण्याचे नव्हते. एकादेवेळी वह्या पुस्तकांची देवाणघेवाण करणे आणि दसऱ्याला सोने आणि संक्रांतीला तीळगूळ द्यायला एकमेकाच्या घरी जाणे यापलिकडे आमची कधी मजल जात नसे.

त्यामुळे मंदी आणि मी भेटतो याला मी जबाबदार नसलो तरी याबाबतीत मी काय सांगतो यावर कोणी विश्वास ठेवील असे मला वाटत नव्हते. त्यावेळी मी

एकनाथबुवांकडे तबला शिकायला जात होतो. बुवांची एक मुलगी होती जवळ जवळ माझ्याच वयाची तीच मंदी. जर मला कधी बुवांकडे जायला उशीर झाला तर ते तिला मला बोलावण्यासाठी पाठवायचे. त्या वयात आमच्या घरात किंवा बुवांच्या घरात या गोष्टीचे कुणाला काही विशेष वाटायचे नाही पण मला मात्र ती बोलवायला आली की उगीचच लाज वाटायची. तसे ती आली की काहीतरी वेगळे आणि छानही वाटायचे ही गोष्ट वेगळी. आणि तीही पण होती मोठी ठसकेबाज! तिच्या बरोबर मी निघालो की उगीचच अंगाला अंग घासायची, लाडे लाडे बोलायची. मी शक्य तो न बोलण्याचा प्रयत्न करायचो तर ती मुद्दामच काहीतरी प्रश्न विचारायची. मी कसाबसा तिच्याबरोबर शक्य तो कमीतकमी बोलण्याचा प्रयत्न करत तिच्यापासून शक्यतो दूर रहाण्याचा प्रयत्न करत बुवांकडे पोचायचो पण आमच्या या वरातीचा सुगावा आमच्या टवाळ मित्रांना बरोबर लागायचा आणि नंतर माझी गाठ पडली की, "काय गोट्या काय म्हणतेय मंदी? मजा आहे बुवा तुझी! " अशा त्यांच्या टवाळीला मला तोंड द्यावे लागे.

मंदीला मात्र जणु या गोष्टींची कल्पनाच नव्हती. ती अगदी बिनधास्तपणे माझ्याबरोबर यायची इतकेच काय पण बुवांच्या घरी असेपर्यंत माझ्या तबलाशिक्षणाकडे तिच लक्ष असायच. मी शाळेत जाताना तिच्याच घरावरून जात असल्यामुळे ती जणु पाळतीवर असल्याप्रमाणे मी तिच्या घरावरून जातानाच घराबाहेर पडायची आणि मग माझ्याबरोबर गप्पा मारतच शाळेत यायची. शेवटी तिची ब्याद टाळण्यासाठी मी माझा शाळेत जायचा रस्ताच बदलला. तरीही एक दिवस ती समोरूनच आली आणि तिला टाळणे मला जमले नाही,

"काय रे गोट्या, , माझ्याशी अगदी बोलायचे नाही का? "

"कुठ काय तसं काही नाही " मी उगीचच वेड पांघरल्याचा आव आणून म्हणालो.

"तुम्ही काय बुवा हुषार लोक आमच्याशी कश्याला बोलताय " म्हणून ती निघून गेली मलाही जरा आपण तिला उगीचच तोडतोय असं वाटू लागलं.

पण जसे आम्ही मोठे होत गेलो तसा मात्र यात एकदमच फरक पडला म्हणजे आता मंदीचे बरोबर येणे मला आवडू लागले. म्हणजे पूर्वीही आवडत नव्हते असेच काही म्हणता येणार नाही पण मी वर वर तरी तसे दाखवत होतो, आता मात्र तिने बोलावे असे वाटू लागले होते आणि आता ती मात्र पूर्वीसारखी मला बोलवायला येईनाशी झाली, उलट आता ती मला टाळतेच आहे असे वाटू लागले. कधी कधी ती समोरून जात असली तरी माझ्याशी न बोलता सटकू लागली. शेवटी एक दिवस मीच तिला हटकले आणि म्हटले, ’आताशा माझ्याशी बोलत नाहीस मंदे, "

"ते तुला नाही कळायच नंदू. " मला गोट्या या नावाने हाक मारणेही तिने बंद केले आता. आणि अचानक बाबांची बदली झाली. जायच्या दिवशी ती आमच्याकडे आली आणि जाताना माझ्याकडे वळून म्हणाली, "आठवण ठेवशील नारे नंदू माझी? " त्यावेळी चक्क तिच्या डोळ्यात पाणी तरळल्यासारखे वातले. तीच तिची शेवटची भेट.

त्यानंतर मंदीचा उल्लेख आत्ता किती वर्षांनी निघाला आणि एकदम मनातल्या त्या जुन्या आठवणी जाग्या झाल्या. त्या हुळहुळत्या जखमेला अचानक हात लागून चमक निघावी तसे झाले,

"मग काय म्हणत होती? "उत्सुकतेने मी विचारले.

"तू इथंच आहेस म्हटल्यावर तुझा फोन नं. काय आहे विचारत होती. "

"मग दिलास की नाहीस? "

"नाही बुवा, तिला द्यायचा की नाही, तुला विचारावे म्हटले "

"अरे त्यात काय विचारण्यासारखे होते? , " मला उगीचच निराश झाल्यासारखे वाटले.

"ती डेक्कन जिमखान्यावर जनसेवा च्या वरच्या मजल्यावर रहाते" सतीशने मला माहिती पुरवली. "जा जाऊन भेट. "

"तिला भेटण्यात मला काय इंटरेस्ट? "

"कदाचित तिला असेल" सतीश मला डिवचत म्हणाला.

मंदीचा विषय का कोण जाणे उगाचच मनात घोळत राहीला. एकादे दिवशी खरच तिची गाठ घ्यायला जावे का असं वाटू लागलं. आता ते बालसुलभ औत्सुक्य राहिले नव्हते, पण तिला एकदा भेटावे असे मात्र राहून राहून वाटू लागले. सतीशकडून तिचा फोन नंबर घ्यायला हवा होता असे वाटू लागले. त्यादिवशी डेक्कनवर काहीतरी काम असल्याने मी एकटाच गेलो होतो आणि जनसेवासमोर गेल्यावर वाटले जावे का मंदीला भेटायला. काय वाटेल तिला अचानक भेटल्यावर?

त्यावेळपर्यंत जरी पुण्यात फोन केल्याशिवाय न जाण्याची संस्कृति मूळ धरू लागली नसली तरी पूर्वकल्पना दिल्याशिवाय असे जाणे योग्य दिसणार नाही असे वाटले. तरी गेलोच तर काय होईल? फार फार तर गाठ पडणार नाही, आणि असेल घरात तर निश्चितच भेटेल, म्हणून जिन्याच्या पायऱ्या चढायला लागलो. ज्या अर्थी सतिशला ती माझा फोन नंबर विचारत होती त्या अर्थी मला भेटावं असं तिला निश्चितच वाटत असणार.

शेवटची पायरी चढून दारावरील बेल दाबली. दार तिनंच उघडावं अशी इच्छा होती आणि दार उघडताच, "काय ओळखलंस का? " म्हणून मी तिला आश्चर्याचा धक्का देईन आणि "अय्या नंदू तू? " असा उद्गार ती आपल्या हसऱ्या चेहऱ्यावरील उघड्या ओठांवर हात ठेवीत काढेल असे मनोरथ मी घोळवीत असतानाच एका दंतविहीन, कपाळावर चष्मा सरकवलेल्या वृद्ध स्त्रीने "कोण आहे? " असे थरथरत्या स्वरात विचारले. ही मंदीच का मी मनातल्या मनात विचारले. मला बोलवावयास येणाऱ्या, लाडे लाडे बोलणाऱ्या त्या मंदीचा तेथे मागमूसही नव्हता, आपली काहीतरी चूक झाली असावी असे मला वाटून गेले. सतिशला माझा फोन नंबर विचारणारी मंदी हीच का? मनातली निराशा लपवून मी म्हणालो " माफ करा, मंदाकिनी श्रोत्री हव्या होत्या मला, पण माझी काही तरी चूक झाली असावी. "

" आपली चूक नाही झाली, पण आपण कोण? " त्या स्त्रीने विचारले, "मी नंदू --- नंदू कान्हेरे "

" असं का मग याना, मीच मंदाकिनी " म्हणून तिने दार उघडून आत घेतले.

"म्हणजे एकनाथबुवांची--"

"मंदीच मी "आपल्या बोळके झालेल्या तोंडाने हास्य करत ती म्हणाली.

मग थोडावेळ गप्पा झाल्या, तिच्या सुनेनं चहाही केला पण आपण मंदीलाच भेटलो असे मात्र मला वाटले नाही. थोड्या वेळाने बाहेर पडत असताना माझे लक्ष बाजूला गेले आणि एक टक्कल पडलेला वृद्ध गृहस्थ माझ्याकडे बघून हसताना दिसला. आणि तो हुबेहूब माझ्यासारखाच दिसत होता. मी विचारात पडलो जरा विचार केल्यावर माझ्या लक्षात आले की त्या भिंतीवर मोठा आरसा टांगलेला होता आणि माझेच प्रतिबिंब माझ्याकडे पाहून हसत होते.

# ७. आईची नथ

एक मंगळसूत्र --तेही दोन सोन्याच्या वाट्या व बाकी काळे मणी असेच --- सोडले तर दुसरा एकच दागिना लहानपणापासून आईच्या अंगावर मला पाहायला मिळाला. तो म्हणजे तिच्या कानातल्या कुड्या. आईचं माहेर कुबेर! आणि नुसत्या आडनावानेच नाही तर खरोखरीचेच कुबेराचे वैभव तिच्या घरी नांदत होते! जमीन जुमला भरपूर होता. पण तिच्या लहानपणीच तिचे आई वडील तिला सोडून गेले आणि आई, तिची एक मोठी बहीण आणि मोठा भाऊ या तीन अपत्यांचा सांभाळ तिच्या म्हाताऱ्या आजीलाच करावा लागला. कारण आजोबा तर अगोदरच जग सोडून गेले होते.

कुबेर घराण्यात वारीची परंपरा होती. आईच्या आजोबांनी, वडिलांनी प्रत्येक एकादशीला पंढरीची वारी चुकवली नाही. वडील तर नावाने तुकाराम होतेच पण तितकेच भाविकही होते. त्यामुळे तुकाराम बुवा म्हणूनच प्रसिद्ध! पण आजी मात्र ढालगज होती. या तीन अपत्यांचा सांभाळ त्यांच्या आईवडिलांच्या पश्चात आणि घरात पुरुष माणूस नसताना या बाईन मोठ्या करारी बाण्यान केला. घोड्यावर स्वार होऊन ही म्हातारी एकटी सर्व कुळांकडून खंड वसूल करायची. पण या करारी म्हातारीनं नातवापुढे मात्र हार खाल्ली होती. तसा मामा खरं तर अगदीच गरीब म्हणजे शामळूच म्हणावा असा! त्याचं लग्न आज्जीनं लवकरच लावून दिलं होतं. .

पण जहांबाज आज्जीचा अंदाज चुकला आणि सून तशी नात्यातलीच पण फारच पाप्याचं पितर निघाली लग्न झाल्यावर सुधारेल असं वाटलं होतं पण कसले काय, वर्षभरातच तिनं राम म्हटला.

त्यानंतर आमच्या भोळया सांब मामाला तो आषाढी वारीला गेल्यावर कुणी गठवलं कुणास माहीत आणि आपली न खपणारी पोरगी त्याच्या गळयात बांधली, ही मामी मात्र एकदम खडूस निघाली. तिनं जहांबाज आजेसासूलाही गुंडाळून ठेवलं. आमच्या मामा-मामीची जोडी अगदी आजच्या सासू-सून मालिकांत दिसणाऱ्या आपल्या बायकोच्या होला हो करणारा नवरोबा आणि त्याची जहांबाज बायको अशीच होती, माझी आई भावंडात सगळयात धाकटी. त्यामुळे तिचे लग्न होईपर्यंत त्या खडुस मामीने मामाचा आणि सगळया घराचा ताबा घेतला होता. लग्नात मामाने सगळे दागिने आजीच्या हट्टामुळे माझ्या आईच्या अंगावर चढवले होते पण लग्न होताच ते सगळे पॉलिश करायला म्हणून परत नेले ते त्यानंतर कोणालाच पहायला मिळाले नाहीत. . वडिलांनी कधीच त्या दागिन्यांचा मोह धरलेला नसल्यामुळे त्यांनी या गोष्टीकडे अगदी निरिच्छपणे दुर्लक्ष केले. अर्थात हा सगळा इतिहास आईकडूनच मला कळला. त्यामुळे सणावारी किंवा हळदीकुंकवाच्या समारंभास जायचे झाल्यास आई मोत्याच्या कुड्या तेवढ्या कानात घालायची.

लग्नानंतर काही दिवसांनी काढलेला आई आणि वडिलांचा एक फोटो घरात होता. तो अगदी टिपिकल जत्रेत काढलेला फोटो होता-- म्हणजे पार्श्वभूमीस एका मोठ्या राजवाड्याचे (बहुधा आमच्या संस्थानाचे असावे) दृश्य, त्यापुढे खुर्चीवर वडील बसलेले, त्यांच्या डावीकडे आई मान खाली घालून उभी राहिलेली, तिच्या

शेजारी एका टेबलावर पुस्तके ठेवलेली, आणि त्या पुस्तकांवर तिने हात ठेवून आपले सरस्वती हे नाव सार्थ केलेले. या फोटोत या कुड्यांव्यतिरिक्त आणखी एक दागिना तिच्या अंगावर दिसत होता, तो म्हणजे टपोऱ्या मोत्यांची नथ. मला समजू लागल्यावर मी एकदा आईलाच विचारले, "अग आई, तुझी ही नथ कुठे गेली? " यावर आईने नेहमीप्रमाणे, "ते मला नाही माहीत. ह्यांनाच जाऊन विचार. " असे उत्तर दिले. अर्थात वडिलांना विचारण्याचे धाडस माझ्याच्याने काही झाले नाही. माझे वडील म्हणजे अगदी जमदग्नीचा अवतार होते आणि त्यांचा हात बराच कडक होता. त्यामुळे बऱ्याच वेळा माझ्या हातून चूक झाली आणि त्यांचा मार खाण्याची पाळी आलीच तर त्यांनी हात उगारलेला माझ्या पाठीला अथवा पार्श्वभागाला लागण्यापूर्वीच मी, "दादा, घाई लागली--- " असा आकांत सुरू करायला लागलो की त्यामुळे त्याना हसू फुटून ते चड्डी ओली करण्यापूर्वी माझी रवानगी घराबाहेर करायचे. या सगळ्या पार्श्वभूमीमुळे आईच्या नथीचे रहस्य त्यांच्या तोंडून ऐकण्यासाठी त्यांना काही विचारणे ही गोष्ट माझ्या कुवतीबाहेरची होती. शिवाय त्या गोष्टीस माझ्या लेखी फारसे महत्त्व त्या काळात तरी नव्हते.

पुढे कधी तरी बोलता बोलता वडिलांच्याच तोंडून कळले की ती नथ बरेच दिवस आई घालत होती, पण एकदा त्यांना पैशाची फारच निकड पडली तेव्हा ती नथ त्यांना गहाण टाकावी लागली आणि त्यावर त्यांनी शंभर रुपये घेतले होते. त्या काळात शंभर रुपयाची किंमत आजच्या भावाने किती असेल याचा विचारच करायला हवा कारण वडिलांच्या लग्नात सोने सोळा रुपये तोळा होते, आणि वडिलांना पगार महिना आठ रुपये होता. आश्चर्य म्हणजे हे शंभर रुपये त्यांनी

ज्यांच्याकडून घेतले होते ते त्यांचे प्रत्यक्ष गुरूच होते. त्यांनी माझ्या वडिलांना हायस्कूलमध्ये शिकवले होते. औन्ध संस्थानातील हे हायस्कूल श्री. श्री. विद्यालय म्हणून प्रसिद्ध होते. प्रसिद्ध म्हणण्याचे कारण म्हणजे याच विद्यालयात साने गुरुजी, ग. दि. माडगूळकर असे नामवंत विद्यार्थी काही काळ शिकत होते. त्याच विद्यालयात आता वडीलही शिक्षक होते. त्यांचे गुरुजी म्हणजे प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक श्री. मधुकर पाठक यांचे वडील. श्री गोपाळराव पाठक.

मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की प्रत्यक्ष आपल्या गुरुवर्यांकडे माझ्या वडिलांनी पैसे कसे काय मागितले. किंवा गुरुवर्यांनीच आपला विद्यार्थी अडचणीत आहे म्हणून त्याला न मागताच पैसे दिले असावेत अशीही शक्यता आहे. पण त्याचबरोबर त्यासाठी नथ गहाण ठेवून घेण्याइतका परकेपणा का दाखवला? किंवा त्या काळच्या लोकांच्या स्वभावाचाच हा भाग होता की काय, की नातेसंबंधातही ते व्यवहाराबाबत दक्ष असत? अगदी माझ्या आत्याच्या यजमानांकडून घेतलेल्या पैशांवर वडिलांनी व्याज दिलेले मी त्यांच्याच तोंडून ऐकले आहे. पाठक मास्तरांनी (त्यावेळी मास्तर हाच शब्द आदरार्थी होता ) वडिलांना एवढे मात्र सांगितले होते की त्यांनी (म्हणजे माझ्या वडिलांनी) केव्हाही १०० रु. घेऊन यावे आणि ती नथ सोडवून न्यावी. मात्र वडिलांची मिळकत इतकी कमी होती की एवढी रक्कम शिल्लक टाकून आपल्या बायकोची नथ सोडवून घ्यायचे त्यांना त्यानंतर अनेक वर्षे गेली तरी जमले नव्हते.

त्यानंतर पाठकमास्तरही सेवानिवृत्त झाले. ते बरीच वर्षे भारताचे हाय कमिशनर आणि आमच्या औंधच्या महाराजांचे चिरंजीव, बॅ. अप्पासाहेब पंत,

यांच्या मुलांचे खाजगी शिक्षक होते, आणि त्यांच्याबरोबर परदेशातही गेले होते. ते नंतर परत आले आणि आपल्या चिरंजीवांबरोबर पुण्यात राहू लागले. आणि त्याच सुमारास म्हणजे १९५८ च्या जून महिन्यात मला फर्गसन महाविद्यालयात प्रवेश मिळाला. मी ११वीची परीक्षा देईपर्यंत आमची परिस्थिती पाहता कॉलेजला प्रवेश घेणे हे आपल्याला शक्य माही असे मी मनोमन ठरवले होते कारण वडिलांचा तुटपुंजा पगार. मोठे कुटुंब आणि मी सर्वात मोठा मुलगा अशी परिस्थिती. म्हणजे मॅट्रिक होताच नोकरी करून घर संभाळणे किंवा निदान स्वत:ला तरी संभाळणे अशीच अपेक्षा माझ्याकडून होती. मोठी बहीण नोकरी करत होती पण तिचाही पगार कोठे लुप्त होत होता कळत नव्हते, त्यामुळे चांगले मार्क पडले तरी आणि आपल्याला कॉलेजला जायला मिळावे अशी इच्छा असली तरी तशी शक्यता कमी वाटत होती.

पण माझी किंवा आमच्या कुटुंबाची भाग्यदेवता अचानक आमच्यावर प्रसन्न झाली, म्हणजे आमच्या त्या दुर्लक्षित गावाचे आणि त्या विद्यालयाचे भाग्यच जणू फळफळले. स्थापना झाल्यापासून त्या विद्यालयात न घडलेला चमत्कार घडला आणि त्या विद्यालयाचा मुलगा एस. एस. सी. च्या (म्हणजे त्यावेळीची ११वी) परीक्षेत पहिल्या तीस नंबरात आला. आणि तो मुलगा दुसरा तिसरा कोणी नसून मीच होतो.

त्यावर्षीपासूनच पहिल्या तीस नंबरच्या मुलांना दरमहा पन्नास रुपयांची शिष्यवृत्ती देण्याची योजना निघाली आणि पुढे प्रोफेशनल कोर्ससाठी दरमहा शंभर रु. अशी. त्यावेळच्या परिस्थितीत ही रक्कम मला कॉलेजात प्रवेश घेऊन

अभ्यासक्रम पुरा करायला पुरेशी होती आणि त्यामुळे मला फर्गसन महाविद्यालयात प्रवेश घेता आला. प्रवेशासाठी जाताना अर्थातच आमच्याकडे पैशाचा ठणठणाटच होता. इकडून तिकडून काही पैसे गोळा करून आम्ही महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी गेलो. सुदैवाने माझे एक दूरचे काका त्यावेळी पुण्यात होते आणि फर्गसनच्या त्यावेळी उपप्राचार्य असणाऱ्या प्रा. डॉ. माइणकरांचा आणि त्यांचा परिचय होता. त्यामुळे आम्ही प्रवेश घेण्यापूर्वी त्यांच्या घरीच गेलो आणि त्यांनी घरीच प्रवेश अर्जाचा नमुना मागवून तो माझ्याकडून भरून घेतला. त्याबरोबर त्यावेळी महाविद्यालयाची आणि वसतिगृहाची अशी एकूण फी १७६ रु. भरायला सांगितले. पण माझ्या वडिलांकडे तेवढेही पैसे त्यावेळी नव्हते. . प्रा. माइणकरांनी, " मग तुमच्याकडे आता किती पैसे आहेत? " असे विचारल्यावर त्यांच्याकडे फक्त २१ रु. निघाले. त्यावर त्यांनी पण "काही हरकत नाही. बाकीचे पैसे नंतर पाठवून द्या. " असे म्हटले एस. एस. सी. ला पहिल्या तिसात आलेला विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात प्रवेश करतो ही गोष्ट कदाचित त्याना भूषणास्पद वाटत असावी असा दिलासा माझ्या वडिलांना मिळाल्यामुळे मी फर्गसोनियन झालो.

अशा प्रकारे प्रवेश आटोपल्यानंतर माझ्या वडिलांनी त्यांच्या गुरुंकडे म्हणजे श्री. मधुकर पाठक यांचे वडील श्री. गोपाळराव पाठक यांच्याकडे मला नेले. १९५५-५६ च्या सुमारास श्री. मधुकर पाठक चित्रपटक्षेत्रात धडपड करत पुण्यात स्थायिक होण्याचा प्रयत्न करत होते. त्यावेळी ते एरंडवण्यात म्हणजे फर्गसन महाविद्यालयापासून चालत जाण्याच्या अंतरावर रहात होते. असेही असेल की त्यावेळी तेवढे अंतर चालत जाणे म्हणजे काही अवघड गोष्ट आहे असे आम्हाला

वाटत नव्हते. कारण रिक्षाने जाणे परवडतही नव्हते. आम्ही कोठलीही पूर्वकल्पना न देता एकदम श्री. पाठक यांच्या घरातच शिरलो तेव्हा मधुकर पाठक चित्रपटाच्या कामासाठी बाहेर गेलेले होते पण घरात त्यांचे वडील, मातू:श्री व बाकी कुटुंबीय होते आणि त्यांनी आमचे अगदी आपुलकीने स्वागत केले.

मी परीक्षेत मिळवलेल्या यशाचे त्यांनाही मोठे कौतुक वाटले आणि त्यांच्या शिष्याचा मी मुलगा याचा अभिमानही त्यांच्या चर्येवर दिसत होता. "गजानन, आता जेवूनच जायचे बरंका" असा प्रेमळ आग्रह वडिलांचे गुरू आणि गुरुपत्नीने केला आणि तो मोडणे आम्हाला शक्य नव्हते. तेवढ्यात श्री. मधुकरही आले. ते त्यावेळी 'मुक्काम पोस्ट ढेबेवाडी'च्या जुळवाजुळवीत होते. वि. गो. नमाडे तो चित्रपट काढत होते. आल्यावर त्यांच्याशीही गप्पा झाल्या. ते माझ्या वडिलांचे विद्यार्थी आणि माझे वडील त्यांच्या वडिलांचे विद्यार्थी असा गुरुशिष्य मिलाप त्यावेळी झाला. जेवणानंतर निघताना सर्वच पाठक कुटुंबीयांनी पुन्हा येण्याचा प्रेमळ आग्रह केला. बाहेर पडताना पाठक मास्तरांनी पुन्हा एकदा माझ्या वडिलांना आठवण करून दिली, "गजानन, तुझ्या बायकोची नथ माझ्याकडे आहे बरंका आणि अजूनही केव्हाही १०० रुपये देऊन ती घेऊन जाणे". माझ्या प्रवेशासाठी उरलेले दीडशे रुपये गोळा कसे करायचे याच चिंतेत वडील असल्याने बायकोची नथ आपल्या गुरुवर्यांकडेच राहिली तरी त्यांना त्याची फारशी दिक्कत नव्हती. नाहीतरी त्या नथीशिवाय आईने सगळा संसार पार पाडला होताच.

त्यानंतर मी बरेचदा पाठकांकडे गेलो. बहुतेक वेळा पाठक गुरुजी त्यांच्या पत्नी, त्यांच्या सूनबाई (श्री. मधुकर यांच्या सौ. ) आणि छोट्या नाती घरात असत.

कधीही गेलो तरी ती प्रेमळ माणसे मला जेवल्याशिवाय जाऊ द्यायची नाहीत. आणि त्याचबरोबर पाठक मास्तर शेवटी भरतवाक्याप्रमाणे म्हणायचे, "तुझ्या आईची नथ आमच्याकडे आहे. केव्हाही शंभर रुपये दे आणि घेऊन जा. तसा मी गजाननला शब्द दिला आहे. "

त्यावेळी मला एस. एस. सी. ला गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली होती आणि पहिल्या सहा महिन्याची शिष्यवृत्ती एकदम तीनशे रुपये हाती पडल्यावर एकदम मला पाठक मास्तरांचे ते शब्द आठवले आणि आईची नथ आता आपल्याला त्यांच्याकडून परत मिळेल कारण त्याना द्यावयाला शंभर रु. आता आपल्याकडे आहेत हा विचार मनात चमकला. तसाच तडक त्यांच्याकडे गेलो त्यांच्या पायावर मस्तक ठेवले आणि माझ्या शिष्यवृत्तीविषयी सांगितले. त्यांना खूप आनंद वाटला आणि मी आलेल्या पैशातून काही भेटवस्तू दिल्याचाही त्यांना अतिशय अभिमान वाटला आणि कौतुकही वाटले आणि "अरे आता तुझ्या आईची नथ तुला घेऊन जायला काहीच अडचण नाही. " असा त्यानीच विषय काढल्यावर मीही त्यांना त्याचसाठी आलो असल्याचे सांगून शंभर रुपये त्यांच्या हातावर ठेवताच माझ्या वडिलांच्या गुरुवर्यांनी ताबडतोब आतल्या खोलीत जाऊन एका गुलाबी कागदात गुंडाळलेली ती इतिहासप्रसिद्ध नथ बाहेर आणली आणि माझ्या हातात ती ठेवत म्हणाले, "माझ्या गजाननच्या मुलाने त्याच्या आईची नथ सोडवली आणि तो ती घेऊन जातोय याचा मला अभिमान आणि आनंद आहे. " मी पुन्हा त्यांच्या पायावर डोके ठेवले आणि आनंदाश्रू आवरत बाहेर पडलो. त्यानंतर माझ्या आईने ती नथ पाहून व नाकात घातल्यावर तिच्या व वडिलांच्या चेहऱ्यावर फुललेला आनंदाचे

वर्णन करणे मला शक्य नाही. माझ्या आयुष्यातील अतिशय मोठ्या आनंदाचा क्षण तो होता हे निश्चित!

या गोष्टीला अनेक वर्षे झाली आणि त्यातील माझ्याव्यतिरिक्त इतर सर्व पात्रे काळाच्या पडद्याआड गेली, मात्र अजूनही पाठक मास्तरांनी आपल्या शिष्याकडून नथ गहाण का ठेवून घेतली, हे कोडे मला उकलले नाही. मी नथ परत घ्यायला गेलो त्यावेळी त्यानी दिलेल्या त्या शंभर रुपयाची किंमत निदान दसपटीने तरी वाढली असताना आपण दिलेला शब्द पाळण्यासाठी शंभरच रुपये घेऊन ती त्यानी परत केली आजच्या नियत बदलण्याच्या जमान्यात ही गोष्ट सांगण्यासारखी आहे असे मला वाटते.

# ८. उत्तर आणि निर्णय

आज समीरच्या शाळेत जायचे आहे ध्यानात आहे ना? " चहाचा कप तोंडाला लावतानाचपरागने विचारलेल्या या प्रश्नाचा प्राचीला इतका राग आला की त्याच्या किंवा त्याच्यासमोर स्वत:च्या, दोन फडाफडा तोंडात मारून घ्याव्यात असे तिला वाटून गेले कारण हा प्रश्न तो कालपासून चौथ्यांदा विचारत होता. पण ते क्षणभरच, कारण हे काम आपल्यालाच करावे लागणार आहे याचे भान तिला होते. बायका कितीही शिकल्या, कितीही महत्त्वाची कामे पार पाडू लागल्या तरी त्यांचीच अशी ठरलेली कामे त्यांना करावी लागतातच त्यापैकी आपल्या पाल्याच्या शाळेतील कर्तृत्वावर लक्ष ठेवणे आणि त्याच्या अगर तिच्या शाळेकडून मिळणाऱ्या अहवालावर योग्य ती कार्यवाही करणे हे एक महत्वाचे काम!

खरेतर मूल जन्माला घालण्याचे अवघड काम स्त्रीने पार पाडलेले असते. त्यासाठी तिने सोसलेल्या यातनांची पुरुषाला कल्पनाही येणे शक्य नसते असे असताना निदान त्यापुढील जबाबदारीतील महत्वाचा राहिला, निदान जमेल तेवढा वाटा पुरुषाने उचलायला काय हरकत आहे असे अनेक वेळा प्राचीला वाटे. पण जन्मानंतर काही काळ तरी आईवरच जास्त विसंबून राहिल्यामुळे त्या मुलाला अगर मुलीला आईवरच आपला हक्क असल्यासारखे वाटते आणि त्यामुळे पुरुषाची या जबाबदारीतून विनासायास सुटका होत असते आणि त्यात पुन्हा न अडकण्याची

दक्षता घेणे एवढेच आपले काम हे बहुतेक पुरुष बरोबर जाणत असतात. आणि पराग तर पाणी प्यायचे असेल तर बायकोने ग्लास आणून द्यावा आणि तो परत तिनेच उचलून न्यावा असे समजणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीचा आदर्श मानणारा पुरुष असल्यामुळे प्राचीच्या या मताची दखल घेणे त्याला मुळीच मान्य नव्हते. अगदी अमेरिकेत आल्यावरही त्याच्या या मनोवृत्तीत काही फरक पडला नव्हता.

/त्याच्या मते तिने नोकरी करायचेच काही कारण नव्हते. तिने घर संभाळावे मी बाहेरचे पाहतो हा त्याचा दृष्टीकोन होता पण तिच्या बायोइंजिनियरिंगच्या अपूर्व यशामुळे त्याच्यापेक्षाही तिलाच अमेरिकेत जास्त मागणी असल्यामुळे खरे तर प्राची त्याच्याबरोबर आली म्हणण्यापेक्षा तोच प्राचीचा पदर पकडून आला म्हटले तरी चालले असते. मात्र एकदा अमेरिकेत येऊन सुस्थापित झाल्यावर त्याच्या जुन्या आग्रहाने पुन्हा उचल घ्यायला सुरवात केली होती आणि त्यामुळे त्याच्या मते जी कामे तिची होती त्याकडे ढुंकूनही पहायचे नाही या त्याचा बाण्यात त्याने अजिबात बदल होऊ दिला नव्हता.

तरीही आज एक प्रयत्न करून पहायला काय हरकत आहे असा विचार करून आवाजात जरा जास्तच गोडवा आणण्याचा प्रयत्न करीत प्राचीने, " या वेळी तरी तुला जाता येणार नाही का पराग? आज अगदी महत्वाचे काम आहे रे "असे म्हणून पाहिले, पण त्यावर तिच्या अपेक्षेप्रमाणेच परागने

"ए उगीच मला अडकवू नकोस बरका नसत्या फंदात "म्हणून तिला धुडकावून लावले.

लग्नापूर्वी परागचा हा स्वभाव माहीत असता तर आपण त्याच्याशी लग्न करण्याचा विचार तरी केला असता का याविषयी प्राचीला शंकाच होती. पण नेहमीच्या पठडीत लग्न झाल्याने तिला फारसा विचार करायला वेळच मिळाला नव्हता. म्हणजे एका लग्नसमारंभात परागच्या आईला प्राची पाहताच आवडली होती आणि आपल्या मुलासाठी त्यानी तिला मागणीच घातली होती. प्राचीच्या आईवडिलांनाही अशी चालून आलेली मागणी तिने नाकारू नये असे वाटणे सहाजिकच होते. अर्थात त्यांनी त्याविषयी निर्णय प्राचीलाच घ्यायला सांगितले. परागला पाहून त्याच्यासारख्या उंच, रुबाबदार आणि देखण्या तरुणाला नकार द्यावा असे कोणत्याच मुलीला वाटायचे काही कारण नव्हते आणि मागणी आल्यामुळे प्राचीलाही थोडेफार बरे वाटलेच होते. त्यामुळे हा जुगार खेळून पहायला काही हरकत नाही असे तिला वाटले मग लग्न व्हायला काय उशीर?

लग्नानंतर थोड्याच दिवसात समीरचा जन्म झाला होता त्यावेळी पराग इंफोटेकमध्ये होता त्यामुळे त्याचे पुण्यात घर असूनही त्याना बंगळुरूला राहावे लागले आणि त्यामुळे प्राचीने काही दिवस तरी नोकरी न करण्याचा निर्णय घेतला. काही दिवसानी परागचे वडील सेवानिवृत्त झाल्यावर त्याचे आई वडील त्यांच्याकडे येऊन राहू लागले आणि मग आपण नोकरी करावी असे प्राचीला वाटू लागले आणि तिच्या उत्तम पदवीमुळे आणि मुलाखतीत दाखवलेल्या हुशारीमुळे ज्या बायोटेक कंपनीत तिची निवड झाली त्या कंपनीने तिला लगेच अमेरिकेतच पाठवण्याची तयारी दाखवली.

परागला ही गोष्ट पचनी पडण्यासारखी नव्हती पण त्याच्या आईने सुनेला "तू समीरची मुळीच काळजी करू नकोस" असे सांगून परागची तर त्याहूनही नको असेच जणू सुचवल्यामुळे त्याचा नाइलाज झाला. अर्थात प्राचीला आता माघार घेण्याचे कारण उरले नाही. पण सुरवातीला तिला एकटीलाच जावे लागणार होते आणि तिच्यासारख्या तल्लख मुलीला ते काही अवघड नव्हते.

प्राचीची बायोजेन प्रयोगशाळा अमेरिकेत न्यूयॉर्कलाच होती. पहिल्या दिवशी रिपोर्ट करायला तिच्या ग्रुपलीडरच्या केबिनमध्ये ती शिरली आणि दरवाजातच थबकली कारण समोर ग्रुपलीडर म्हणून बसलेली व्यक्ती दुसरीतिसरी कोणी नसून तिचा शाळेतील दोस्त प्रदीपच होता. "हाय प्राची, प्राचीच ना तू? " त्यानेही तिला ओळखले होते. प्राचीला एकदम बरे वाटले, कितीही नाही म्हटले तरी एकटीच आल्याचे थोडेफार दडपण तिच्यावर होतेच पण प्रदीपला पाहून ते दूर झाले. "अरे प्रदीप, कमालच आहे किती दिवसांनी भेटतो आहेस "

"खर आहे पण तुझा पत्ता कोठे होता? मग कसा भेटणार तुला? " प्रदीपनेही तिला पाहून आनंद व्यक्त केला. खरे तर प्रदीप आणि प्राची लहानपणी अगदी शेजारी राहत आणि त्यांच्या कुटुंबांचा चांगलाच घरोबा. पण प्राची दहावीत असताना तिच्या वडिलांची बदली हैद्राबादला झाली आणि मग त्यांची गाठ आजच पडत होती.

प्रदीप भेटल्यामुळे प्राचीला काहीच अडचण उरली नाही हे तिने फोनवरून घरी कळवताच परागच्या आईला फारच बरे वाटले कारण आपण आग्रहाने सुनेला एकटी पाठवल्याने तिची काही गैरसोय झाली तर आपल्याला बोल लागायचा अशी टोचणी त्यांना होती ती दूर झाली. पण परागला मात्र ते ऐकून जरा मत्सर वाटला असावा. हे

त्याच्या "आता काय जुना मित्र भेटला मग मजा आहे तुझी, मात्र त्याच्या नादात आम्हाला विसरू नका " या प्रतिसादावरून तिला वाटले त्यामुळे "असे काही बोलणार असशील तर फोन बंदच करेन "अशी धमकी तिने दिल्यावर तो जरा पडत्या सुरात बोलू लागला. प्राची गेल्यावर परागनेही खटपट करून कंपनीतर्फे स्वत:ची पण अमेरिकेत जाणाऱ्या चमूत वर्णी लावली आणि थोड्याच दिवसात ते तिघेही न्यू जर्सीमधील एडिसन येथे राहू लागले. परागला प्रिन्स्टनला कामावर जावे लागे आणि प्राचीला न्यूयॉर्कला. दोघेही ट्रेननेच कामवर जात. पराग आल्यानंतर त्याची आणि प्रदीपचीही चांगलीच दोस्ती झाली पण प्रदीप खरा जास्त दोस्त बनला तो समीरचा. त्या दोघांनाही एकमेकावाचून करमत नसे.

प्राचीच्या प्रयोगशाळेतील प्रयोगाचा एक भाग म्हणून काही मानवी गुणसूत्रे एका आफ्रिकन पोपटाच्या शरीरात अंतर्भूत करून त्याचा त्याच्या वाचाशक्तीवर काय परिणाम होतो हे पाहण्याचा प्रयोग चालू होता. खास पॅरिसचे बायोटेक संशोधक जेरी लोगन यांच्या संशोधनाबरहुकुम हा गुणसूत्र अंतर्भूत करण्याचा प्रयोग केला गेला होता. हा पोपट जराश्या करड्या रंगाचा असतो आणि त्याला उपजतच हुबेहूब माणसाच्या बोलण्याचा किंवा आणखीही बरेच आवाज काढण्याची क्षमता असते. त्यामुळे या गुणसूत्रामुळे त्यात आणखी काय सुधारणा होते हे पाहणे आणि काही लक्षणीय सुधारणा आढळली तर अशा प्रकारचे शास्त्र प्रगत करून त्याचे पेटंट घेणे हा प्राचीच्या बायोटेक कंपनीने प्राचीवर सोपवलेल्या प्रयोगाचा भाग होता. संभाषण हा या प्रयोगाचा महत्वाचा भाग असल्याने त्या पोपटाचे नाव स्वीटॉक असे ठेवण्यात आले होते. पण प्राची त्याला सुभाष म्हणे.

प्राचीवर तो पोपट घरीच ठेवून त्याच्यावर काय परिणाम होतात याचे जास्तीत जास्त काळ निरीक्षण करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्याला विशिष्ट प्रकारचे खाद्यपदार्थ काही विशिष्ट रसायने यांची इंजेक्शने देणे हा तिच्या कामाचा भाग असल्यामुळे त्या पोपटाला घरी आणणे आवश्यक होते त्यापेक्षाही आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे या प्रकारच्या पोपटांना सोबत आवश्यक असते. त्यांना एकांतात ठेवले तर त्यांचे मानसिक संतुलन बिघडण्याची शक्यता असते. प्राची सुभाषला घरी घेऊन आली आणि आता तो घरीच राहणार हे परागला सांगितल्यावर त्याने विशेष काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही फक्त, "त्याचा पिंजरा वगैरे मला साफ करायला लावू नकोस" असा जरा तक्रारवजा सूर मात्रे काढला पण त्यावर प्राचीने, "त्याची काळजी नको करूस त्यासाठी कंपनीकडून एक असिस्टंट मला मिळणार आहे"असे सांगून त्याच्या तक्रारीतील हवाच काढून घेतली.

त्या पोपटाच्या देखभालीसाठी कंपनीच्या प्रयोगशाळेतीलच एक अगदी नवीनच लागलेली प्रयोगशाळा सहाय्यक सॅली तिच्या मदतीला कंपनीने दिली होती. प्राची कंपनीत गेल्यावर ती या पोपटाकडे लक्ष देईल अशी अपेक्षा होती. सॅली मोठी गोड मुलगी होती आणि तिने पोपट आणि समीर या दोघांनाही संभाळण्याचे काम घेऊन प्राचीचा बराच भार हलका केला होता. कधी कधी प्राचीला कंपनीतून यायला उशीर झाला तर परागलाही ती चहा आणि त्यासोबत तिच्या पद्धतीने एकादा खाद्यपदार्थ करून द्यायची.

पण सॅलीऐवजी सुभाषची खरी देखरेख समीरच करणार असे दिसू लागले. एडिसनमध्ये रहायला लागल्यापासून बाकी सगळ्या गोष्टी चांगल्या असल्या तरी

मित्रपरिवाराची फारच उणीव त्याला जाणवायची. भारतात पुण्यात असताना घराबाहेर पडले की अनेक मित्रांचा ताफाच हजर असायचा शिवाय मधून मधून घरी येणारे तर कधी इतर काकाकाकू वा मामामामी रहायलाच आल्यावर त्यांची मुले म्हणजे समीरची चुलत वा मामे भावंडे यामुळे घर कसे सारखे भरलेले असे. इथे मात्र कुणी कोणाकडे जात नाही की येत नाही त्यामुळे त्याला अगदी एकटे पडल्यासारखे झाले होते. त्याला इतकी चांगली सोबत घरबसल्या पहिल्यांदाच मिळत होती, सुभाषला पहिल्यांदा तो जवळ घ्यायला घाबरला कारण बरेच पोपट एकदम टोच मारून बोटाचा किंवा नाकाचा तुकडा काढतात असे बऱ्याच पूर्वानुभवी मित्रांकडून त्याला कळले होते. पण आता सुभाष आल्यामुळे त्याला अगदी जवळचा मित्र आणि सारखा घरात राहणारा मिळाल्यावर काय विचारता! सुभाष त्याच्या खांद्यावरच असायचा तो घरात असताना. त्यामुळे सॅली घरातील इतर कामातच हातभार लावायची. तरी प्राचीने तिला बजावून सांगितले होते की तिला सुभाषसाठीच तेथे रहायचे आहे आणि सुभाष समीरकडे असताना तिने कंपनीची इतरही काही कामे केली तरी चालतील.

पहिले काही दिवस सुभाष फक्त नावाचाच सुभाष राहणार की काय अशी शंका प्राचीला येऊ लागली कारण त्याची मजल घरातील व्यक्तींची नावे घेण्याच्या पुढे काही जाईना. प्रत्येक व्यक्तीचे स्वागत मात्र तो अगदी झोकात करत असे. पण एक दिवस मात्र प्राची घरी आली तेव्हां घरी कोणीच नव्हते आणि तरीही कुलूप उघडून प्राचीने घरात प्रवेश केल्यावर एकदम " ममी, आज इतका का उशीर केलास? " असा समीरचा आवाज तिच्या कानावर पडला आणि ती चमकलीच. तिने इकडे

तिकडे पाहिले तर सुमेध घरात नव्हताच आणि एकदम कसलीशी शंका येऊन तिने सुभाषच्या पिंजऱ्याकडे पाहिले आणि परत तोच प्रश्न तिला ऐकू आला आणि हा सुभाषचाच पराक्रम हे तिच्या ध्यानात आले.

त्यानंतर मात्र सुभाषची प्रगती ज्या वेगाने झाली ती पाहता समीरला बोलायला शिकवायला आपल्याला किती त्रास झाला याची आठवण येऊन प्राचीला सुभाष म्हणजे टेप रेकॉर्डर आहे की काय असेच वाटू लागले. आश्चर्य म्हणजे तो नुसते शब्दच उच्चारत नव्हता तर ते उच्चारणाऱ्या व्यक्तीच्या आवाजात ते उच्चारत होता. याशिवाय मध्ये इतर काही आवाज म्हणजे दाराची बेल, बाहेरून जाणारे वाहन, या गोष्टीची पण हुबेहूब नक्कल तीही अस्सलपेक्षा सरसच तो करत असे. थोडक्यात रेडिओवर श्रुतिका सादर करण्याचे काम एकटा सुभाषच करू शकेल असे तिला वाटू लागले. सुभाषच्या या प्रगतीत परागला काही रस नव्हता मात्र सॅली आल्यामुळे आपल्याला काही जादा काम पडत नाही उलट प्राचीच्या अनुपस्थितीत हक्काने राबवून घ्यायला आणखी एक माणूस मिळाल्यामुळे तो जरा जास्तच सुखावला होता मात्र कधीकधी तो सॅलीत जरा जास्तच रस घेतोय की काय अशी शंका प्राचीला येई. असे असताना गेले काही दिवस पराग सुभाषचा उगीचच राग राग का करू लागला होता याचे प्राचीला जरा नवलच वाटले येऊन जाऊन तो बॅंकिंग क्षेत्रात असल्यामुळे आणि सध्या त्यात बरीच पडझड चालू असल्यामुळे त्याचा एकूण मूडच खराब असल्याचा हा परिणाम असावा अशी तिने समजूत करून घेतली. सॅलीही पराग घरात असताना सुभाषपेक्षा त्याच्याकडेच जास्त लक्ष देतेय की काय अशी शंका प्राचीला येऊ लागली. कधी कधी तर तिच्या रूपात आपण नसती बला घरात आणून

ठेवतोय की काय असेही तिला वाटू लागले होते. पण अमेरिकन असल्यामुळे ती जरा अघळपघळ वागते असेही तिला वाटे.

समीरला या शाळेत जुळवून घ्यायला सुरवातीला जरा जड गेले कारण जरी पुण्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असला तरी इथे सगळाच व्यवहार इंग्रजीत करावा लागल्याने तो थोडासा गोंधळून गेला पण थोड्याच दिवसात तो बरोबर रुळून गेला त्याचे ग्रेडसही आता बरे येऊ लागले होते त्यामुळे मध्येच शाळेतून बोलावणे यावे याचे प्राचीला आश्चर्य वाटले होते. शाळेत प्रवेश करताच मिस केलीने तिचे स्वागत केले " सॉरी मिसेस प्राची तुला त्रास देत आहे पण समीरविषयी एक गोष्ट तुझ्या कानावर घालणे आवश्यक आहे असे मला वाटते. तो बाकी सर्व विषयात योग्य प्रगती करत आहे पण मॅथ्समध्ये मात्र तो जरा मागे पडत आहे. आणखी महत्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या होमवर्कमध्ये तू त्याला मदत करत जाऊ नकोस. लेट हिम डू इट" तिचे हे शेवटचे वाक्य ऐकून प्राचीला आश्चर्य वाटले कारण सुमेध कोणाचीच मदत न घेता आपले होमवर्क आपणच करत होता.

"पण त्याचे होमवर्क तर तोच करतो मिस केली "

प्राचीने जरा जोरातच म्हटले आणि आपला सूर चढल्याचे तिच्या ध्यानात येऊन "सॉरी, बट इटस द फॅक्ट! आम्ही कोणीच त्याला मदत करत नाही"

"मी असे म्हणते याचे कारण त्याचे होमवर्क अगदी परिपूर्ण असते असे असताना तो परीक्षेत का मागे पडतो? असे व्हायला नको असे मला वाटते. यू जस्ट आस्क हिम इफ ही गेटस एनीबडीज हेल्प " केली म्हणाली. त्यावर "ओके थॅंक्यू

आय विल डेफिनेटली इंक्वायर" म्हणत प्राची उठली पण या प्रश्नाचा कसा छडा लावायचा तिला कळेना.

घरी जाताच तिचे स्वागत. "हॅलो स्वीटहार्ट" या परागच्या शब्दानी झाल्यामुळे तिला एकदम जरा बरे वाटले कारण त्याचा मूड बरा आहे आणि आता तो या प्रश्नाचा काहीतरी उलगडा करू शकेल, निदान आपल्या काळजीत सहभागी व्हायला कोणीतरी भागीदार आहे ही कल्पनाही आनंददायक होती त्यामुळे "अरे तू कसा आज माझ्या आधी घरी आलास? " असे म्हणून तिने पाहिले तर तेथे कोणीच नव्हते आणि एकदम सुभाषच्या पिंजऱ्याकडे लक्ष गेल्यावर परत "हॅलो स्वीटहार्ट, हाउ आय मिस यू" हे पुन्हा परागच्याच आवाजातील शब्द ” प्लीज कीप क्वाएट" असा त्याला दटावण्याचा प्रयत्न केला की लगेच त्याने "ये मेरा दीवानापन है " गायला अगदी थेट मुकेशच्या आवाजात सुरवात केली. मुकेश हा परागचा आवडता गायक असल्यामुळे तो बऱ्याच वेळा त्याची गाणी ऐकत बसायचा तेव्हा या पठ्ठ्याने ऐकले असावे. त्याचे गाणे संपायच्या सुमारास एकदम टेलिफोनची रिंग आली म्हणून प्राची तडातापडीने उठली आणि रिसीव्हर कानाला लावल्यावर डायलटोनच वाजत होता हे तिच्या लक्षात आले तरी कुठूनसा आवाज मात्र आला

. "हेलो मॅडम, सॅली स्पीकिंग, हॅज समीर बीन होम? "

प्राचीला काही कळेचना हा काय प्रकार आहे ते, कारण आवाज फोनमधून येत नव्हता फोनपासून कान बाजूला केल्यावर सगळा प्रकार हा सुभाषचाच आगाऊपणा आहे हे तिच्या लक्षात आले. "चूप रे" असे त्याला म्हणत बेल वाजल्यामुळे ती दार उघडायला उठली. दारात समीरच उभा होता.

"या साहेब. तुमच्या टीचर काय म्हणत होत्या माहीत आहे? "

"आय डोंट नो" समीरचा आवाज आणि पाठोपाठ"नो इंग्लिश, समीर स्पीक मराठी" प्राचीचा आवाज आला पण दोन्ही आवाज आले सुभाषच्या पिंजऱ्यातून आणि समीर आणि प्राची दोघेही हसू लागले.

" समीर तू मॅथ्समध्ये वर्गाच्या मागे आहेस असे टीचर म्हणत होती. आणि कायरे तुला गृहपाठ कोण करून देते? ""मला कोण करून देणार? तू तर सांगितलेच आहेस की माझा गृहपाठ मलाच करावा लागेल म्हणून"

"ते काही खर नाही. खर काय ते मला कळायलाच हव. जर तू होमवर्क इतके व्यवस्थित करतोस तर मग परीक्षेत का मार खातोस? "

"ते मला काय माहीत? परीक्षेच्या वेळी मला काही सुचत नाही"

समीरच्या या सांगण्यावर प्राचीचा विश्वास बसणे शक्य नव्हते पण त्याला खोटे ठरवणेही शक्य नव्हते. तेवढ्यात सॅलीही तेथे आली. तिला विचारून बघावे म्हणून प्राचीने तिला प्रश्न केला " हॅव यू एनी आयडिया सॅली? '

"नो " पटकन तिने उत्तर दिले.

"कमालच झाली मी तुला अजून काही विचारले नाही आणि तू उत्तरही देऊन टाकलेस नाही म्हणून"

"मी कुठ काय बोलले प्राची, उलट तुझ्या विचारण्याचीच वाट पाहतेय"

"मग आता नाही अस कोण म्हणालं ---"आणि एकदम सगळा प्रकार प्राचीच्या लक्षात आला कारण आवाज पिंजऱ्याकडून आला होता.

"बर मला सांग समीरला होमवर्क करायला तू मदत करतेस ना? "

"नो यू हॅव स्पेसिफिकली टोल्ड मी नॉट टु डू सो त्यामुळे त्याने विचारले तरी मी दुर्लक्ष करते. "

"मग हा काय प्रकार आहे कारण त्याच्या टीचरच्या मते त्याला कोणी तरी मदत करत असले पाहिजे"

"मे बी पराग हेल्पिंग हिम? "परागविषयी सॅलीने संशय व्यक्त केला. पण त्यात काही तथ्य नव्हते हे दोघींनाही माहीत होते.

समीर सुभाषला खांद्यावर बसवून एव्हाना पसारही झाला होता. तेवढ्यात दाराच्या कुलुपाचा आवाज आला आणि पाठोपाठ परागही आत शिरला आणि "वा आज बरीच लवकर आलीस? " असे प्राचीकडे पाहून किंचित आश्चर्यानेच म्हणाला

. "हो आज समीरच्या शाळेत जायचे होते ना म्हणून जरा लवकर निघाले"

"मग काय म्हणत होती टीचर? "

"अरे समीरचे होमवर्क करायला कोणी मदत करते का? "

"अग पण मी तुला टीचर काय म्हणते ते विचारले आणि हे तू काय विचारतेस? आणि मी तर करत नाही हे तुला माहीतच आहे. ’

" हो म्हणून तर प्रश्न आहे. कारण टीचर म्हणते ज्या अर्थी तो मॅथ्समध्ये इतका वीक आहे त्याअर्थी त्याचे होमवर्क तो करत नसणार कारण तो होमवर्क स्वत: करत असेल तर टेस्टमध्ये त्याला इतके कमी मार्क्स पडणार नाहीत

. "सॅलीला विचारलेस का? "

"आता फक्त सकाळी पोळया लाटायला ज्या बाई येतात त्यानाच विचारायचे राहिलेय"त्राग्याने प्राची उद्गारली.

"डोंट गेट एक्सायटेड डियर, यातून काहीतरी मार्ग काढता येईल" परागने तिला शांत करण्याचा प्रयत्न केला.

" हो पण तो मलाच काढावा लागणार आहे. " असे फणकाऱ्याने म्हणून प्राचीने तिथून काढता पाय घेतला.

समीरचा गृहपाठ कोण करून देते याबरोबरच परागविषयी पण दुसरीच शंका तिला येऊ लागली होती कारण आज कधी नव्हे ती घरी लवकर आली त्याचे त्याला फारसे बरे वाटल्याचे दिसले नाही. अलीकडे सुभाषविषयी तो फारसे बोलत नसे पण काल त्याने एकदम तो नकोसा झाल्यासारखे दाखवले. मुख्यत: आपल्याकडे पाहण्याच्या त्याच्या दृष्टीतच काहीतरी बदल झाला आहे त्यात पूर्वीचे प्रेम जाणवत नाही असे तिला उगीचच वाटू लागले होते. हा कदाचित भासही असेल. कारण या रात्रंदिवस कामाच्या जमान्यात नवराबायकोस एकमेकांची विचारपूस करण्याइतकी फुरसत कुठे होती? ती स्वत: घरात असली तरी सुभाषच्या दिमतीतच असायची आणि पराग आला की लॅप्टॉप घेऊन बसलेला असायचा अगदी जेवण्या झोपण्यालाही कसाबसा वेळ काढावा लागे त्यामुळे कित्येक दिवसात कधी एकमेकाच्या कुशीत विसावून काही विचारपूस केली असे कधी झाल्याचे तिला आठवतही नव्हते मग त्यामुळे पराग कुठे दुसरीकडे तर गुंतला नसेल ना? कारण आजकाल त्याने कधी तरी बळजबरी करून का होईना त्याने तिला आपल्या कुशीत

ओढल्याचेही तिला आठवत नव्हते. पैशाच्या मागे लागून मुलगा आणि नवरा दोघानाही आपण दुरावत तर नाही ना, या विचाराने प्राचीला अगदी अस्वस्थ केले.

आपली अस्वस्थता लपवण्याचा कितीही प्रयत्न प्राचीने केला तरी प्रदीपकडे कामाच्या निमित्ताने गेल्यावर प्रदीपने तिला विचारलेच.

"अलीकडे तुझे कामात लक्ष नसते प्राची. काय प्रॉब्लेम काय आहे? "

"कुठे काय काही नाही, आय ऍम ओके, तुला उगीचच वाटतेय पॅड, सॉरी प्रदीप " प्राचीने प्रदीपला बऱ्याच दिवसानंतर लहानपणी ज्या प्रकारे ती त्याला बोलवावयाची तसे संबोधले आणि मग तिने स्वत:ला दुरुस्त केले.

"नो नो आय लाइक इट प्राची बऱ्याच दिवसाने तू पॅड म्हटल्यावर सगळ्या जुन्या आठवणी आल्या"

"ओ, प्रदीप, प्लीज फर्गेट इट"

"प्राची, तू विसरली असशील पण मी नाही विसरलो. बर ते जाऊदे, माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाहीस. "

"नथिंग इन पार्टिक्युलर. नेहमीचेच प्रॉब्लेम्स. सध्या समीरच्या टीचरने मला कोड्यात टाकले आहे, तिच्या मते तो मॅथ्समध्ये कमी पडतो. "

"मग त्यावर उपाय काढता येईल, त्यात काय एवढे"

"ते ठीक आहे, पण त्याचे होमवर्क मात्र अगदी अचूक असते त्यामुळे मी त्याला मदत करते असे तिला वाटले आणि मी तसे करू नये असा तिने मला उपदेश केला"

"कमॉन एवढ्यासाठी मूड घालवण्याचे काय कारण? "

"प्रश्न तेवढाच नाही प्रदीप, पराग या बाबतीत काहीच लक्ष घालत नाही आणि समीरला कोण मदत करते याचा मला उलगडा होत नाही"

"मग तुला माझा संशय येत नाही ना? "

"एक वेळ तसे वाटले खरे पण ते तू मला सांगितल्याशिवाय राहिला नसतास. जाऊ दे तुझ्या डोक्याला उगीच माझ्या कटकटी कशाला? "

"प्राची, खरे सांगू का त्यात मला तर कटकट मुळीच वाटत नाही. मला वाटते आज आपण या गोष्टीचा सोक्षमोक्षच लावू या"

"म्हणजे? "

"म्हणजे काय ते तुलाही चांगले माहीत आहे, प्राचू. मला माहीत आहे परागच्या संसारात तू अगदी नाइलाज म्हणूनच राहत आहेस. "

"पण---"

"मध्ये बोलू नकोस, प्राचू माझ्या मनात काय आहे हे तुला चांगले माहीत आहे. तुझ्या वडिलांची बदली झाली नसती तर तू माझीच झाली असतीस पण दुर्दैवाने ते घडले नाही, मी आपली गाठ पडण्याची वाट पाहत राहिलो आणि तेवढ्यात नियतीने दावा साधला, आता तू तुझ्या संसारात सुखी असतीस तर मी मुकाट्याने एकट्याने पुढची वाटचाल केली असती. पण आताही मला वाटते अजून आपण एकत्र येऊ शकतो"

"नो प्रदीप नसत्याच भरीस मला पाडू नको"

"असे का म्हणतेस? पराग तुझ्याशी कसा वागतो हे मला दिसत नाही का? "

"स्टिल आय फील आय कॅनॉट चेंज ट्रॅक, आता फार उशीर झालाय"

"ओके, सध्या राहू दे पण यावर विचार तरी करशील? " यावर काहीच उत्तर न देता प्राची उठली.

तिच्या डोक्यात अनेक प्रश्नांचा गुंता झाला होता. त्यात प्रदीपच्या या अचानक हल्ल्याने ती आणखीच गोंधळून गेली. घरी येताना समीरच्या होमवर्कच्या प्रश्नाचा छडा लावायचा या निश्चयानेच तिने घरात प्रवेश केला. सर्व विचार केल्यावर समीरच्या मित्रापैकी कोणी तरी त्याला मदत करत असावा असा एक अंदाज तिने केला आणि त्या दृष्टीने विचार करता त्याचा अगदी जवळचा मित्र रिचर्ड होता त्याला विचारावे की काय असा विचार करून तिने त्याच्या घरी फोन करायचा विचार केला. आश्चर्य म्हणजे फोन लगेच लागला आणि तो रिचर्डनेच घेतला. "हाय रिचर्ड, काय चाललेय? "तिने विचारले, "नथिंग, आय ऍम ओके, ऑंटी तू कशासाठी फोन केलास? डु यू वॉट टु टॉक टु मॉम? ""नो नो तुझ्याशीच बोलायचे आहे, रिचर्ड तुला मला विचारायचे आहे की समीर होमवर्क करताना तुझी मदत घेतो का? ""नो, व्हाय आर यू आस्किंग ऑंटी? येस नाउ आय रिमेंबर, ही सेज ही हॅज अ गुड फ्रेंड हू हेल्प्स हिम" आणि प्राचीच्या डोक्यात एकदम प्रकाश पडल्यासारखे झाले. "थॅंक्स रिचर्ड, "म्हणून तिने फोन बंद केला. आणि सुभाषच्या पिंजऱ्याकडे तिने मोर्चा वळवला.

हातात समीरच्या होमवर्कचा कागद नाचवत तिने सुभाषला प्रश्न केला, "सुभाष हे काय आहे माहीत आहे? "

आणि आश्चर्य म्हणजे तिला प्रतिसाद अगदी अपेक्षितच आला,

"हे तर पूर्वीच केले आहे. "

"मग सांग बर याच उत्तर"

"हो पण ते तू मला विचारायला हवेस" सुभाष उत्तरला.

"ओ के. सतरा वजा आठ किती? "

सुभाष गप्प. त्याला वेगळया प्रकारे विचारायला हवे असे तिला वाटले आणि तिने पुन्हा विचारले,

"ओके, सतरातून आठ काढून टाकले किती उरले? "

"नऊ फारच सोपे आहे" सुभाषचे उत्तर ऐकून प्राची एकदम गारच झाली.

बर आता सांग एकोणतीसमधून बारा काढून टाकले किती उरले? "

"सतरा, हो पण आता मला अंघोळ घालायला पाहिजेस सॅली मला यावेळी घालते"

"ओके, आता एकच प्रश्न --"

नो, नो"आणि एकदम दाराच्या बेलचा टर्र्र्र असा आवाज ऐकू आला आणि तो सुभाषनेच काढला होता हे पिंजऱ्याजवळ असल्यामुळे प्राचीला कळले.

त्याच्या पाठोपाठ पावलांचा आवाज आणि दार उघडल्याचा. मागून जो आवाज प्राचीच्या कानावर आला त्याने तिला एकदम ४४० व्होल्टचा शॉक बसावे तसे झाले.

"हाय डार्लिंग, कमॉन आय ऍम अलोन "

तो आवाज होता परागचा.

"नो पराग, नो प्लीज. आय ऍम रियली स्केअर्ड" हा आवाज एका स्त्रीचा होता पण कोणाचा हे प्राची ओळखू शकली नाही.

पाठोपाठ परागचा आवाज

"ओ शिट. व्हाय आर यू सो मच स्केअर्ड? माय वाइफ इज नॉट कमिंग टिल टेनथर्टी टुडे. समीर आल्सो हॅज गॉन टु हिज फ्रेंड. टिल देन देअर विल बी नोबडी एक्सेप्ट यू अंड मी. सो लेट अस एंजॉय.

"नो सर, प्लीज. "

आता मात्र हा आवाज कोणाचा याविषयी शंका उरली नाही.

"कमालच आहे तुझी " असा परागचा आवाज आणि पाठोपाठ कारपेटवरून एकाद्या व्यक्तीला ओढावे तसा पाय ओढल्याचा आवाज आणि त्यामागोमाग "चुक्" असा आवाज ऐकून आपल्याला चक्कर येणार असे प्राचीला वाटू लागले. समीरच्या रहस्याचा भेद करता करता परागचीच भानगड समजेल असे स्वप्नातही तिला वाटले नव्हते.

"देवा देवा. कसल्या संकटात टाकलेस मला. " कपाळावर हात मारत ती उद्गारली.

परागच्या सगळ्या वर्तनाचा उलगडा आता होत होता पण प्रकरण भलत्याच थराला गेलेल दिसतेय. पराग येताच त्याला विचारायला हवे.

पण पराग काही त्यादिवशी घरी आलाच नाही. त्याला ऑफिसातच कामासाठी बसावे लागणार होते. सुदैवाने तेवढ्यात सॅली आणि समीर आले आणि प्राची इतर गोष्टीत आपले मन गुंतवू शकली. पण आता सॅलीकडे पाहावेसुद्धा तिला वाटेना. अर्थात तिच्यापेक्षा यात परागच जास्त दोषी होता याबद्दल तिला खात्री होती तरीही!

.

दुसऱ्या दिवशी तिची जाण्याची वेळ झाली तरी परागचा पत्ता नव्हता त्याचा फोनच आला "प्राची सॉरी, आज एकदम संध्याकाळीच घरी येईन तुला माहीत आहेच लीमन ब्रदर्सची हालत. आता आमच्या कंपनीने टेकओव्हर करायचा विचार केलाय त्यामुळे आम्हा सगळयांनाच बसावे लागतेय. "

"ओके, मात्र संध्याकाळी लवकर ये तुझ्याशी महत्वाचे बोलायचेय" आणि असे सांगून आपण मोठी चूक केली हे त्यादिवशी संध्याकाळी प्राची घरी आली तेव्हां तिच्या लक्षात आले कारण ती घरी आली तेव्हां पराग घरी होता आणि सुभाषचा पिंजरा रिकामा होता.

"हे काय सुभाष कोठे आहे? "

"मला काय माहीत मी तर आत्ताच आलो आणि सुभाषचा पिंजरा रिकामा आहे हे तू सांगितल्यावरच मला कळतेय. तुला माहीतच आहे मला तो किती आवडतो ते " पराग शांतपणे उत्तरला.

"पराग मला सगळे कळले आहे आणि त्याचा राग तू त्या गरीब पाखरावर काढलास हे बरे नाही केलेस"

"मग माझा राग काय मी प्रदीपवर काढू? " परागने एकदम पवित्रा बदलला.

"त्याचा इथे काय संबंध? "गोंधळून जात प्राचीने विचारले.

"मांजर डोळे मिटून दूध पीत असले तरी जग काही झोपलेले नसते प्राची, सगळया बायोजेनमध्ये तुझ्या आणि प्रदीपच्या संबंधांचा डंका पिटला जातोय आणि तुला माहीत नाही म्हणतेस कमाल आहे. "

परागच्या सुरात निर्ढावलेपणा जाणवत होता.

"अच्छा अच्छा, म्हणजे त्यामुळे तू सॅलीशी संबंध जोडलेस वाटतं, व्हेरी गुड पराग, मी तुला ओळखण्यास फार उशीर केला. सुभाषला तू नाहीसे केलेस तरी सर्व गोष्टी मला समजल्या आहेत. त्यासाठी पुराव्याची आवश्यकता नाही. तेव्हा शहाणा असशील तर त्याला माझ्या ताब्यात दे. आपल्या घरात त्याची लुडबूड नको असे तुला वाटत असेल तर मी कंपनीला तसे सांगते म्हणजे यापुढे तुझा त्याच्याशी संबंध येणार नाही. आणि सॅलीशीही संबंध तुला ठेवायचे असतील तर माझी काही हरकत नाही. त्यासाठी महत्वाच्या संशोधनावर बोळा फिरवू नकोस" इतका शांतपणा आपण कसा राखू शकलो तिचे तिलाच समजत नव्हते. पण एक गोष्ट मात्र निश्चित! समीरचे होमवर्क आणि प्रदीपचा प्रश्न या दोन्हींचे उत्तर तिला मिळाले होते. आता परागचे तिच्या जीवनात स्थान उरले नव्हते आणि ते स्थान कोणाला द्यायचे याविषयी तिचा निर्णय झाला होता.

(कल्पना परकीय)

# ९. सुंदर मी होणार! !

डॉ. टेकवानीच्या "मर्लिन कॉस्मेटिक क्लिनिक "मध्ये नीताबरोबर आपला नंबर येण्याची वाट पहाणाऱ्या मेधाच्या डोक्यात चिंतेचे काहूर माजलेले होते. अजूनही येथे थांबावे की नको याविषयी तिच्या मनाचा गोंधळ चालूच होता. एक मन म्हणे "विक्रमच्या मनात तुझ्याविषयी पुन्हा प्रेम निर्माण होईल असे करून आताच तुझा संसार सावरण्याची संधी आहे" पण दुसरीकडे आपण त्याला न कळत ही गोष्ट करतोय हे योग्य आहे का. विक्रमला खरच काय पाहिजे. आपण खरच त्याला आवडेनासे झालो आहोत का, की हा आपला नुसता संशयच आहे आणि त्यासाठी हा अघोरी मार्ग आपण स्वीकारत आहोत की काय याविषयी तिच्या मनात शंका निर्माण होत होती.

शेजारील फ्लॅटमध्ये रहाणाऱ्या अगदी जवळच्या वाटणाऱ्या मैत्रिणीच्या म्हणजे नीताच्याच सल्ल्यावरून क्लिनिकची पायरी चढण्याचे धाडस मेधाने केले आणि तशीही नीता तिच्या लांबच्या नात्यातीलही होती. लग्न ठरल्यानंतर तिच्या घरी केळवणासाठी मेधा आणि विक्रमला बोलावले होते तेव्हा नीताने तिचे अभिनंदन तर केलेच होते पण "चांगलाच नवरा पटकावलास बरंका मेधे तू "असा अभिप्रायही दिला होता. योगायोगाने आता त्या पुन्हा शेजारणीच झाल्या होत्या. त्यामुळे मेधाला ती फारच जवळची वाटे.

नीता अगदी जवळची वाटत असली तरी तिची एक गोष्ट मेधाला पसंत नव्हती ती म्हणजे ती अगदी बिनधास्त होती. नीताच्या मते मात्र खरे तर तीच काळाच्या बरोबर होती आणि मेधा मात्र काकूबाई म्हणता येईल अश्या प्रकारात मोडत होती. त्यामुळे संजय आणि नीता तसेच एकत्र रहात होती. लग्न वगैरे लळालोंबा आम्हाला नको आहे असे दोघांचेही मत. जमेल तोपर्यंत एकत्र नाहीतर एकमेकापासून फुटायला केव्हांही मोकळे. संजय म्हणे, नीता आणखी कोणाला भेटते त्याची मी दखल घेत नाही आणि मी कोणाबरोबर हिंडतो यावर नीताची काही हरकत असणार नाही असा आमचा सगळा उघड उघड मामला. नीताही त्याच्याशी पूर्ण सहमत.

अश्या स्वभावामुळे नीताकडे जेव्हां मेधा आणि विक्रम लग्न ठरल्यानंतर केळवणासाठी म्हणून गेले होते तेव्हां नीतान म्हटलेल्या गाण्यावर खूष होऊन विक्रम थट्टेने जेव्हां तिला म्हणाला, "नीता मला वाटते आपली जरा उशीराच गाठ पडली, मेधाशी लग्न ठरलं नसतं तर तुझ्या या गाण्यावर खूष होऊन मी तुझ्याशीच लग्न केलं असतं. " " मग अजुन काय हरकत आहे, काय गं मेधा, तुला काय, विक्रमपेक्षा चांगला नवरा मिळेल की"असं नीतानं म्हटलं होतं ते मात्र मेधाला काही आवडलं नव्हतं" त्यामुळे नीताला तिनं " ए उगीच फाजिलपणा नको हं. तू लाख करशील त्याच्याशी लग्न मी काही त्याच्यावरचा हक्क सोडणार नाही बरंका. " असं फटकावलं होतं

आतामात्र लग्नापूर्वी क्षणभरही आपल्याला दूर होऊ न देणाऱ्या विक्रमचे आपल्यावरील प्रेम कमी होऊ लागले आहे की काय असा संशय तिला येऊ लागला

होता. या महिन्यात तर त्याचे वागणे फारच विचित्र होऊ लागले आहे असे तिला वाटू लागले होते.

दहा पंधरा दिवसापूर्वीचाच तो प्रसंग. त्याला कुठलीशी फाइल सापडत नव्हती तर त्याने उच्च स्वरात हाक मारली होती "मेधा, माझी ती काल ऑफिसमधून आणलेली फाइल कुठं गेली? " त्याच्या सुरातून असा भास होत होता की जणु फाइल मेधानेच गहाळ केली. नाहीतर पूर्वीचाच विक्रम असता तर "सॉरी मेधा, तुला त्रास देतोय पण अगं, माझी कालच आणलेली फाइलच सापडत नाही, प्लीज शोधून देशील का. मला माहीत आहे तू नक्की शोधणार" असं म्हणणार आणि विक्रमचा हा वेंधळा स्वभाव माहीत असल्याने मेधाही त्यावर"तर काय त्यासाठीच राजेसाहेबांनी या दासीशी लग्न केलेय ना " म्हणणार तर विक्रमही "ए उगीच काय, दासी दासी लावलय, खर तर तू राणी आणि दास हो मी तुझा" अशी गाण्याची लकेरच घेणार. "बर बर घ्या दासोपंत ही तुमची फाइल" मेधाला लगेचच ती फाइल सापडल्यावर ती त्याच्या हातात देत म्हणणार आणि त्याच हाताने तिला जवळ ओढून विक्रम तिचा हलकासा मुका घेणार.

पण हे सगळे चित्रच जणु पालटले होते. कारण ती ताबडतोब लगबगीने येऊन त्याची फाइल शोधू लागली आणि नेहमीप्रमाणेच तिला ती लगेच सापडली म्हणून त्याच्या हातात देत "ही काय इथेच तर आहे" असे तिने म्हटल्यावर तिला साधे "थॅन्क्स" तर म्हणायचे राहिलेच उलट, ""बर बर, आण इकडे, उगीच मला खिजवू नकोस " असे उद्गार त्याने काढले. तरी त्याला चुचकारण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली, ' विकी, तुझे बी. पी. एकदा तपासून घेतले पाहिजे. तुझी चिडचिड हल्ली

फारच वाढत चालली आहे"त्यामुळे शांत न होता उलट आणखीनच उसळून तो म्हणाला, "बर बर, आहे माहीत, मोठी मानसोपचार तज्ज्ञ आहेस ते " मेधाने मानसशास्त्र घेऊन एम. ए. केले होते त्यावर हा टोमणा होता. "इतकं जर असेल " तो पुढं म्हणाला, "तर माझ्या मानसिक अवस्थेची थोडीफार कल्पना यायला हवी होती तुला"म्हणून तो फणकाऱ्याने निघून गेला.

लग्न होऊन पाचच वर्षे झाली आणि तिच्यावाचून क्षणभर चैन पडत नाही असे म्हणणाऱ्या विक्रमला असे हे काय झाले हेच मेधाला कळेनासे झाले. लग्नानंतर दोन वर्षे मूल होऊ द्यायचे नाही, मेधाने नोकरी करायची नाही आणि दोन वर्षे नुसते एंजॉय करायचे हा निर्णय विक्रमचाच आणि त्याच्या प्रेमात पार बुडून गेलेल्या मेधालाही त्यात फारसे काही जगावेगळे आहे असे वाटले नाही. विक्रमला गलेलठ्ठ पगार होता आणि घरची वडिलार्जित मिळकत तो एकुलता एक असल्यामुळे त्यालाच मिळणार होती. त्यामुळे " राणी आता तू नुसता आराम करायचास उगीच नोकरीचा फास नाही लावून घ्यायचा "असे त्याने म्हणताच लग्नापूर्वी चांगली असलेली नोकरीही तिने सोडली.

पहिले दोन वर्षे योजनापूर्वक मूल होऊ न दिल्यावर नंतर तिला दोनदा दिवस गेले आणि दुर्दैवाने दोन्ही वेळ तिचा गर्भपात झाला. त्याचा परिणाम तिच्याच मनावर अधिक झाला होता. विक्रमनेच "अगं होईल पुन्हा, काळजी करायचं कारण नाही " अशी तिची समजूत घातली होती आणि त्यांनी डॉक्टरांचा सल्लाही घेतला होता. डॉक्टरांनीही योग्य काळजी घेतल्यास पुन्हा अपत्यप्राप्ती होईल असा दिलासा दिला होता. त्यामुळे त्या कारणामुळे विक्रम चिडचिड करत असेल असेही नव्हते. मग असे

काय झाले आहे की विक्रम आपल्याशी असे वागतो मेधाला प्रश्न पडत होता. कदाचित कामाचा ताण वाढला असेल आणि हा त्याचा तात्पुरता परिणाम असेल अशी मनाची समजूत तिने करून घेतली.

विक्रम गेल्यावर थोड्याच वेळानंतर सहज म्हणून तिच्याकडे बसायला आलेल्या नीताने एकदम तिला, "सॉरी मेधा, विचारू की नको असे वाटते, उगीच तुमच्या खाजगी बाबीत नाक खुपसते असे तुला वाटेल, पण आज तुमच्या दोघांचा काही वाद तर झाला नाही? "असे विचारल्यावर

" छे छे असे तुला का वाटते? " असं सावरून घेण्याचा प्रयत्न करत मेधा म्हणाली. शक्यतो हा विषय नीता अगदी जवळची असली तरी तिच्यापर्यंत जाऊ नये असे तिला वाटत होते, लग्न केले नसल्यामुळे लग्न केलेल्या जोडप्यांच्या भानगडीत नीताला मात्र नको तेवढा इंटरेस्ट होता.

"तुला सांगायचे नसेल तर राहू दे , पण संजय आणि विक्रम दोघे एकाच गाडीने ऑफिसला जातात ना, त्यामुळे त्या दोघांचे काही बोलणे झाले तर मला सांगितल्याशिवाय संजयला रहावत नाही "

"तुला राग येईल मेधा, पण तुझ्या नवऱ्याचे बाहेर तर काही प्रकरण चालू नाही ना? " नीताने उगीचच पुडी सोडली.

"छे ते शक्यच नाही मला विक्रमविषयी पूर्ण खात्री आहे. तिची शंका झटकून टाकत मेधा उद्गारली.

" तू काही सांगू नकोस मेधा, या पुरुषांविषयी. त्यांच्या ऑफिसमध्ये भेटली असेल कुणीतरी नटमोगरी की पाघळली त्यांची स्वारी. म्हणून आपणच काळजी घ्यायला हवी. विशेषत: आपली फिगर, त्वचेच सौंदर्य टिकवून ठेवायला हव. अगं पुरुषाची वृत्ती असते भ्रमरासारखी, जरा चांगला रंग दिसला, वास आला की चालला दुसऱ्या फुलातला मध चाखायला!

नीताचे उद्गार मेधाने त्यावेळी मनावर घेतले नाहीत, तरी त्याचा थोडा तरी परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. विक्रमचे अलीकडील वागणे तपासून पाहिल्यास त्यात तथ्य असावे असे तिला वाटू लागले. लग्नानंतर विक्रम अगदी नाइलाज म्हणूनच ऑफिसमध्ये जायचा व वेळेपूर्वीच घरी यायचा. आल्यावर अगोदर तिला मिठीत घेऊन दिवसभराच्या विरहाची पुरेपूर वसुली करून घेतल्याशिवाय तो तिला सोडतच नसे. आता लग्नानंतर पाच वर्षांनीही त्याचा तोच आवेग रहाणे शक्य नाही हे तिलाही समजत होते. आता तिला तरी पूर्वीसारखे त्याने आपल्याला मिठीत घ्यावे व कुसकरून टाकावे असे कोठे वाटत होते तरी नजरेतूनही जे प्रेम व्यक्त व्हायला हवे, आपुलकी दिसायला हवी तशी त्याच्या नजरेत नसते असा तिचा तर्क होता उलट त्या प्रेमाची जागा तिरस्कारानेच घेतली आहे की काय असे तिला जे भासत होते, नीताच्या उद्गारातून त्यावर जणु शिक्कामोर्तब झाले.

नीता निघून गेली आणि स्नानासाठी मेधा बाथरूममध्ये शिरली व गरम पाण्याचे तुषार अंगावर घेतल्यावर एकदम तिला उत्साहित झाल्यासारखे वाटले. सुगंधी साबण व शांपू च्या मर्दनाने तिच्या वृत्ती उल्हसित झाल्या व ती गाणे पण गुणगुणू लागली आणि अचानक ती भानावर आली कारण आपण गाणे गुणगुणत

आहोत ते गाणे "कशि तुज समजाउ सांग " आपल्या मनोवृत्तीचेच द्योतक आहे असे तिला वाटले. विक्रमला कसे बर मनवावे याचाच विचार ती करू लागली.

स्नानानंतर अंग कोरडे केल्यावर स्नानगृहातील आरशामध्ये सहज तिने दृष्टिक्षेप टाकला. इतर वेळी जी गोष्ट तिला जाणवली नसती ती आज अचानक जाणवली आणि ती एकदम चमकलीच. , कारण लग्नापूर्वी चवळीच्या शेंगेसारखी शिडशिडीत होती ती. तिच्या याच अंगयष्टीवर विक्रम फिदा झाला होता. पूर्वीच्या कमनीय बांध्यातील वलये कोठल्या कोठे लुप्त झाली होती. आणि आज त्याच जागी अनावश्यक ठिकाणी चरबीचे थर जमा झालेली आकृती पाहून आरश्यातील व्यक्ती आपणच आहोत यावरच तिचा विश्वास बसेना. विक्रमच्या बाहुपाशात आता ती सामावूही शकत नसावी आणि त्यामुळेच तिला जवळ घेण्याची इच्छाही त्याला होत नसावी.

नीताच्या बडबडीतील एक विचार किड्यासारखा तिच्या डोक्यात वळवळू लागला या पाच वर्षात दोनदा झालेल्या गर्भपातांमुळे ती स्वत:ला फारच जपू लागली व त्यात विक्रमचा लाडाने भरपूर खाण्याचा आग्रह. त्याच्या मते तब्येत चांगली राहिली तरच तिला पुन्हा मूल व्हायला अडचण होणार नाही पण ती इतकी चांगली झालेली पाहून ती आनंदित होण्या ऐवजी तिला त्याची लाजच वाटु लागली. आरश्यातले आपलेच प्रतिबिंब तिलाच पाहवेना. झटकन बाहेर येऊन अंगावर कपडे चढवत त्या दृश्याचा परिणाम पुसून टाकण्याचा तिन प्रयत्न केला.

आपला लग्नापूर्वीचा आणि लग्नानंतरचा दिनक्रम याची तुलनाही नकळत तिच्या मनात सुरू झाली. लग्नापूर्वी घरातली किती कामे तिलाच करावी लागायची.

कॉलेजात जाणे येणे आणखी अनेक उपक्रमात भाग घेणे या सर्व गोष्टीत ती अगदी बुडून गेलेली असायची. लग्नानंतर संगीताचे कार्यक्रम, नाटके पहाणे इ. गोष्टी जरी चालूच राहिल्या तरी घरातील कामे जवळ जवळ करतच नाही अशी परिस्थिती कारण बऱ्याच गोष्टीसाठी नोकर असल्याने काम करण्याची आवश्यकताच राहिली नाही. लग्नानंतरची काही वर्षे विक्रमभोवती रुंजी घालण्यात निघून गेली, त्यामुळे तिचे बाहेरील जग अगदी मर्यादित होऊन गेले. मैत्रिणींचीही लग्ने होऊन त्या दूर निघून गेल्या. त्यामुळे खाणे, झोपणे, टी. व्ही. पहाणे, शॉपिंग अश्या सुखासीन आयुष्याची संवय लागण्याचाच हा परिणाम हे नीताने तिच्या निदर्शनास आणल्यावर तिला जाणवले.

. पण संध्याकाळी विक्रम कसा काय पण लवकर घरी आला आणि त्याचा मूडही चांगला होता. बऱ्याच दिवसांनी घरी येताच तिला जवळ घेऊन त्याने तिचे दीर्घ चुंबन घेतले. तेव्हां तिला खूपच सुखावल्यासारखे वाटले. आणि बऱ्याच दिवसानंतर विक्रमने इतके प्रेमाने जवळ घेतल्याच्या आनंदाने तिच्या डोळ्यात पाणीच तरळले. त्याबरोबर चमकून जाऊन त्याने तिला मिठीतून दूर करत आणि हनुवटीवर कुरवाळत म्हटले, "ए वेडे असं काय झाल डोळ्यातून पाणी काढायला? ' त्याबरोबर ती त्याला आणखीनच बिलगली आणि "काही नाही असं तू जवळ घेतलेस ना किती बरे वाटले. "असं त्याच्या कानात कुजबुजली. त्याचबरोबर तिला वाटलं विक्रमलाही काहीतरी अडचणी असणार नाहीतर तो असा वागणार नाही. आणि काही गैरसमज असतील तर दूर होण्याच्या इच्छेने ती पुढे म्हणाली, "विक्रम

खरच काही प्रॉब्लेम आहे का तुला सतावणारा? मला सांग मीही काही मदत शक्य असेल तर करीन"

पण यावर विक्रम गप्पच राहिला. जणु काय सांगावे याचाच विचार करत होता. नंतर एकदम म्हणाला,

" हल्ली ती भवानी तुझ्याकडे फारच यायला लागलीय? " अचानक त्याने विषय बदलल्यामुळे मेधा गोंधळून गेली आणि म्हणाली,

"भवानी कोण भवानी? " "अग एवढेही कसे कळत नाही ती भवानी म्हणजे तुझी शेजारीण"

"मग भवानी काय म्हणतोस. बिचारी, मला करमत नाही तर माझ्याशी गप्पा मारत मला किती चांगली कंपनी देते"

" उगीच तिच्या जाळयात सापडू नको बरका, गोड गोड बोलत केव्हां तुला चाट मारेल कळणार नाही. "

"काय म्हणतोस तू? "आश्चर्याने मेधाने विचारले, "आणि मला सांग, तिच्याविषयी इतके सांगायला तुझी आणि तिची केव्हांपासून इतकी दोस्ती झाली? अगदी दररोज तुझी आणि तिची गाठ पडत असल्यासारखा बोलतो आहेस. "

"तू म्हणजे अगदीच भोळी गं भोळी मेधा, लग्नापूर्वीच आपल्या केळवणाच्या दिवशी तिनं माझी कशी फिरकी घेतली हे आठवतेना तुला? तुझ्याजागी मी असतो तर पुन्हा नसतो बुवा गेलो तिच्याशी बोलायला. "

"असं का, नीता तुझी मग अगोदर गाठ पडली असती तर बरं झालं असतं असं तिला कोण म्हणालं? मला तर वाटत अजून तुझाच तिच्यावर डोळा आहे. "मेधानं त्यालाच उलट सुनावलं आणि त्याला गप्प बसावं लागलं

" अग आम्ही मॅनेजमेंटची माणसं, माणसाची पारख झटकन करतो, तुला नाही का पहाताक्षणी ओळखलं आणि लगेच लग्नाची मागणी घातली? "

विक्रम आज चांगलाच मूडमध्ये दिसत होता.

"ते जाऊ दे, माझ्याशी ती अगदी सरळ वागते आणि मला योग्य सल्लाही देते."

" आणि तिचा सल्ला तुला अगदी योग्य वाटतो का? कमाल आहे तुझी. "

"बरं जाऊ दे, मला एक सांग चहा घेणार का? की काही खायला करू? "

"अरेच्चा आज फारच खुषीत दिसतेय स्वारी, "

"विकी, अरे तू असाच वागलास तर मी खूषच असणार, गेले दोन तीन दिवस अगदीच चिड चिड करत होतास ना, बर मग सांग, चहा करूकी नको? "

" खरतर आता इतकं काही गोड तोंड झाले आहे की चहा गोड लागेल की नाही शंकाच आहे " डोळे मिचकावीत विक्रम बोलला.

"ए चावटपणा पुरे, मी जातेच कशी चहा करायला. "म्हणून ती खुषीतच आत पळाली.

दुसऱ्या दिवशी नीता आल्यावर तिला किती आणि काय सांगाव असं मेधाला होऊन गेलं पण तरी विक्रमने दिलेला इशारा पाळायचा असे तिने ठरवले आणि

निदान त्या विषयाविषयी तरी काही बोलायचे नाहीअसा तिने विचार केला, पण नीतानच एकदम विषय काढला,

"अग मेधा, ती पल्लु आठवते का ग तुला? "

’हो, तीच ना ती, मोठे मोठे डोळे असलेली, गोरी गोबरी आणि शेलाटी? " मेधा म्हणाली,

"शेलाटी माय फुट, आता ती चांगली गोलमटोल झालीय, "

"बर मग, तिचं काय? "

"तिच काय काय म्हणून विचारतीस, सोडलं की, तिला तिच्या नवऱ्यानं "

" असं अचानक सोडायला काय झालेय तिच्या नवऱ्याला? "

" काही नाही, दुसरी कोणीतरी गळ्यात पडली म्हणे. "

"कमालच आहे बाई या पुरुषांची त्यांना काय दुसरा उद्योगच नसतो की काय? " मेधा एकदम सावरून उद्गारली.

"अगं हीच तर मजा आहे, पुरुषांना काय एका वेळी कितीही पोरी हिंडवायला जमतं आणि तेही आपली काम अगदी व्यवस्थित पार पाडून आपणच आपल्या वेड्यासारख्या एकाच पुरुषाला धरून बसतो. "

"तुला काय म्हणायचेय नीता, म्हणजे आपण करतो ते चूक आणि ते पुरुष वागतात ते बरोबर? "

"चूक काय आणि बरोबर काय हे मी नाही ठरवणार, मी फक्त तुला जगात काय चालले आहे ते सांगतेय. म्हणूनच त्या लग्नाच्या फंदात मी पडले नाही, नाही पटलं

संजयशी आणि आवडला जर दुसरा कोणी, तर चालले मी त्याचा हात धरून. त्यावर तुला काय करायचे ते मात्र तू ठरव. "

"म्हणजे म्हणायचे तरी आहे काय तुला? मला काही हा प्रश्नच नाही. विक्रम माझ्यावर अगदी भरभरून प्रेम करतो आणि माझ्याशिवाय तो कुणाचाच विचार करणे शक्यच नाही"

"असं तुला आज वाटतंय आणि तसे असेल तर फारच छान. पण मला तरी एक गोष्ट तुला सांगावीशी वाटते ती म्हणजे आपल्या मर्दाला आपणच आपल्या जाळ्यात बांधून ठेवलं पाहिजे. म्हणजे आपल्या आकर्षणाच्या जाळ्यात, ते थोडं सैल झाले की सुटलीच ही मासळी आपल्या तावडीतून. "

"मग मी काय करावं असं तुझं मत आहे? "शेवटी नाइलाजाने मेधाने नीताला विचारलेच.

"अगं ती जोली की फोली माहीत आहे ना? "

"हं अंजेलिना जोली तीच ना, आता तिचं काय? "

"अगं तिच्या जीन्समध्ये ब्रेस्ट कॅन्सरची बीजे आहेत म्हणुन सरळ तिनं शस्त्रक्रिया करून दोन्ही ब्रेस्ट काढूनच टाकले म्हणजे त्या कॅन्सरचा प्रादुर्भाव व्हायला नको"

"बर मग त्याच इथं काय? "वैतागून मेधानं विचारलं

"अगं एवढही कसं कळत नाही? आता तुझ्यावरही ती पाळी यायला नको म्हणजे कॅन्सरची नाही पण त्याहूनही भयानक म्हणजे तुझ्या या गोलमटोल, थुलथुलीतपणाने नवरा गमावण्याची, असे आपले मला वाटते. "

"मग जोलीसारखी कुठली शस्त्रक्रिया करू मी माझं लग्न वाचावं म्हणून? त्राग्याने मेधाने विचारले.

"अगं, आता अगदी सोपी शस्त्रक्रिया आहे त्यासाठी, तिला लायपोसक्शन म्हणतात. "

"हे बघ मला माझा विक्रम इतक्या दुबळया विचारसरणीचा आहे असे वाटत नाही लग्नासारख्या पवित्र बंधन स्वीकारतानाच "नातिचरामि, नातिचरामि" अशी शपथ घेतलीय आम्ही आणि जिवात जीव असेपर्यंत पाळायचेही वचन एकमेकास दिले आहे. अर्थात तुला हे सांगण्यात काय अर्थ आहे म्हणा---- " एकदम आपण भलतेच बोलून गेल्याचे लक्षात आल्यामुळे तिने जीभ चावली आणि "सॉरी, मला तसे म्हणायचे नव्हते. "म्हणून स्वत:स तिने सावरले.

"नेव्हर माइंड, आय अंडरस्टॅंड" तिचे बोलणे फारसे मनावर न घेता नीता म्हणाली " बर राहू दे, तुझ्या भल्यासाठीच सांगतेय पण नको असेल तर नको ऐकूस पण जर तसे वाटले तर मला सांग डॉ. टेकवानी माझ्या चांगल्याच परिचयाचा आहे. त्यानेच तर माझ्या ब्रेस्टचा आकार अगदी डोळे झाकले तरी संजयच्या डोळयात भरेल असा करून दिलाय. बर ठीक आहे, मला वाटले ते तुला सांगितले यावर मर्जी तुझी " म्हणून नीता निघून गेली. तिला पाठमोरी पहाताना तिच्या उरोजाप्रमाणेच

तिच्या नितंबाचीही गोलाई टेकवानीनं बदलली असावी असे मेधाला उगीचच वाटून गेले.

विक्रमच्या आपल्यावरील प्रेमाची ग्वाही मेधाने नीताला जरी कितीही निक्षून बजावून दिली असली तरी तिच्या म्हणण्यात तथ्य आहे हे तिलाही पटत होते. विक्रमलाच विचारावे का असे तिला वाटले पण तो याला अगदी सपशेल नकार देईल याची तिला खात्री होती. तसे त्याला विचारणे म्हणजे त्याच्या प्रेमाची प्रतारणा होती. त्यापेक्षा एकदा टेकवानीकडे जाऊन यावे आणि मग त्याला विचारावे असे तिला वाटले नाहीतरी शस्त्रक्रिया करायच्यापूर्वी त्याला सांगावेच लागणार.

दुसऱ्याच दिवशी विक्रम कामावर गेल्यावर ती नीताच्या फ्लॅटवर आली. आतापर्यंत नेहमी नीताच तिच्याकडे येत असे त्यामुळे तिच्याकडे जाण्याची तिला जरुरीच पडत नसे. तिने बेल वाजवली तरी बराच वेळ नीताच्या फ्लॅटचे दार बंदच होते. तिने दोन त्तीनदा बेल वाजवली तेव्हां बऱ्यच वेळाने नीताने दार उघडले. तेही अगदी नुकतीच झोपेतून उठल्यासारख्या अवतारात.

"काय हे नीता, किती बेल वाजवायच्या मी? मला वाटल कुठ बाहेरच गेलीस की काय. "

"सॉरी मेधा, संजय गेल्यावर जरा झोप काढायची संवय आहे मला, कारण त्याचा डबा तयार करण्यासाठी लवकर उठावे लागते ना, अग पण अशी उभी का? बस ना " तिला बसण्याचा आग्रह करत नीता म्हणाली. मेधाने आजूबाजूला पाहिले आणि त्या एवढ्या मोठ्या हॉलमध्ये तिला बसायला योग्य जागाच दिसेना जिकडे

पहावे तिकडे कपड्यांचे बोळे, कचरा, कागदांचे ढीग. त्यामुळे बसायचे कोठे याचाच विचार करत मेधा उभीच राहिली. तिच्या फ्लॅटच्या तुलनेत हा फ्लॅटही अगदीच छोटा होता आणि अगदी आवश्यक तेवढेच फर्निचर दिसत होते.

"अगं थांब, तुला बसायच कुठं हा पेच पडला असेल आपण आतच बेडरूममध्येच बसू. "म्हणून त्या दोघी आतच गेल्या.

" हं मग आज माझी कशी काय आठवण झाली बाईसाहेबांना "नीता म्हणाली

"तसं काही नाही आपली दररोज गाठ पडतेच की, तेव्हां म्हटल आज आपणच जावं"

"वा वा, भाग्यच माझं, बरं ते जाऊदे काय घेणार , सरबत की कोला की आणखी दुसरे काही? "हाताची मूठ करत ओठाकडे नेत ड्रिंकचा अभिनय करत नीतानं विचारलं

"छे, छे उगीच काय, तुला माहीत आहे ना, तसलं मला काही चालत नाही. साध पाणी दे नाहीतर काही करायचंच असेल तर लिंबू सरबत दे, " घाईघाईनं मेधा म्हणाली

"भारीच बाई सोवळी तू. आता हे काय लिंबू सरबत पिण्याचे दिवस आहेत?”

"हं उगीच आगाउपणा नको बरंका नीता, "

"बर बाई राहिलं, लिंबू सरबत तर लिंबू सरबत. पण मी दुसरं काही घेतलं तर चालेल ना? "

"तुला कोण अडवणार बाई? "

" आणि अडवलं तर मी थोडीच ऐकायला बसलेय " फ्रीज उघडुन एका हातात सरबताची व दुसऱ्या हातात बिअरची बाटली काढत नीता म्हणाली. नंतर एका ग्लासात सरबत व दुसऱ्यात बिअर ओतून सरबताचा ग्लास मेधाच्या हातात देत ती म्हणाली,

"हं आता बोल"

" प्रथमच I am very sorry नीता, काल तुला जे बोलले त्याबद्दल, लग्न न करण्याचा निर्णय तुम्ही दोघांनी विचारपूर्वक घेतलाय त्यात मला नाक खुपसायचं कारण नव्हतं. पण मला दुसरंच सांगायचय, ते म्हणजे तू काल जे म्हणत होतीस आपल्या शरीराया सुडौलपणाबद्दल, आता वाटू लागलेय की तुझ्या बोलण्यात तथ्य आहे. "मेधाने सुरवात केली.

"दॅट्स लाइक अ गुड गर्ल. मला माहीत होत, की तुझ्यासारखी शहाणी मुलगी कधीतरी योग्य विचार करेलच म्हणून, बर मग आता बोल पुढे काय करायचे ठरवले आहेस? " नीता एकदम उत्तेजित होऊन म्हणाली.

"तू ते टेकवानींच सांगितल तसे खरेच होईल का, माझ्या अंगावरील चरबी खरच काढू शकतील ते. ? "चाचरतच मेधा म्हणाली.

"अग माझ्यावर विश्वास नाही का? माझा स्वत:चा अनुभव तर आहेच, पण मला खात्री आहे की ते तुझा असा कायापालट करतील की विक्रम तुला सोडून कामावरही जायला नको म्हणेल. "

" तसं काही नको व्हायला बरंका "मेधा घाईघाईने म्हणाली

"अगं ते मी आपलं असंच म्हटलं ते अगदी शब्दश: घेऊ नकोस, असं कधी झालंय का? बर ते जाऊदे केव्हां जायचेय आपण टेकवानींकडे म्हणजे तशी त्यांची अपोइंटमेंट घ्यायला बरे "

" पण मला अगोदर विक्रमला विचारायला हवे" गुळमुळीतपणे मेधा म्हणाली

"अग टेकवानीकड जायचं म्हणजे लगेच लायपोसक्शन करायचे असे वाटले की काय तुला? ती फार पुढची गोष्ट आहे. उद्या परवा टेकवानीकड जायला विक्रमला कशला विचारायला हवे? नंतर प्रत्यक्ष लायपो करण्यापूर्वी विचार हवे तर. आता मी अपॉइंटमेंट तर घेऊन ठेवते आणि सध्या विक्रमपासून हे गुपितच राहूदे त्याला एकदम चकित कर हवे तर. " म्हणुन नीताने लगेचच डॉ. ना फोन लावला. थोड्यावेळातच फोनवर बोलून नीता म्हणाली,

"यू आर लकी मेधा, उद्याचीच अपॉइंटमेंट मिळाली आहे, नाहीतर बऱ्याच वेळा पंध्रा पंध्रा दिवस लोकांना वाट पहात बसावं लागतं. उद्या सकाळी साडेदहाला निघू अपॉइंटमेंट अकराची आहे. टॅक्सीनच जाऊ म्हणजे गाडी घरी ठेवायला विक्रमला सांगायला नको. "

आणि पावणे अकरा वाजता त्या दोघी टेकवानींच्या क्लिनिकमध्ये होत्या. पण अजूनही आपण येथे आलो आणि तेही विक्रमला कळू न देता हे बरोबर केले की नाही याविषयी मेधाच्या मनातील गोंधळ संपत नव्हता. लग्नानंतर आजपर्यंत तिने कोठलाच निर्णय विक्रमचा सल्ला घेतल्याशिवाय घेण्याचा विचारही केला नव्हता. खरेतर तिने एकादी गोष्ट त्याला न विचारता केली तर त्याची हरकत होती अशातला

भाग नव्हता. उलट तिने स्वत: बाहेर जावे, फिरावे, स्वत:चे मनोरंजन करून घ्यावे असा कधीकधी तो आग्रहही धरी कारण कामाच्या व्यापामुळे. आपल्याला तिच्याकडे लक्ष देता येत नाही असे त्याला वाटे. पण तिलाच ते नकोसे वाटे. आपल्याच विचारात ती गुंगून गेली असताना,

"मिसेस मेधा पंडित " असा आवाज तिच्या कानावर आला आणि तेवढ्यात नीतानेच "अग, मेधा तुलाच बोलावत आहेत बघ" असे म्हटल्यावर ती भानावर आली "चल चल " म्हणत नीताने तिला जवळ जवळ ओढतच आत नेले.

डॉ. टेकवानींना पाहून तिला खूपच बरे वाटले. त्यांचा गोरापान चेहरा, उंचीपुरी शरीरयष्टी, रुबाबदार व्यक्तिमत्व व त्यास शोभेसे अंगावरील भारी कपडे यांमुळे तिच्यावर त्यांची मोठीच छाप पडली.

"गुड मॉर्निंग मॅम, म्हणत त्यानी तिला समोरच्या गुबगुबीत कुशनच्या खुर्चीवर बसण्याची विनंती केली.

" and how do you do नीताजी? "नीताकडे वळून त्यानी विचारले.

" Oh, thanks, I am fine doctor, " म्हणुन तिनेही त्यांच्या अभिवादनाचा स्वीकार केला आणि तीच पुढे म्हणाली

"डॉक्टर, ही मेधा, माझी नेबर आणि क्लोज फ्रेंड " नीताने मेधाची ओळख करून दिली.

"ओ. के. बोला मिसेस पंडित, आपला काय प्रॉब्लेम आहे? "

" डॉक्टर, अलीकडे माझी जाडी खूपच वाढत चालली आहे"

" आपल्याकडे जी गोष्ट असते तीच आपल्याला नको असते नाहीका? ' डॉक्टर हसत हसत म्हणाले,

" आता बघा की, माझ्या बायकोला मात्र ती किडकिडीत आहे याचे वाईट वाटते, "

" तसे नाही डॉक्टर, कोठलीही गोष्ट योग्य प्रमाणात असेल तर चांगली वाटते."

"यु आर राइट, मेधाजी, मी आपले थट्टेत म्हटले. तुमचा मुद्दा अगदी बरोबर! आणि अहो, आम्ही त्यासाठीच येथे बसलो आहोत ना, तुम्हाला जर असं वाटलं नाही तर आमच्याकडे कोण येणार? बर आता प्रथम आपण पलीकडे या म्हणजे योग्य त्या तपासण्या करता येतील. "

तपासणी कक्षात तीन लेडी डॉक्टर्स वेगवेगळया केबिन्समध्ये होत्या व तेथे मेधाच्या शरीराच्या वेगवेगळया चाचण्या घेण्यात आल्या. त्यात अगदी बी. पी. ब्लड या नेहमीच्या गोष्टी तर पाहिल्या गेल्याच शिवाय त्याव्यतिरिक्त तेथील लेडी डॉक्टरने तिच्या शरीराची मोजमापे अनेक ठिकाणी घेतली व त्या सर्वांची विस्तृत नोंद आपल्या लॅपटॉपवर केली. तेथील अद्यावत कॅमेऱ्याचा वापर करून तिच्या शरीराया निरनिराळ्या भागांची छायाचित्रेही घेण्यात आली.

मेधा कपडे घालून बाहेर आली तेव्हां डॉक्टर संगणकातून आलेले फोटो व नोंदी पहातच बसले होते. ती बाहेर येताच तिच्याक्डे पहात ते म्हणाले, "मिसेस पंडित, खरे तर काही औषधे व इंजेक्शन्स देऊन आपल्या शरीराचा आकार सुयोग्य

होईल असे मला वाटते व काही व्यायाम प्रकारही मी सुचवतो. त्यानंतरही तुमचे समाधान झाले नाही, तर लायपोसक्शनचा उपाय आहेच. त्यामुळे मात्र अगदी योग्य त्याच ठिकाणी योग्य प्रमाणात आपल्या शरीरातील चरबी राहील याविषयी मला खात्री आहे.

डॉ. टेकवानींची गलेलठ्ठ फी देऊन बाहेर पडतानाच आपले अंग हलके झाल्यासारखे मेधाला वाटू लागले.

"बघ, महिन्याभरातच तू अगदी चवळीची शेंग दिसायला लागशील. "नीताने बाहेर पडताच आपली टकळी सुरू केली पण मेधाला आता ती अगदी असह्य वाटत नव्हती.

========================

" मग काय झालं मर्लिन क्लिनिकमध्ये? " विक्रमने घरात प्रवेश करताच मेधाला विचारलं.

त्याचा हा प्रश्न ऐकून मेधाला आश्चर्याचा धक्काच बसला.

"पण, तुला कुणी सांगितलं, मी मर्लिनमध्ये गेले होते ते. "

" ते आमचं गुपित आहे. तुला काय वाटतं तू अशी मला पत्ता लागू न देता कोठेही जाऊ शकशील? "

"ए रागावू नको, " आपल्या सुरात आर्जवीपणा आणत मेधा म्हणाली.

"तुला सांगणारच होते ---"

" हो पण तुझ्या लाडक्या मैत्रिणीनं सांगितलं आणि ते तू ऐकलेस, असेच ना? "विक्रमच्या सुरातील नाराजी लपत नव्हती.

"विकी, प्लीज माफ करना मला. आत्तापर्यंत कधी असं झालंय का की कोणतीही गोष्ट मी केलीय आणि तुला त्याचा पत्ताही लागू दिला नाही. आणि आता डॉक्टरनी दिलेली औषधे मी तुझ्यापुढेच घेणार ना, किंवा व्यायाम करणार तेही तुला नकळत थोडाच करणार आहे, नीताने फोन केला आणि लगेचच डॉक्टरची वेळ मिळाली म्हणून गेलो नाहीतर तुलाच घेऊन गेले असते. "

" बरं ते राहूदे, तुझे समाधान झाले ना? " विक्रमचा पारा खालती आल्याचं मेधाने ओळखले.

" आत्ता तरी डॉक्टरांनी गोळ्या, औषधं लिहून दिली आहेत आणि व्यायामही सांगितले आहेत. त्यामुळे जाडी व चरबी कमी होईल असे त्यांनी सांगितले आहे "

डॉक्टर टेकवानीनी सांगितलेली गोळ्या व औषधे मेधाने अगदी लगेचच मागवली. औषधाने जाडी कमी होईल यावर मात्र तिचा काही विश्वास बसत नव्हता तरीही नीताचा आग्रह म्हणून तिने प्रयत्न करून बघायचे ठरवले. इतकेच काय त्यानी सांगितलेले व्यायामप्रकार करण्यासाठी ती अगदी पहाटे उठायला लागली. तिला इतक्या पहाटे आपल्या कुशीतून उठू देण्याची विक्रमची तयारी नसे.

"कशाला हवी ही सगळी कटकट तू मला अशीच आवडतेस " असे म्हणून तो तिला जवळ ओढायचा प्रय्त्न करायचा पण तिचा अगदी ठाम निश्चय असायचा त्यापुढे त्याचे काही चालायचे नाही. त्यामुळे पंधरा दिवसांनी क्लिनिकमध्ये जाताना

नीताने "अगं तू एकदमच स्लिम दिसू लागली आहेस" असं म्हटल्यावर आपल्या अंगावरून मोरपीस फिरल्यासारखं तिला वाटलं.

त्या दोघी मर्लिन क्लिनिकमध्ये शिरल्या आणि त्यांच्यासमोरूनच संगीता दवे बाहेर पडली. संगीताकडे पाहून तिला अतिशय आश्चर्य वाटले कारण एकेकाळी बटाट्याच्या पोत्यासारखी दिसणारी संगीता आज एकदम वठलेल्या झाडासारखी दिसत होती. मेधाला पाहून संगीताचा चेहरा फुलला, पुढे होत म्हणाली, "काय गं मेधा, लग्न भलतंच मानवलेलं दिसतंय? "

"हो, पण तुला असं काय झालंय, अगदी वाळून गेली आहेस, नवरा फार छळतो की काय? "

"छे गं तो तर मला अगदी फुलासारखं जपतोय, पण त्याचं काय झालं ---"असं म्हणून नवरा आपल्यावर किती प्रेम करतो पण लग्नानंतर दोनच वर्षात ती कशी आजारी पडली आणि त्यात तिची तब्येत लशी ढासळली याचे पुराण तिनं सुरू केलं आणि तिला प्रश्न विचारल्याचा मेधाला पश्चाताप झाला. आपली देहयष्टी पुन्हा डौलदार होण्यासाठी डॉ. टेकवानीकडे ती येत होती.

क्लिनिकमध्ये शिरताच डॉ. टेकवानींनी "हॅलो मिसेस पंडित, " म्हणत तिचे उत्साहाने स्वागत केले. "You are looking much better " "Thank you doctor, " मेधाही उत्साहाने म्हणाली. पण हे तिचे ओढून ताणून आणलेले अवसानच होते कारण मधल्या काळात आहारावर कडक नियंत्रण ठेवून, डॉकटरनी सांगितलेले व्यायाम करूनही आपल्या शरीरात फारसा बदल झाल्याचे तिला

स्वत:ला तरी जाणवत नव्हते. "Let us see what your results say" म्हणून डॉक्टरांनी डॉ. डॉलीला मेधाची तपासणी करण्यास सांगितले. डॉलीने तिची इतर काही तपासणी न करता तिचे फक्त वजन पाहिले आणि ती डॉक्टरांकडे येऊन म्हणाली, "Doc, she has gained half kg. "

"Oh, I see, " म्हणत टेकवानीं मेधाकडे वळून म्हणाले, "I am sorry, मेधाजी, आपण आहारावर जरा अधिक नियंत्रण ठेवायला हवे. " मेधाला अगदी रडूच कोसळले. कारण डॉक्टरांच्या सूचनांचे तिने अगदी तंतोतंत पालन केले होते आणि तरीही वजन कमी होण्या ऐवजी ते अर्ध्या किलोने वाढलेलेच आहे हे पाहून तिला आश्चर्यच वाटले.

"पण मी तर तुमच्या सूचना अगदी तंतोतंत पाळल्या होत्या डॉक्टर, आहार अगदी तुमच्या सूचनाप्रमाणेच घेत होते आणि व्यायामही! "

" त्याचे काय आहे मेधाजी, कधी कधी शरीरातील काही भागात वाढलेली चरबी नुसत्या आहार किंवा व्यायामाने कमी होत नाही पण मला खात्री आहे दोन किंवा तीन महिन्यात आपण तुमच्या वजनाचा प्रश्न निकालात काढू शकू. Have some patience! "

नीताबरोबर बाहेर पडताना मेधा खूपच नाराज झाली होती. पण नीतानेच तिला धीर देत म्हटले, "अगं इतकं काय मनाला लावून घेतेस, डॉक्टरनी सागितले आहे ना मग ते काहीतरी केल्याशिवाय रहाणार नाहीत, विश्वास ठेव माझ्यावर. डॉक्टरांची मानसिकता कशी असते तुला माहीत आहे. शिवाय शस्त्रक्रिया म्हणजे त्यात धोका

हा आलाच त्यामुळे एकदम शस्त्रक्रियेचा पर्याय ते सुचवणार नाहीत. पेशंट व त्याचे नातेवाईक ऑपरेशनपूर्वी सर्जन सांगतील ते ते मान्य करतात पण काही भलते सलते झाले तर मात्र दोष डॉक्टरलाच देतात त्यामुळे मला वाटते तू शस्त्रक्रियेविषयी विक्रम काय म्हणतो हे का विचारत नाहीस? "

"तो तर मला या डाएट, व्यायाम या भानगडीत सुद्धा पडायला नको म्हणतो, मग ऑपरेशनची तर बातच दूर. "

"पण तुला तरी ही गोष्ट त्याला पटवायलाच हवी. त्याच्या परवानगीशिवाय मला नाही वाटत डॉक्टर ऑपरेशनची रिस्क घेतील. "

"पण त्याची परवानगी आवश्यकच आहे का? "

"तसे पहायला गेलं तर पेशंटची सही पुरेशी होते. अश्या शस्त्रक्रियेत डॉक्टर्स नवऱ्यांना विश्वासात घेतात एवढेच! तसे कायदेशीर बंधन नाही"

" मग मला वाटते विक्रमला विचारण्यात काही अर्थ नाही. मला नाही वाटत तो या ऑपरेशनला तयार होईल. '

"बघ तरी एकदा प्रयत्न करून, त्याने अगदी नाहीच म्हटले तर त्याचा कुठे दौरा निघाला की आटपून टाकू आपण त्याला कळू न देता "

"बर, बघते मी त्याची समजूत पटते का ते" मेधा आपल्या फ्लॅटमध्ये शिरता शिरता म्हणाली.

"हं काय म्हणतोय आजचा दिवस? "घरात प्रवेश करत करत विक्रमने विचारणा केली.

"तुला एक विचारायचं आहे. "त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत मेधा म्हणाली, "विचारा विचारा. असं काय विचारायचं आहे राणीसाहेबांना? "

"ए मी अगदी सीरियसली विचारतेय उगीच थट्टेवारी नेऊ नको, "

"अगं मग विचार की, मीही अगदी सीरिअसलीच सांगतोय"

"आज मी डॉक्टर टेकवानींकडं गेले होते"

" मग तुझं वजन कमी होतेय ना, मग झालं तर असेच चार पाच महिने जाऊदे तू अगदी छान पूर्वीसारखीच दिसू लागशील "

" हो, हो, अरे माझं ऐकून तर घेशील? अरे, मागच्या महिन्यात इतका कसोशीने प्रयत्न करूनही आज माझे वजन अर्धा किलो वाढलेच आहे"चेहरा पाडत मेधा म्हणाली.

"एवढेच ना, मग त्यात इतके मनावर घेण्यासारखे काय आहे? उगीच तू या गोष्टीकडे जास्त लक्ष देतेस ना, त्याचाच हा परिणाम. तू हे सगळे सोडून मस्तपैकी खात पीत रहा, काळजी सोड, तब्येत अशीच राहू दे काही काळजी नको. "

" अरे तुला कळत कसे नाही, अशीच जाडी वाढत राहिली तर बाळंतपणसुद्धा कठीण जाईल हे लक्षात येते का तुझ्या? मला काय वाटते, विक्रम, आपण लायपोसक्शनचा प्रयोग करून पहायला काय हरकत आहे? हल्ली ते ऑपरेशन अगदी कॉमन झालेय. "

"डॉ. टेकवानींनी तुला तसं सांगितले आहे का? "

"नाही, त्यानी तसं सांगितलं नाही पण या उपायांनी स्थूलपणा कमी करता आला नाही तर तोच एक पर्याय आहे, आणी नीतानंही मला तसंच सुचवलं आहे. आणि--"

"तुला ते पटले आहे असेच ना? " जरा घुश्श्यातच विक्रमने विचारले

" हो तसे समज" मेधाने आता आपले म्हणणे सांगायचेच असा निश्चयच करून म्हटले.

"पण माझे मत विचारत असशील तर, मला मात्र हा पर्याय मान्य नाही. "विक्रमने आपला निकाल जाहीर केला.

"’मग काय, विचारलंस का विक्रमला? " दुसऱ्या दिवशी सकाळी विक्रम आणि संजय कामावर जाताच नीताने लगेचच मेधाकडे आपला मोर्चा वळवला. आणि तिन दिलेला कॉफीचा कप तोंडाला लावत प्रश्न केला. जणु त्यांच्या निघण्याचीच ती वाट पहात होती. मेधाला मात्र आता तिचे आगमन फार आनंददायक वाटले नाही. विक्रमने इतका ठामपणे नकार दिल्याचे नीताकडे कबूल करणे आपल्याला अवघड जाणार हे तिला माहीत होते.

"हो कालच मी त्याला विचारले, आणि मी म्हटले तसेच झाले, "

"म्हणजे त्याने नकार दिला असेच ना? " नीताने तिचे काम हलके केले आणि आपला राह व्यक्त करतत ती म्हणाली, .

"या पुरुषांचे मला काही कळत नाही, बायकोने सुंदर दिसावे असा त्यांचा आग्रह तर असतो पण मग त्यासाठी आपण काही करू म्हटले तर त्याला उत्तेजन देण्या ऐवजी ----"

" तुझे म्हणणे कदाचित बरोबर असेलही, नीता, पण माझा विक्रम तसा नाही "मेधाने तिला मध्येच अडवीत म्हटले, 'त्याचे माझ्यावर इतके प्रेम आहे की या शस्त्रक्रियेत माझे काही बरेवाईट झाले तर काय ही कल्पनाही त्याला सहन होत नाही, त्यामुळेच त्याने ठामपणे मला अश्या प्रकारची शस्त्रक्रिया करण्यास नकार दिला आहे. "

" बरं तू म्हणतीस तसे समजूया--" नीताने तिच्या या स्पष्टोक्तीमुळे मुळीच नाउमेद होत म्हटले. " विक्रम तुझ्यावर अगदी मनापासून प्रेम करतो अगदी शंभर टक्के कबूल, पण एक गोष्ट तुला समजूनही तू नाकारतेस, ती म्हणजे तुझ्या अश्या बेढब होण्याने त्याचा तुझ्यातील इंटरेस्ट कमी झाला आणि त्याच्या ऑफिसातील एकादी तन्वंगी त्याला वश झाली तर त्याला मोह होणार नाही असे वाटते का तुला? अगं भले भले या मोहातून सुटले नाहीत तिथं तुझ्या विक्रमचे काय घेऊन बसलीस. ? तू पाहिलेस ना त्या दिवशी डॉ. टेकवानींकडे कशी रीघ लागली होती पेशंट्सची. त्यात स्त्रियाच असतात असे नाही बरंका, पुरुषसुद्धा असतात. "

"त्याना काय करायचे असते अशा क्लिनिकमध्ये? " इतका वेळ गप्प बसलेल्या मेधाने आश्चर्याने विचारले.

"म्हणजे तुला काय वाटत, पुरुषांनाच सुंदर स्त्री हवी असते आणि बायकांना मात्र कसलाही सोम्यागोम्या चालतो? गेले ते दिवस, आता स्त्रीलाही वाटू लागले आहे की आपला जोडीदार आपल्या मनासारखा असावा. आणि तसे का वाटू नये? पूर्वीच्या काळीसुद्धा स्वयंवराची पद्धत होती त्यावेळी हजारो पुरुषांच्या मालिकेतून आपल्याला आवडणाऱ्या पुरुषाच्या गळयात माळ घालायची ना राजकन्या? मग आजच्या स्त्रीलाही तसेच वाटले तर त्यात गैर काय? हल्ली कित्येक पुरुष चाळिशी ओलांडली तरी लग्नावाचून रहातात ते काय उगीचच. "

"खरं आहे, त्याबाबतीत तुलाच जास्त अनुभव असणार, "मेधाने नीताला चिमटा काढला.

"तसे म्हण हवे तर, नाहीतरी आम्ही बंधनात रहायचं नाही हे ठरवण्याचा मुख्य उद्देश तर तोच आहे. बरं ते जाऊदे, मी आपली उगीचच बडबड करतेय, जणु डॉ. टेकवानीची एजंटच असल्यासारखी. त्याला पेशंट अगदी नको नको म्हणतानाही येतच आहेत त्यात मी कशाला उगीच भर घालू. तुझी बालमैत्रिण या नात्याने मला जे करावं वाटलं ते माझं कर्तव्य मी केल, आता तू आणि तुझा विक्रम, काय घालायचा असेल तो गोंधळ घाला, त्याला तू आवडतेस आणि तुला तो, देव करो आणि तुमची जोडी अशीच सुखात नांदो. चल जाते मी कशी, आता पुन्हा नाही हा विषय तुझ्यापुढं काढणार" म्हणून नीताने बाहेरजाण्यासाठी पाय उचलला पण तिने दरवाज्याच्या दिशेने दोन पावले टाकली न टाकली तोच मेधाने तिला थांबवले,

"अगं थांब, नीता इतकी डोक्यात राख घालून घेऊ नकोस, मला तुझं म्हणणं पटतयं गं "

"नुसतं पटतय म्हणून काय उपयोग, कारण विक्रमच्या संमतीशिवाय एक पाऊलही तू टाकणार नाहीस आणि तो काही तुला हे पाऊल टाकू देणार नाही मग मधल्या मध्ये माझी मात्र उगीचच गोची. "

’ असं कर ना डॉक्टरांची अपॉइन्टमेन्ट घेऊन ठेव म्हणजे त्याना या शस्त्रक्रियेविषयी जरा विचारता येईल आणि मग तसे ठरवता पण येईल. ’

"आता कसं शहाण्या मुलीसारखी बोललीस, चल आताच फोन करते आणि त्यांची अपॉइन्टमेन्ट घेते कशी, नाहीतर लगेच तुझा विचार बदलायचा. आणि आता एकदाच काय तो विचार पक्का कर, नाहीतर मी आपली तुझी सेक्रेटरी असल्यासारखी फोन करणार आणि आयत्या वेळी तू कच खाणार"

"नाही नाही आता मात्र माझा विचार अगदी पक्का" मेधाने तिला आश्वासन देत म्हटले.

डॉ. टेकवानींना फोन लागला पण ते आठ दिवस सिमला कुलू मनालीच्या सहलीला गेले होते त्यामुळे आठ दिवसानंतरची भेट ठरली.

"बघ तू उगीचच वेळ घालवलास, नाहीतर जाण्यापूर्वी तुझे ऑपरेशन करूनच डॉक्टर गेले असते आणि --- बरं ते राहूदे नाहीतरी आपल्यालाही विक्रम येथे नसण्याची वाट पहावीच लागणार आहे कारण तो काही तुला ही शस्त्रक्रिया करू देणार नाही हे तुझ्या बोलण्यावरून सिद्धच झालंय त्यामुळे तसाही वेळ जाणारच आहे. बर मग आता मात्र मी जाते, Thanks for the coffee"

या वेळी मात्र मेधाने डॉ. टेकवानींच्या क्लिनिकमध्ये अगदी निश्चयपूर्वक पाऊल ठेवले. पहिल्या वेळी मनावर असलेले दडपण तिला मुळीच नव्हते. यावेळी नीताही तिच्याबरोबर नव्हती, पण आपला नंबर येईपर्यंत शांतपणे ती स्वागतकक्षातील रंगीबेरंगी चित्रे असलेली मासिके चाळत बसली. त्यातील एकात अनायासे लिपोसक्शनवरील एक लेख सचित्र होता तो ती वाचत बसली होती तेवढ्यात स्वागतिकेने तिचे नाव पुकारलेच. डॉक्टरनी अर्थातच नीताची चौकशी केली, "आज मेधाजी आपण एक्ट्याच कश्या काय? आपली सहेली नाही आली? " असा प्रश्न त्यानी विचारलाच.

"हो खर तर आम्ही दोघी निघालोच होतो पण अचानक संजयचा फोन आला आणि तिला जावे लागले’"

"मग विक्रमजींना तरी बरोबर आणायचे, त्यांचाही परिचय झाला असता. "

"त्यांना तर काय कामातून क्षणाचीही फुरसत नसते" मेधाला खरे कारण निदान आत्ता तरी सांगायचे नव्हते.

"ओ. के. काही हरकत नाही, तर मग आपल्याला शस्त्रक्रिया करूनच अतिरिक्त चरबी हटवायची आहे असेच ना? "

"होय डॉक्टर त्याशिवाय दुसरा काही उपायच दिसत नाही मला"

"खरे आहे मेधाजी, कारण आपण औषधोपचार व व्यायाम करून पाहिले आणि त्याचा काही उपयोग नाही असे दिसले. शिवाय काही भागातील चरबी ही कोणत्याच उपायांना दाद देत नाही. ती शस्त्रक्रिया करूनच शरीराबाहेर काढावी

लागते. चला मी तुम्हाला आत नेऊन आपल्याला कश्या प्रकारची शस्त्रक्रिया करावी लागेल याविषयी एक फिल्मच दाखवतो. "

टेकवानींच्या क्लिनिकमधील वरच्या मजल्यावर एक प्रशस्त हॉलमध्ये अगदी एकाद्या चित्रपटगृहासारखीच व्यवस्था केलेली होती. मेधासारखेच आणखीही काही पेशंट्स तेथे अगोदरच जमले होते. त्यात काही स्त्रिया व काही पुरुषही होते.

"ladies and gentlemen, "अशी सुरवात करून आता कोणत्या प्रकारची फिल्म दाखवण्यात येणार आहे याची माहिती डॉक्टरांनी इंग्रजीमध्येच दिली व त्यानंतर जर काही गोष्टी कळल्या नसतील तर हिंदी किंवा मराठीतही प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेण्यास सांगितले.

" अतिरिक्त चरबी अगदी पूर्णपणे निघते ना? " एका स्त्रीने शंका विचारलीच. ती अगदी चांगलीच जाडजूड होती त्यामुळे तिला ही शंका वाटणे स्वाभाविक होते.

"अगदी योग्य शंका, तिच्या देहाचा आकार न्याहाळत डॉक्टर म्हणाले, "आपल्याला शरीराचा योग्य समतोल साधता येईल इतकीच चरबी काढण्याचा आम्ही प्रयत्न करतो, कारण अधिक प्रमाणात चरबी काढण्याचा प्रयत्न करणे हे जिवावरही बेतू शकते आणि आपण जाणताच "सिर सलामत तो पगडी पचास " त्यामुळे चरबी काढतांना आपल्या जिवास धोका होणार नाही याची आम्ही प्रथम काळजी घेतो.

"मग माझ्यासारखीला या ऑपरेशनचा काही उपयोग नाही" ती बाई जरा खट्टू होतच म्हणाली.

"तसे काही नाही बाईसाहेब, एका वेळी जादा चरबी काढणे हानिकारक असले तरी आम्ही दोन अगर तीन वेळा या पद्धतीने चरबी कमी करून आपणास अगदी मेरिलिन मन्रोसारखे डौलदार करू, काळजीच करू नका" टेकवानींच्या या विधानावर तेथे बरेच हास्यध्वनी उमटले आणि ती स्त्री जरा लाजल्यासारखी झाली. "अर्थात ही जरा अतिशयोक्ती झाली, " डॉक्टर स्वतःला सावरत म्हणाले, “पण आपल्यालाही या शस्त्रक्रियेचा नक्कीच फायदा होईल. कसा ते मी तुम्हाला स्वतंत्रपणे सांगेन व त्यानंतरच आपण निर्णय घेऊ शकता, त्याचबरोबर आम्ही एकदा चरबी काढल्यावर पुन्हा वाढू न देणे ही जबाबदारी तुमची. "

फिल्म दाखवल्यावर बहुतेकांना कॅन्युला म्हणजे चरबी शरीरातून बाहेर काढण्यासाठी वापरण्यात येणारी पोकळ नलिका कशी असते, त्या चरबी असलेल्या जागी कश्या अंतर्भूत केल्या जातात व त्यातून चरबी कशी काढता येते याविषयीचे बरेच ज्ञान प्राप्त झाले. बहुतेकांच्या मांड्या, पोट आणि नितंब या भागावरच चरबीचे अतिरिक्त थर असतात व ते काढण्यापूर्वी व काढल्यानंतर त्या अवयवांना सुडौलपणा कसा प्राप्त होतो या गोष्टीचीही फिल्ममधून प्रत्यक्ष पाहून योग्य कल्पना सर्व उपस्थितांना झाली. .

फिल्म दाखवल्यानंतर त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कॅन्युला वगैरे साहित्यही टेबलावर मांडून ठेवलेले डॉक्टरांच्या मदतनिसांनी दाखवले.

त्यानंतर डॉक्टरांशी बोलताना मेधा म्हणाली, '"डॉक्टर ही तर फारच साधी व सोपी प्रक्रिया असताना त्यात धोका आहे असा, त्याचा इतका बाऊ का करतात समजत नाही. "

"मेधाजी, सर्वसामान्य माणसाला त्यात धोका नाही असे वाटत असले तरी आम्हा डॉक्टरांनाच त्यातील गुंतागुंत काय असू शकते आणि त्यामुळे कोणता धोका संभवतो याची कल्पना असते. त्यामुळे त्यात असलेल्या धोक्याची कल्पना आम्ही पेशंटना अगोदर देतो. एक गोष्ट लक्षात ठेवा, शस्त्रक्रिया म्हटले की धोका हा असतोच. कारण काही नाही म्हटले तरी तुमच्या शरीरातील एक अवयवास आम्ही छिद्र पाडत असतो किंवा त्याचा तुकडा काढत असतो. सुदैवाने देवाने आपल्या शरीराची निर्मिती अशी केली आहे की बऱ्याच गोष्टी कापल्या तरी त्यांची जागा नव्या पेशी घेतात व तो भाग पूर्ववत होतो. परंतु तसे होत असताना जंतूंचा प्रादुर्भाव होणे शक्य असते, तो न व्हावा न्हणून आम्ही शक्य तेवढी काळजी घेत असतो, त्यामुळेच आम्ही हा निर्णय आपल्यावर सोपवतो. पूर्ण विचार करून आम्ही दिलेल्या कायदेशीर संमतिपत्रावर सह्या करा मगच शस्त्रक्रियेच्या सर्व फॉर्मॅलिटीज सुरू करण्यात येतील. "

मर्लिन क्लिनिकमधून मेधा घरी आली तेव्हां नीता तिची वाटच पहात होती. तिचे काम लवकर झाल्यामुळे ती घरी येऊन बसली होती.

"मग काय म्हणाले डॉक्टर? ' नीताने अपेक्षित प्रश्न विचारला व यावेळी मात्र मेधाने अपेक्षित म्हणजे तिला हवे असलेलेच उत्तर दिले, "डॉक्टरांनी सर्व माहिती फारच व्यवस्थित दिली आणि मला तर हे ऑपरेशन अगदीच सरळ आणि सोपे वाटले. "

" मग मी तरी काय म्हणत होते. तू आणखी जर वाट पहात बसली असतीस तर उलट अतिरिक्त चरबी ज्यादा झाल्यामुळे तशी शस्त्रक्रिया करायला डॉक्टरांनीच नकार दिला असता"

" हो तू म्हणतेस ते बरोबर आहे, कदाचित मला दोन तीनदा लिपोसक्शन करावे लागले असते. बर ते जाऊदे आता मी तर निर्णय घेतला आहे की ही शस्त्रक्रिया करायची, फक्त त्यासाठी विक्रमचा कुठलातरी दौरा निघायला हवा एवढेच काय ते! "

" तो प्रश्न अगदी किरकोळ आहे. निघेलच त्याचा दौरा लवकरच. " नीता म्हणाली.

आणि जणु काही ती भविष्यवाणीच तिच्या मुखातून बाहेर पडली कारण त्याच दिवशी संध्याकाळी विक्रम घरी आला ते अगदी धावत पळतच "मेधा माझी बॅग भर लवकर, संध्याकाळच्या फ्लाइटने मला बंगलोरला जायचे आहे. एक मोठं कॉन्ट्रॅक्ट मिळण्याची संधी आहे ती वाया जाऊ देता उपयोगाची नाही. "

विक्रमच्या तोंडून ही बातमी ऐकल्यावर एकीकडे मेधाला बरे वाटले त्याचबरोबर तिला आपला आधार गेल्यासारखेही वाटले. बरे वाटण्याचे कारण उघडच होते, कारण त्याच्या अनुपस्थितीत आपल्याला हवी ती शस्त्रक्रिया कुठलीही आडकाठी न येता करता येईल ही झालेली जाणीव पण त्याचबरोबर चिक्रम नसला की तिला अगदी एकटे पडल्यासारखे वाटे तीच जाणीव पुन्हा तिच्या मनाचा ताबा घेऊ लागली.

"पण असे एकदम अचानक कसे ठरले? विकी, सांगशील का मला सगळे? "

"आता उगीच वेळ घालवू नको, तू माझ्याबरोबर एअर पोर्टवर चल म्हणजे जाताना सगळे नीट सांगतो. "घाई घाईने विक्रम उत्तरला. आणि मग मेधाला लगेचच त्याच्या जाण्याची तयारी करायच्या मागे लागावे लागले. तयारी म्हणजे काय त्याचे कपडे व इतर काही आवश्यक गोष्टीच त्याच्या नेहमीच्या प्रवासी बॅगमध्ये भरायच्या एवढेच काय ते काम, पण तेही मेधाच्या मदतीशिवाय विक्रमला जमत नसे.

"पण तू लवकर परत येणार ना विकी, मला एकटीला येथे फार बोअर होते. "त्याला एअरपोर्टवर सोडताना मेधाने विचारले,

" काम झाले की लगेचच परत येणार डार्लिंग, मला तरी तुला सोडून एकट्याला कसे रहावेल, बर अच्छा बाय, काळजी घे स्वत:ची"

"आणि हो सतरा तारखेस आपल्या लग्नाचा वाढदिवस आहे विसरू नकोस. त्यावेळपर्यंत तरी तुला आलेच पाहिजे, I want to give you a big surprise! "

"मग तर येणारच, बर अच्छा Take care" एअरपोर्टच्या प्रवेशद्वारात तिचा निरोप घेत विक्रमने म्हटले.

एअरपोर्टवर विक्रमला सोडून मेधा परत आली ती तडक नीताकडेच गेली. जाण्यापूर्वी फोनही करण्याचे भानही तिला राहिले नाही कारण नेहमीप्रमाणेच नीता एकटीच असणार याविषयी तिला खात्री होती. पण तिच्या फ्लॅटमधून जोरजोरात आवाज येत होते. एक आवाज तर नीताचा होता हे उघडच होते आणि दुसरा बहुधा संजयचा असावा,

"तू हे मेधाच्या मनात काय भरवतेस, तुझे तुला तरी कळते का? " हा आवाज संजयचा होता.

"का तुझी त्याला काय हरकत? मेधा माझी मैत्रिण आहे आणि तिच्या भल्यासाठीच तर माझा हा सल्ला आहे. "

" खरच तिच्या भल्यासाठीच आहे ना? की त्यामागे तुझा आणखी काही हेतू आहे? "

"कमालच आहे संजय, आता यामागे माझा काय दुसरा हेतू असणार? तूच तर मला सांगितलेस ना हल्ली विक्रम बराच चिडचिड करतो, मेधावर उगीचच रागावतो, तेव्हां मला वाटले की त्याचा मेधातील इंटरेस्ट कमी झाला असेल म्हणून या उपायाने त्या दोघांचे संबंध सुरळीत होतील असा माझा आपला अंदाज. ते चांगले रहावेत हाच माझा उद्देश आणखी काही नाही. "

"नीता, मी काही तुला आज ओळखत नाही. तूच मला म्हणाली होतीस ना, विक्रमला खरं तुझ्याशीच लग्न करायचं होतं पण मधेच ही मेधा कडमडली. "

"संजय, तू उगाच वडाची साल पिंपळाला लावू नकोस बरंका, मी असं काही म्हटलं नव्हतं. मेधाचं लग्न ठरल्याचर त्या दोघांना आम्ही केळवणाला बोलावलं होतं, तेव्हां, विक्रमला मी आणि विक्रमने मला प्रथम पाहिले आणि त्यावेळी माझं गाणं ऐकून असं तो आपला थट्टेनं म्हणाला होता की माझी आणि त्याची अगोदरच गाठ पडायला हवी होती. इतकंच, म्हणजे त्याचा माझ्यावर डोळा होता किंवा माझा त्याच्यावर डोळा आहे असं तर्कट तूच रचतो आहेस. "

"बरं राहिलं, कदाचित माझा तर्क चुकीचा असेल "

"चुकीचा असेल नाही, चुकीचाच आहे इतके दिवस एकत्र राहून हीच का माझी पारख केलीस? आपण शेजारी रहातो म्हणून मी विक्रमशी कधी फार गप्पा मारल्यात किंवा मुद्दाम तो असताना मेधाकडे गेले असं तुला आढळलं का? "

" बरं बरं, माफ कर मला, चुकीचा निष्कर्ष काढल्याबद्दल. "

"आता माफ करते. पण असा मागून वार केलेला मला नाही खपणार, सांगून ठेवते. मला जर विक्रम आवडतच असला तर तसं स्पष्ट सांगेन मी तुला, आणि त्यालाही, मी अशी थोडीच घाबरणार आहे? "

" हो हो, तू आहेस तेवढी स्पष्टवक्ती अगदी मान्य. पण खरं सांगू का नीता, तू उगीचच जास्त त्या मेधात इन्व्हॉल्व होत आहेस मला वाटते. त्या विक्रमला मेधाची जाडी खुपत नाही आणि तुलाच काय पडलय तिचं. ती तुझी बालमैत्रिण आहे हे जरी खरं असलं तरी त्या दोघांमधील हा प्रश्ब आहे तो त्यांचा त्यांना सोडवू दे ना "

"हे बघ संजय, उगीचच कुठलीही गोष्ट अंगाला लावून न घेण्याचा आहे तुझा स्वभाव आणि पुरुषांचा स्वभाव असाच असतो. आम्हा बायकांना नाही जमत इतकं अलिप्त रहाणं "

आत शिरावं की तेथूनच परत फिरावं हे मेधाला समजेना परतच फिरण्याचा निर्णय करून ती वळली आणि सुधा समोरून आली. ती त्यांची दुसरी शेजारीण, "का, नीता नाही का घरात? " तिनं विचारलं. आता काय उत्तर द्यावं मेधाला समजेना.

"आहे की, दोघेही घरातच आहेत. "तिला उत्तर द्यावे लागले.

"मग दारात उभी का चल की आत. "तिला बरोबर घेत सुधाने बेल वाजवली व आतील संभाषण बंद पडले व एक दोन मिनिटात नीतानेच दार उघडले. यावेळी तिचा फ्लॅट जरा व्यवस्थित होता म्हणजे सोफ्यावर बसण्यापुरती तरी जागा होती व कपड्याचे बोळे हॉलच्या कोपऱ्यात पडले होते. तेथूनच ते वॉशिंग मशीनकडे नेण्यात येत असतील पण ते नीताने न्यायचे की संजयने या वादाचा निकाल अजून लागला नसावा.

पण सुधाबरोबर आत जाण्यात मेधाला काही स्वारस्य नव्हते त्यामुळे, "अगं मला जरा महत्त्वाचा फोन करायचा आहे " म्हणून मेधाने आपली सुटका करून घेतली आणि ती आपल्या फ्लॅटवर आली. तेवढ्यात विक्रमचा फोन बेंगलोरला पोचल्याचा आलाच. पाठोपाठ नीताचा फोन आलाच, "काय गं मेधा तू अगदी दारापाशी येऊन परत गेलीस, सुधा सांगत होती. काय झाले तरी काय? "

"काही नाही अगं बरेच दिवसात आईला फोन केला नव्हता त्याची आठवण झाली म्हणून घरी परत आले. "

"अच्छा, मग फोन झाला असेल तर इकडेच येना, जरा गप्पा मारू. अनायासे सुधाही आली आहे." पण मेधा आत्ताच नीता आणि संजयच्या संभाषणाचा विचार करत होती आणि हे काय गौडबंगाल आहे तिला कळेना. नीता व सुधा यांच्या बोलण्यातून ते उलगडण्याची शक्यता आहे असे तिला वाटत नव्हते त्यामुळे न जाणेच योग्य असा विचार करून तिने नीताला आपण येत नसल्याचे कळवले,

मेधाने आईला फोन करण्याची थाप मारली आणि आश्चर्य म्हणजे लगेच तिच्या मोबाइलचीच रिंग वाजू लागली, आणि तिनं फोन घेतला तो तिच्या आईचाच निघाला, ""अगं मेधा किती दिवस झाले तुझा काहीच फोन नाही, तब्येत बरी आहे ना तुझी? " फोनवर आईचा आवाज ऐकून तिला एकदम फारच बरे वाटले एकदम आपली आईच आपल्याचरोबर आत्ता असायला हवी असे तिला वाटून गेले

"मी ठीक आहे आई, तू कशी आहेस? "

"अगदी छान, आम्ही खुशाल आहोत, मला तुझीच काळजी लागून राहिली आहे, जावईबापू बंगलोरला गेलेत म्हणे, त्यांचा फोन आला होता ते म्हणत होते थोडे दिवस तुझ्याकडे येऊन रहा म्हणजे तुला एकटे वाटणार नाही "

" तसं काही नाही आई, मला आता याची संवयच झाली आहे. महिन्यातून पंधरा दिवस तरी विक्रमचे दौरे चालू असतात आणि प्रत्येक वेळी तुला थोडेच येता येणार, तशी काही काळजी करू नको आणखी इथं नीताही आहेच ना अगदी शेजारी, त्यामुळे एकट वाटण्याचा प्रश्नच नाही. "

" मग काही हरकत नाही, मलाही हल्ली प्रवास अगदी नको वाटतो, त्यात ह्यांना एकट्याला टाकून आले की तिथं असले तरी माझं निम्म लक्ष इकडे ह्यांचं कसं चालले असेल याकडेच असते. बर यांना म्हटले आपण दोघे जाऊ तर त्यांचं दोस्तमंडळ तर त्याना सोडायला तयार नाही,उलट मी नसल्यावर त्याना आणखीच मोकळ रान मिळतं"

"जाऊदे आई तू नको मनाला लावून घेऊस तुझी लेक इथं अगदी आनंदात आणि सुखात आहे, विक्रम माझी इतकी काळजी घेतो----, "

"ते मला माहीत आहे गं, पण बरेच दिवसात तुला भेटले नाही त्यामुळे दोन तीन दिवसासाठी येऊन जातेच कशी मलाही बरे वाटेल आणि तुलाही"

आईला नको कसे म्हणावे याचाच मेधाला पेच पडला कारण ती आली तर आपला शस्त्रक्रियेचा बेत पार पडेल की नाही अशी शंका तिला होती.

" आई उगीचच काळजी करतेस तू, आता तू येतेच आहेस तर मला थोडेच वाईट वाटणार आहे पण तू उगीचच दगदग करून चार दिवसासाठी इतका लांबचा प्रवास करून येणे मला काही योग्य वाटत नाही"

" असं म्हणतेस? बर मग राहूदे सध्या, नाहीतरी सध्या सांधे फारच धरले आहेत, डॉक्टरांचे औषध चालू आहेच वाटेल बरे दोन तीन दिवसात"

"आई स्वत:ची नीट काळजी घे आणि माझी मुळीच काळजी करू नकोस. " सुटकेचा नि:श्वास टाकत मेधा म्हणाली आणि चार दोन इकडच्या तिकडच्या गप्पा मारून तिने फोन बंद केला.

दुसऱ्या दिवशी नीताच आपल्याकडे येईल आणि डॉ. टेकवानींकडे केव्हां जायचे असे विचारेल असा मेधाचा अंदाज होता पण सकाळी बराच उशीर झाला तरी ती आली नाही किंवा तिचा फोनही आला नाही, त्यामुळे शेवटी तिनेच न राहवून नीताला फोन केला,

" अगं नीता, काय झालं तरी काय. मला वाटलं तूच येशील सकाळी नेहमीप्रमाणे, आणि मग आपल्याला डॉक्टरांची अपॉइंट्मेंट घेता येईल, की मीच येऊ तुझ्याकडे? "

"येतीस का माझ्याकडे? आपण या विषयावर जरा चर्चा करू आणि मग डॉक्टरांची भेट ठरवू. " नीताने असे म्हणणे हे जरा अस्वाभाविक होते, पण आता तिच्याकडे जाणे मेधाला आवश्यक वाटत असल्यामुळे ती लगेचच तिच्याकडे गेली.

आश्चर्य म्हणजे संजयही घरातच होता. त्याला पाहून मेधाला आश्चर्य वाटले आणि आता हा विषय कसा काढायचा याविषयी ती विचार करू लागली, पण तिचा प्रश्न संजयनेच सोडवला, "मेधा ये, मी मुद्दामच घरात थांबलो आहे. . तुमचा काय बेत ठरला आहे याची मला कल्पना आहे, आणि नीताच्या सल्ल्यावरून तू लिपोसक्शनची शस्त्रक्रिया करायला निघाली आहेस असे मला वाटते, तसे असेल तर तिच्या सल्ल्याचा तू पुनर्विचार करावा असे मला वाटते. आणि तिने त्यात इन्वॉल्व्ह होऊ नये असा माझा तिला सल्ला आहे. "

"एक्स्यूज मी संजय, नीताने मला सुचवले, ती मला डॉक्टरकडे घेऊन गेली हे सगळे खरे आहे पण आता मीच हा निर्णय घेतला आहे की लिपोसक्शन करून घ्यायचे. त्यामुळे मी तिला यात इन्वॉल्व करत नाही, हा माझा स्वतंत्र निर्णय आहे असे समज, आता तर झाले? "

" मग मला वाटते, मेधा, विक्रम येईपर्यंत तू थांबावेस. "

" कमाल आहे संजय तुझी, विक्रमचा या शस्त्रक्रियेस विरोध आहे त्यामुळे तर तो नसताना ती करायचा निर्णय आम्ही म्हणजे आता मी म्हण, घेतला आहे, यावर तुला काय म्हणायचे आहे? "

यावर संजयला गप्पच रहावे लागले, कारण आत्तापर्यंत हा निर्णय नीताच्या आग्रहापायी मेधा घेतेय असे त्याचे मत होते आणि त्यात तथ्यही होते पण आता मेधानेच आपला पवित्रा बदलला म्हटल्यावर त्याचे बोलणेच खुंटले.

"मग नीता, डॉ. टेकवानींची अपॉइंन्टमेन्ट शक्य तितकी लवकर घे. मला या लग्नाच्या वाढदिवसाला विक्रमला अगदी चकित करायचे आहे. मी त्याला जाण्यापूर्वीच सांगितले आहे की तुला एक आगळी वेगळी भेट देणार आहे म्हणून. "मेधा नीताकडे वळून म्हणाली.

"टेकवानीना फोन काय आत्ताच लावते "नीता उत्साहाने म्हणाली. म्हणून ती लगेच फोनकडे वळली, पण तिने फोनला हात लावण्यापूर्वीच फोनची रिंग वाजली. पण ती मेधाच्या फोनची होती

"कोण मेधा ना? "

"हो, मीच, का गं आई काय झालं सगळं ठीक आहे ना? "

" हो, अगं काल सगळं ऐकलं तरी माझं काही समाधान झालं नाही तेव्हां शेवटी मीच निर्णय घेतला की तुझी गाठ घेऊनच जावं, एअरपोर्टवरून बोलतेय, येतेस का न्यायला? "

"हो येते ना, "आणी नीताकडे वळून ती म्हणाली, "आत्ताचा बेत कॅन्सल, अगं आई  इथे आली आहे, "

आईला आणायला लगेचच विमानतळावर मेधाला जावे लागले. सुदैवाने विक्रम बंगलोरला गेल्यामुळे गाडी घरातच होती आणि ड्रायव्हरला फोन करताच तो लगेचच आला. विमानतळावर पोचताच आई गेटपाशी उभीच असलेली मेधाला दिसली.

" अगं काल तर तू म्हणाली होतीस की तुझे सांधे दुखत आहेत आणि अचानक बेत बदललास? "

" खरं तर मी यावेळी येणारच होते, पण तू फोनवरून काही आवश्यकता नाही म्हटल्यामुळेच न येण्याचा निर्णय घेतला होता. पण तुझा फोन झाल्यावर लगेच विक्रमचा फोन आला, त्याने बजावून सांगितले की तू एकटीच आहेस आणि यावेळी तुला सोबतीची आवश्यकता आहे. काय तब्येत ठीक आहे ना? "

" अगं आई तुला त्याचा स्वभाव माहीत आहेना, उगीचच काळजी करत असतो, बर आता तू घरी चल मग शांतपणे बोलूया. " घर आल्यामुळे आईला घरात घेऊन जात मेधा उत्तरली.

घरात जाऊन फ्रेश होऊन मेधाने दिलेला चहाचा कप हातात घेऊन शांतपणे सोफ्यावर बसत आई म्हणाली, "आता सांग बरं शांतपणे जे काय सांगायचे ते. "

आता आईला काय सांगावे याचा मेधाला पेचच पडला. विक्रमने आईला का फोन केला असावा याची थोडीफार कल्पना मेधाला आली होती कारण विक्रमने

निक्षून बजावले असले तरी मेधा आणि नीता आपल्या गैरहजेरीत लिपोसक्शब पार पाडतील अशी शंका त्याला वाटत होती त्यामुळे आईला त्याने पहारेकरी म्हणूनच पाठवले असणार, त्यामुळे आईला काय सांगावे याचा मेधाला पेचच पडला त्यामुळे ती इतर गप्पाच करत अराहिली, "बाबांची तब्येत कशी आहे? "

"त्यांचे काही विचारू नको, पण त्यानी आपलं पथ्य पाणी संभाळलं आहे त्यामुळे तर त्यांना सोडून येण्याचं धाडस केलं मी, पण ते जाऊदे मला तू शांतपणे काय सांगणार होतीस ते राहूनच गेलं. " तेवढ्यात फोन वाजला आणि मेधानं तो घेतला नीताचाच फोन होता,

"मेधा, उद्याची अपॉइन्ट्मेन्ट मिळाली आहे बरंका " तिला काय उत्तर द्यावं ते मेधाला कळेना त्यापेक्षा तिलाच इकडे बोलावून घ्यावे म्हणजे दोघी मिळून आईला समजावून सांगता येईल असा विचार करून तिने,

"अगं नीता मग तूच इकडे येना, आईलाही तुझ्याशी गप्पा मारता येतील" असे म्हटले आणि "अगं आई नीता येतीय बरं का, तुझ्याशी गप्पा मारायच्यात तिला. " असं तिनं म्हटल्यावर आईच्या प्रश्नाचे उत्तर देणं आपोआपच टळलं.

नीता आल्यावर आईशी गप्पा मारता मारता तिनं विचारलं, "मेधानं सांगितलं की नाही तुम्हाला आई? " "कश्याविषयी बोलतेस तू नीता? आल्यापासून काहीतरी सांगायचेय, काहीतरी सांगायचेय म्हणते आहे पण सांगायला वेळच मिळाला नाही तिला, काय एवढं सांगायचेय? "

"अहो आई, मेधा एक छोटसं ऑपरेशन करणार आहे, बरं झालं तुम्ही आलात ते, आता तुम्ही असल्यावर आम्हाला काळजी नाही. "

"कसलं ऑपरेशन? आणि अगोदर काहीच चर्चा नाही, काल फोनवरसुद्धा काही बोलली नाही, उलट मी येऊ नये असेच तिने मला सांगितले होते. मीच आपली मला चैन पडेना म्हणून आले, कसले ऑपरेशन करायचे आहे? "

"अहो आई, उगीच काळजी करण्यासारखे असे काही नाही, हल्ली मेधाची जाडी नको तितकी आणि नको त्याठिकाणी वाढत चालली आहे म्हणून एका शस्त्रक्रियेने ती चरबी काढून टाकायची बस इतकेच. "

"बस इतकेच? त्याला लिपोसक्शन म्हणतात त्यासाठी बऱ्याच ठिकाणी नळ्या खुपसतात आणि त्यातून चरबीचा द्रव शोषून घेतात, त्याला अनेस्थेशिया पण द्यावा लागतो आणि या सगळ्याला दोन तास तरी लागतात आणि तरी तू त्याला बस इतकेच म्हणतेस? मला तरी हे काही पटत नाही. " आई म्हणाल्या.

"आई उगीचच तू स्वत:ला त्रास करून घेत आहेस. शस्त्रक्रियेनंतर माझ्यात जो बदल घडेल तो पाहिलास की तूही म्हणशील, बरं झालं ऑपरेशन केलं. तुला सुद्धा तसं ऑपरेशन करून घ्यावं असं वाटू लाहेल"

"चल चावटपणा नको करूस, एवढी काही तुझी जाडी वाढली नाही, "

"अहो आई, मेधाला अजून खूप काही करायचे आहे, त्यामुळे शरीर बांधा सुडौल ठेवायलाच हवा. तुमचा काळ वेगळा होता आता आम्ही कुठेही गेलो की

आम्हाला चपळपणे हालचाली कराव्या लागतात, साधं विमानाच्या सीटवर बसताना नको येवढ्या जाडीचा त्रास होतो" नीतानं मध्यस्थी केली.

"हे मात्र बरीक खरे, आताच विमानात दोन तास बसले तरी माझ्या पायांना मुंग्या आल्या. "

"असं करा आई, आपण सगळेच डॉ. टेकवानींकडे उद्या जाऊ, तुम्हाला योग्य वाटले तरच आपण शस्त्रक्रिया करू मग तर झाले? "नीतानं मेधाच्या आईला पटवण्यात निम्मे यश तरी मिळवले.

दुसऱ्या दिवशी डॉ. टेकवानीकडे मेधा, नीता व मेधाची आई सगळेच जण गेले. "वेलकम, "असे त्यांचे स्वागत करत डॉ. टेकवानींनी मेधाच्या आईकडे पहात म्हटले, "बरं झालं तुम्ही आलात, मी मेधाजींना म्हटले होते विक्रमजींना घेऊन येण्याबद्दल पण त्यांना त्यांच्या कामातून फुरसत मिळत नाही असे त्या म्हणाल्या"

"मेधाजी, आज आम्ही सगळ्या तपासण्या करणार आहोत आणि जर तुम्ही या शस्त्रक्रियेला योग्य आहात असे आढळून आले तर आजपासून पंधरा दिवस तुम्हाला काही गोळ्या शस्त्रक्रियेच्या वेळी चरबी घट्ट होऊ नये म्हणून घ्याव्या लागतील त्याना anticoagulant tablets म्हणतात व त्यानंतरच शस्त्रक्रिया करणार, लक्षात आले ना? "

"म्हणजे नीता आपण विक्रमच्या गैरहजेरीत जे करायचे ठरवले होते तसे काही होणार नाही. "

"हो तसेच आहे कारण तुमच्या ह्या बेताचा सुगावा लागल्यामुळे मी लगेचच परत यायचा निर्णय घेतला. बेंगलोरला माझे काही सहकारी काम पहात आहेत" विक्रमने प्रवेश करत म्हटले.

"मला वाटते मध्यंतरी माझ्या वागण्यात जी चिडचिड उत्पन्न झाली होती त्यामुळेच असा अवास्तव निर्णय घेण्याची तुला घाई झाली असावी. "

"आणि त्यात ही नीता, तिची फार काळजी घेणारी, तिला वाटत होतं की लगेच तुमचं फाटणार आणि तू तिला सोडून आणखी एकादी फटाकडी गाठणार. " संजय म्हणाला

"खरं तर त्यावेळी मी माझ्या बिझनेसच्या कठिण अवस्थेतून जात होतो, हे मी तुला सांगायला हवे होते मेधा. Really I am very sorry. "

" मग आता इथं कशाला आलोय आपण? " वैतागून नीताच म्हणाली "माझी सगळीमेहनत पाण्यात गेली. तुला चांगली चवळीच्या शेंगेसारखी बायको मिळवून देणार होते मी विक्रम, पण तुला आपली तीच फतारडी आवडतीय तर माझं तरी काय अडलंय. "

"हे बघ नीता, मेधाशी मी लग्न केलं तेव्हांच आमचं ठरलंय की एकमेकाची साथ कधीच सोडायची नाही आणि अश्या क्षुल्लक गोष्टीवरून तर मुळीच नाही. "

तेच मी तिला सांगत होतो, "संजय मध्येच म्हणाला, "पण ती ऐकायलाच तयार नाही. आता आम्ही जरी लग्न केलं नसलं तरी मी थोडेच सोडणार आहे नीताला जर तिची जाडी वाढली कदाचित तर"

"मी मात्र तुला सोडीन बरंका तू विक्रमसारखी दादागिरी करायला लागलास तर" नीता हसत हसत म्हणाली.

"आपण डॉक्टर साहेबांना मात्र उगीच त्रास दिला" विक्रम तेवढ्यात बाहेर येणाऱ्या डॉक्टरांकडे पहात म्हणाला.

"मुळीच नाही, मी ऑपरेशन करणारच नव्हतो, मेधाजींना मी असेच झुलवत ठेवले होते, कारण विक्रम, आणि मेधाच्या आई तुम्हाला एक गुड न्यूज आहे. " डॉक्टर म्हणाले.

"And good news is Medhaji is going to be a mother within few months. So go and celebrate. विक्रम तुम्ही बाप बनणार आणि तुम्ही आजी, "मेधाच्या आईकडे पहात डॉक्टर म्हणाले आणि तिथे आनंदाचा एकच जल्लोष झाला.

# १०. श्रीमान सर्वज्ञ

श्रीयुत प्रधान हा माणूस पहिल्याच भेटीत मला उगीचच अतिशहाणा वाटला आणि त्यामुळे फारसा आवडला नाही. . तसे आमच्या सर्वच सहप्रवाशाचे मत त्यांच्याविषयी तसेच झाले असणार म्हणा! खरे तर केरळ ट्रिपच्या सुरवातीस थिरुअनंतपुरमला उतरेपर्यंत आम्ही कोणीच कोणाला ओळखत नव्हतो. येऊन जाऊन आम्ही चौघे म्हणजे मी आणि सुमती, माझी बहीण आणि मेहुणे असे चार जण (अति)पूर्वपरिचित होतो.

केरळ ट्रिपची सुरवात मुंबईत झाली व पहिला मुक्काम थिरुअनंतपुरम्ला होता. संध्याकाळी प्रवासी कंपनीने आयोजित केलेल्या होटेलमध्ये सर्व जण उतरलो व काही जण लगेच तेथील एका स्पॉटवर सूर्यास्त पहायला गेले. दुसऱ्या दिवशी पहाटेसच रॉक मेमोरिअला जावयाचे होते असे आमच्या सहल नियंत्रक वैभवने बजावूनही निघेपर्यंत आठ वाजलेच आणि प्रवासी कंपनीच्या बसमध्ये आम्ही आत चढल्यावर मिळेल त्या आसनावर बसलो अर्थात कंपनीच्या नियमाप्रमाणे बुकिंग ज्या क्रमाने झाले होते त्याच क्रमाने बैठक व्यवस्था करण्यात आली होती. आणि त्याचवेळी एक तक्रारीचा सूर प्रथम आमच्या कानावर पडला, "वैभव, हे काय मला पहिल्या किंवा दुसऱ्या रांगेतलीच सीट हवी असते हे माहीत आहे ना? मागील बाजूस मी नाही बसणार. "

आवाज बसच्या दारातूनच आला होता. तेथेच उभा राहून बहुधा आमचाच एक सहप्रवासी  तक्रार करत होता. त्याच्या अंगात नेहमी प्रवास करणारे प्रवासी घालतात तशी खाकी पॅंट व रेघारेघांचा टी शर्ट व डोक्यावर अर्थात केसरीचीच कॅप. माणूस साठीच्या आसपास असावा पण मध्यम उंचीचा व तश्याच बांध्याचा, वर्ण निमगोरा. अजून सहलीची सुरवात झाली नाही तोच तक्रार करणारा कोण गृहस्थ आहे हे पाहायला सगळ्यांचेच लक्ष त्याच्याकडे वळले. . सगळ्यांना सौम्यपणे पण दमात घेणारा सहल नियंत्रक वैभव आता मात्र त्याला चुचकारत म्हणाला, "अहो प्रधानसाहेब, अजून बसायची व्यवस्था जाहीर केलेली नाही तुम्हाला दुसऱ्या रांगेतलीच सीट देण्यात आली आहे. " तेवढ्यात दुसऱ्या रांगेतील एका सहप्रवाशाने उठून आपली बैठक त्यांना देण्याची तयारी दाखवली, त्यावर प्रधानांनी त्याच्यावरच मेहेरबानी केल्यासारखे दाखवत ती जागा घेत ते उद्गारले. , "मग ठीक आहे, कारण तश्या बोलीवरच मी या टूरला आलो आहे, “ त्यानंतर वैभवकडूनच श्रीयुत प्रधान आतापर्यंत केसरीबरोबरच अनेक टूर्सला आले आहेत त्यामुळे त्यांना असा विशेष दर्जा देण्यात येतो असे कळले तरी नावाने प्रधानच असणाऱ्या या माणसाने अगदी राजा असल्यासारखी दादागिरी दाखवलेली मलाच काय पण कोणालाच आवडली नाही.

प्रधानांशी फार संबंध ठेवायचा नाही असे मी मनात ठरवले आणि तशी काही आवश्यकता नव्हती पण योगायोगाने आमच्या दोघांची खोली आणि माझी बहीण व मेहुणे यांची खोली यांच्या बरोबर मध्ये त्यांची खोली होती त्यांना एकट्याला

स्वतंत्र खोली होती हाही त्यांच्या केसरी भक्तीचाच प्रसाद असावा. त्यामुळे आम्हाला एकमेकांकडे जाताना त्यांची खोली ओलांडूनच जावे लागे.

तिसऱ्या दिवशी सकाळी उठून बहिणीकडे जाऊन त्यांची तयारी कुठपर्यंत आली आहे हे पाहावे म्हणून मी एकटाच बाहेर पडलो तर श्रीयुत प्रधान आपल्या खोलीच्या व्हरांड्यातील खुर्चीवर बसून नुकत्याच रूम सर्व्हिसमध्ये समाविष्ट असलेल्या चहाचा आस्वाद घेत होते. मला पाहून त्यांनी हाक मारून मला जणू पकडलेच, "गुड मॉर्निंग मि. कुलकर्णी, " सहल परिचराने आमचा परिचय सुरवातीस करून दिला असला तरी माझे नाव त्यांनी बरोबर लक्षात ठेवले होते याचे आश्चर्य वाटले. मीही

"गुडमॉर्निंग श्रीयुत. प्रधान" असा त्यांना प्रतिसाद दिल्यावर एकदम ", चहा कसला गचाळ केलाय, काय तुमचे काय मत आहे? " अशी सुरवात केली. तसा मला चहा काही वाईट वाटला नव्हता, पण त्यांना अगदीच उडवून लावण्या ऐवजी मी, "चालायचंच इतके आपण पर्टिक्युलर राहून कसे चालेल! " असे गुळमुळीत उत्तर दिल्यावर, "अहो असा विचार केला तर हे केसरीवाले आपल्याला आणखीनच लुटतील. मुख्यत्वे खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था या कंपनीच्या आश्वासनावर विसंबून आपण यांच्याबरोबर येतो आणि त्यात अशी काटकसर? हे मला नाही चालणार. आजच वैभवकडे तक्रार करणार आहे मी " त्यावर मान हालवून मी पलीकडील खोलीत शिरलो.

हळू हळू आमच्या सहप्रवाशांच्या ओळखी होत होत्या जेवण्याचे वेळी ठराविक जण कोंडाळे करून गप्पाष्टकही जमवू लागले. अर्थात काही प्रवासी

आपापलाच मोठा गट करून आलेली असल्यामुळे कोठेही गेली तरी त्यांचा तो ठराविक गट एकत्र असेच. तसा आमचाही गट होताच. असाच एक आणखी गट तिघाजणांचा होता. तो लक्षात राहण्याचे कारण सुमतीचे बारकाईचे निरीक्षण त्यात एक जोडी आणि त्यांचा एक मित्र यांचा समावेश होता. श्रीयुत विवेक शास्ते नावाप्रमाणेच जरा उग्र वाटत होते. त्यांना पाहताच प्रथम त्याच्या मिश्याच डोळयात भरत. वर्ण काळयातच जमा होणारा. त्याला पाहिल्यावर हा माणूस सैन्यदलात असला पाहिजे असा ग्रह होत असे आणि प्रत्यक्षातही तो खरोखरच सैन्यदलात कॅप्टनच होता. त्याची बायको सुमीता मात्र एकदम गोरीपान आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वाची म्हणता येईल अशी होती. विवेक तिला मीता असे संबोधत असे. विवेकचा मित्र प्रतीक त्या गटाचा तिसरा सदस्य. हा मात्र गोरापान, सुदृढ बांध्याचा हसतमुख. बहुधा हे तिघे एकत्र असत. विवेक व सुमीता जेव्हा जेव्हा असत तेव्हा तेव्हा तिच्याशी बोलताना त्यांच्या स्वरात हुकूमत जाणवत असे तर सुमीता त्यांच्यापुढे अगदी दबून वागताना दिसत असे. हा तिघांचाच गट का होता याविषयी सुमतीला लगेच शंका आलीच. म्हणजे तिच्या मते आमच्या चौघांसारखाच गट त्यांचाही असावा, त्यामुळे दुसऱ्याच दिवशी संध्याकाळी हा प्रश्न तिच्या तोंडून बाहेर पडलाच!

" काय हो प्रतीक आपल्या बायकोला घेऊन का आला नाही? "

"आता हे मी कसे सांगणार कदाचित त्याचे लग्न झाले नसेल "

" इतका स्मार्ट माणूस लग्नाशिवाय राहणार नाही. "

"हल्ली स्मार्ट मुलीसुद्धा लग्नाशिवाय राहतात आणि त्या आनंदातही असतात. आणि प्रतीकही आनंदातच आहे की "मी तिची समजूत काढण्याचा प्रयत्न करत म्हटले.

" सुमीता त्याच्याबरोबर जरा जास्त आनंदात असते नाही का? "या प्रश्नाला मी काय उत्तर देणार?

दिवसभराच्या कार्यक्रमानंतर रात्रीच्या जेवणानंतर हॉटेलसमोरच्याच रस्त्यावरून थोडे चालून गेल्यावर समुद्रकिनाराच होता त्यामुळे आम्ही चौघे चालत निघालो व किनाऱ्याकाठी असणाऱ्या झाडीखाली टाकलेल्या बाकांवर बसून गप्पा मारू लागलो. आमच्या समोरील बाकांवर आमच्या सारखेच काही इतर प्रवासीही येऊन बसले. त्यातच श्रीयुत प्रधानही होते.

मी जरी त्यांच्या गप्पात सामील झालो नाही तरी अगदी समोरच असल्याने त्यातील जो काही भाग ऐकू येत होता त्यावरून कोणताही विषय निघाला, मग विषय भारतातील देवळांविषयी असो, बागांविषयी असो किंवा भारताबाहेरील इतर देशातील प्रेक्षणीय स्थळांविषयी असो तरी प्रधानांचे त्याविषयी ठाम मत असते आणि समोरच्याच्या गळी उतरविल्याशिवाय त्यांना चैन पडत नव्हते असे मला वाटून गेले. गृहस्थ खूप हिंडलेला असावा आणि सगळीकडे त्याने बारकाईने निरीक्षणही केले असावे पण तरी

वाद घेताना तो जास्तच हेकेखोर आहे असा माझा ग्रह झाला. आपल्याला पाहून सगळ्यांना बरे वाटते अशी का कुणास ठाऊक प्रधानांची समजूत होती.

त्यामुळे कोणत्याही गटात ते अगदी सहज मिसळत त्यामुळे सगळ्याच सहप्रवाशांची त्यांची अगदी पूर्वपरिचय असावी तशी जवळीक झाली होती. वैभवचे तर ते जुने मित्रच होते

त्यामुळे जिथे तिथे ते आपले अस्तित्व दाखवत आणि त्यामुळे वर वर जरी सगळे त्यांना आदर देत तरी प्रत्यक्षात परिस्थिती अगदी उलट होती.

बसमध्ये पण त्याच्या बरोबर मागील बाकावरच आम्हाला बैठका मिळाल्या व त्याच कायम असल्यामुळे सहप्रवाशांशी होणारे त्याचे संभाषण वादात रूपांतर होऊन आपलेच म्हणणे कसे खरे आहे हे पटवण्याचा त्याचा कलच आहे हे सगळ्याच प्रवाशांच्या लक्ष्यात आले आणि त्यामुळे त्याच्या अनुपस्थितीत सगळे जण त्याला श्रीमान सर्वज्ञ असे संबोधू लागले.

चौथ्या दिवशीच्या दुपारच्या कार्यक्रमात बऱ्याच जणांनी माघार घेण्याची शक्यता अपेक्षित असल्याप्रमाणे जाहीर करण्यात आला कारण नॅशनल पार्कला बरेच अंतर जीपने जावे लागेल त्यानंतर थोडे चालावे लागेल व वर गेल्यावर दिसले तर एडका/के दिसेल/सतील. एडक्याची ओळख मुळाक्षरांबरोबरच (ए एडक्यातला) एवढीच झालेली व एडका म्हणजे मोठा मेंढा हे कळल्यावर त्यासाठी इतकी यातायात करण्याचे कारण नाही असे आम्ही दोघांनी अगोदरच ठरवले. माझी बहीण व मेहुणे यानी मात्र प्रथम जायचा विचार केला पण नंतर त्यातील फोलपणा त्यांच्याही ध्यानात आला असावा व त्यांनीही माघार घेतली अश्या तऱ्हेने दुपारी आम्ही मोकळेच राहिलो. त्या दिवशी बऱ्याच जणांनी विश्रांतीच घेणे पसंत केले. कॅप्टन विवेकने मात्र मोठ्या उत्साहाने आपण जाणार असे जाहीर केले.

तेवढ्यात प्रधानही तेथे आले, त्यांचे व विवेकचे बऱ्यापैकी सूत जमलेले दिसले. त्यांनी मलाही येण्याचा आग्रह केला, "चला हो मि. कुलकर्णी, सगळे अनुभव घ्यायला हवे. आता एडक्याला पाहायचे म्हणून गेलो तरी तेथे प्रत्यक्षात आणखी काहीतरी असे पाहाल की मग वाटेल बरे झाले ही संधी चुकवली नाही. अहो जपानमध्ये मी गेलो तेव्हा माझे असेच झाले होते, ----" आता हा आपल्या जपानभेटीचे लांबलचक वर्णन ऐकवेल म्हणून मी त्याला, "पण प्रधानसाहेब, तुम्ही जपानला कशाला गेला होता इतक्यांदा, कारण कालही मी तुम्ही आमच्या समोरील प्रवाशांना सांगत ऐकलेले ऐकले.

"फारच तीक्ष्ण कान आहेत हो तुमचे" प्रथमच स्वतःपेक्षा दुसऱ्याकडॅ काहीतरी विशेष बाब आहे हे मान्य करत ते पुढे म्हणाले "अहो माझ्या व्यवसायाचाच तो भाग आहे कल्चर्ड मोत्यांचा जपानशी आमचा बराच मोठा व्यापार चालतो. " तेवढ्यात सुदैवाने जीप आली व वैभवने "ज्यांना नॅशनल पार्कला जायचे त्यांनी लगेच जीपमध्ये बसा"अशा हुकूम सोडला आणि ते दोघेही जीपमध्ये बसले. सुमीताने हात हालवत त्यांना निरोप दिला.

"मीता तेवढ्यात तुझी काय खरेदी करायची असेल ती आटोपून घे, प्रतीकला घेऊन जा हवं तर " विवेकने तिला हुकूम सोडला.

"शास्ते ना हे बरं चालतं"

त्यांची जीप सुटल्यावर सौ. सुमतीनं आपलं मत व्यक्त केलं. अर्थात तिचा हा गूढ अभिप्राय मला समजणं शक्यच नव्हते म्हणून मी नेहमीप्रमाणे (बावळटासारखे) विचारले

"कशाविषयी बोलतेस तू? "

"अहो हेच त्या प्रतीकबरोबर बायकोनं फिरणं "

"मला पण जरा विचित्रच वाटत "आमच्या बहिणाबाईनीही तिच्या सुरात सूर मिसळला. "

‘‘उलट मला तर वाटतं सुमीता आपल्या नवऱ्याच्या खूपच धाकात आहेत. " माझे मेव्हणे म्हणाले आणि मीही त्यांच्या सुरात सूर मिसळला, कारण आमच्या बाबतीत आम्ही दोघेच आपापल्या बायकांच्या धाकात आहोत असे आमचे दोघांचेही मत होते. आणि ते त्यांच्यासमोर व्यक्त करण्याचे धाडस फक्त आम्ही चौघे एकत्र असलो तरच होत असे कारण त्यावेळीच आमच्या बायकांपासून एकमेकांचे रक्षण करण्यासाठी आपल्याला सहाय्यक कोणी तरी आहे असे आम्हाला वाटत असे.

"अगदी बरोबर बोललात गोपाळराव, "त्यांच्या सुरात सूर मिळवत मी म्हणालो

” अशी नवऱ्याच्या धाकात राहणारी बायको पाहिली की त्या नवऱ्याचे कौतुक करावे वाटते ‘‘

"नुसते धाकात राहण्याचा काय उपयोग? "

"आम्हाला त्याचीच अपूर्वाई वाटते "मी धाडस करून म्हटले

"खरंच तो धाक आहे की ते तिचे नाटक आहे, जाऊ दे तुम्हाला ते कळणार नाही"

सौ. सुमतीने भरतवाक्य म्हणून वादाचा तिच्या मते शेवट केला. त्या दिवशी आम्ही जवळचेच एक मंदिर पाहण्यात वेळ घालवला.

प्रवासाचा आता शेवटचा टप्पा आला होता त्यामुळे त्या दिवशी सगळ्या प्रवाशांना एकत्र बोलावून काही स्पर्धा वगैरे वैभवने आयोजित केल्या होत्या त्याच दिवशी सौ. सुमीता यांचा वाढदिवस पण केसरीने मोठ्या उत्साहात साजरा केला. ही त्या प्रवासी कंपनीची खासियत होती. केक वगैरे कापल्यानंतर एका टेबलावर विवेक, सुमीता आणि प्रतीक त्याच टेबलावर आम्हीही चौघे योगायोगाने होतो आणि भरीस भर म्हणून श्रीयुत प्रधानही तेथेच होते. अर्थात त्यांच्या वाचाळपणाला उधाणच आले होते, अचानक सुमीतावहिनींकडे पाहत त्यांनी, "वा, वहिनी कॅप्टनसाहेबांनी फारच भारी गिफ्ट दिलेली दिसत्येय वाढदिवसानिमित्त" असे उद्गार काढले. सुमीताच्या चेहऱ्यावरील हास्य एकदम नष्ट होऊन त्यांची मुद्रा एकदम कावरीबावरी झाल्यासारखे दिसले. .

" काहीतरी चुकीचा समज झालेला दिसतोय तुमचा मि. प्रधान, कशाविषयी बोलता आहात तुम्ही? मीताला वाढदिवसाचं गिफ्ट मी अजून दिलेलंच नाही " कॅप्टनसाहेबांनी आपला खर्जातला सूर काढून म्हटले.

"अच्छा मला वाटलं त्यांच्या गळयातली ती मोत्यांची माळ तुम्ही त्यांना वाढदिवसाची भेट म्हणून दिली असणार, मग जाऊदे मला काही बोलायचं नाही "

"मि. प्रधान माझ्या बायकोला तिच्या वाढदिवसाचं इतकं फडतूस गिफ्ट देईन असं कसं वाटलं तुम्हाला? " कॅप्टनसाहेबांचा आवाज चढला होता.

"काल आपण नॅशनल पार्कला गेलो तेव्हा तिथल्या एका दुकानातून ती फडतूस मोत्यांची माळ फक्त दीडशे रुपयात तिनंच आणली आहे. तिनंच मला सांगितलं ही किंमत, काय मीता खरे ना? "

" हो ना, जाऊ दे ना विवेक उगीच वाद कशाला "सुमीताचा चेहरा तर एकदम विदीर्ण झाला होताच पण आवाजही थरथरत होता.

पण आता प्रधानांना अगदी आपल्याला जणू कोणी आव्हानच दिल्यासारखं वाटलं सुमीतांच्या चेहऱ्यापेक्षा त्यांचं सर्व लक्ष तिच्या गळयातील माळेकडेच अधिक होतं.

" मी अगदी पैज लावून सांगतो की त्या माळेची किंमत पन्नास हजारापेक्षा एक पैही कमी नाही, असल्यास कसलीही पैज हरायला मी तयार आहे"

" ठीक आहे लागली मग हजार हजार रुपयांची पैज " आता कॅप्टनही हट्टाला पेटलेले दिसले.

"जाऊ दे ना विवेक प्रत्यक्ष किंमत माहीत असताना पैज लावण्यात कसला शहाणपणा, " सुमीताचा चेहरा आणखीनच रडवेला झाल्यासारखे मला वाटले.

"सुमीतावहिनी, आपण किती भारी गिफ्ट दिली हे साहेबांना उघड करायचे नसेल तर राहूद्या. "

सुमीताकडे पाहत प्रधान उद्गारले आणि त्या वेळी प्रथमच त्यांचे तिच्या चेहऱ्याकडे लक्ष गेले.

आता हॉलमधील सगळ्याच जणांचे या टेबलाकडे लक्ष वळले होते.

पण आता कॅप्टन अगदी हट्टालाच पेटले होते, "आता माघार नका घेऊ बरंका प्रधान, काढ गं सुमीता ती माळ आणि त्यांना पाहूदे नीट. "

""अरे मला ती काढता येत नाही, माहीत नाही का तुला "सुमीताने न देण्यासाठी शेवटचा प्रयत्न म्हणून म्हटले

"अशी कशी निघत नाही पाहतोच" म्हणून विवेकने उठून तिच्या मानेवरील हूक ढिला करून अलगद माळ काढली आणि विजयी मुद्रेने प्रधानांच्या हातात दिली.

प्रधानांनी खिशातून सूक्ष्मदर्शक भिंग काढत माळ हातात घेतली आणि एक एक मोती तपासायला सुरवात केली. काही काळ तेथे एकदम शांतता पसरली होती. प्रत्येक मोती तपासून पाहत शेवटपर्यंत माळ तपासून शेवटी चेहरा कसनुसा करत त्यांनी माळ विवेकच्या हातात ठेवली, आणि म्हणाले,

"तुम्ही जिंकलात कॅप्टन, ही अगदी कवडीमोल किमतीची माळ आहे दीडशे रुपयेही फारच झाले. "

सुमीताच्या चेहऱ्यावर एकदम तकाकी आली.

"बघा मी म्हटलं नव्हतं उगीचच प्रधानांना भरीस घातलंस तू विवेक"

"चुकतेस तू मीता, मी नाही त्यांना भरीला घातलं त्यांनी मला भरीला घातलं"

"अगदी बरोबर "प्रधान उठून म्हणाले आणि भिंग खिशात ठेवत दुसऱ्या खिशातून पैशांचे पाकीट काढत त्यातून हजाराची नोट काढत त्यांनी विवेकच्या हातात ठेवली.

आता सगळ्यांचा त्या घटनेतील रस संपला होता व शिवाय श्रीमान सर्वज्ञ यांची अश्या प्रकारे परस्पर जिरली याचाच सगळ्यांना आनंद झाला. सगळेच जण आपापल्या खोल्यांत परतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा श्रीयुत प्रधानांनी मला पकडलेच व आपण स्नोर्केलिंग करताना काढलेले व्हिडिओज दाखवण्यास सुरवात केली. खोलीत अंधार व्हावा म्हणून दार बंद केलेले होते. मध्येच दारापाशी काहीतरी पडल्याचा आवाज आला म्हणून ते दारापाशी गेले व त्यांनी दार उघडले पण बाहेर कोणीच नव्हते मात्र एक पाकीट दारापाशी पडलेले दिसले. दार पुन्हा बंद करत आत येता येता त्यांनी पाकिटाची कड कापत पाकीट उघडले तो त्यात ती त्यांनीच दिलेली हजाराची नोट बाहेर पडली.

"आपल्या सुंदर बायकोला नुसतेच धाकात ठेवायचे नसते समजले ना जयंतराव "ती नोट माझ्यापुढे नाचवत प्रधान म्हणाले. सुमतीच्या विधानाचा अर्थ आता माझ्या लक्ष्यात आला. प्रधानांविषयी माझे मत मात्र आता एकदमच बदलले होते.

(W Sommerset Maughm यांच्या Mr.Know Allकथेचे स्वैर रूपांतर ).

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
# श्री श्याम कुलकर्णी यांचे हे तिसरे पुस्तक.

श्री श्याम कुलकर्णी हे इंजिनियरिंगचे शिक्षक. त्यांचे खरे गुरू म्हटले तर पु लं च. समोरच्या परिस्थितीने कितीही छळ करायचे म्हटले तरी त्यातली विसंगती शोधून हे स्वतःचे मन रिझवणार आणि भोवतालालाही अपल्या खुसखुशीत विनोदाने मजेत ठेवणार. त्यांच्या लेखनातला विनोद हा दर्जेदार, नेमका आणि अत्रेंनी विनोदातल्या व्याकरणात ज्याला सर्वोच्च म्हटले आहे त्या प्रकारचा. याचे कारण त्यांचा बहुतांश विनोद हा स्वतःचीच खिल्ली उडवणारा असतो. किंचित अतिशयोक्तीची फ़ोडणी असेल, पण मुख्य गाभा वास्तवातल्या विसंगतीचा. कार्टुनिस्ट लक्ष्मण सांगत की इथले राजकारणी मला कधीच विषयांची कमी पडू देत नाहीत. पण श्यामजींना तर घरी दारी देशो देशी सर्वत्र विनोदाचे विषय येऊन स्वतःच भेटतात.

श्री. श्याम कुलकर्णी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू

शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(२), किशोर कुलकर्णी(2), रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ‘‘इ’’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची धमाल विनोदी पुस्तकं. यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा आणि हसत सुटा. (इंटरनेट पाहिजे हो. नाहीतर उघडणार नाही)




